# ।। श्रीदत्त प्रसन्न ।।

## श्री नारायणस्वामी चरित्र



# ।। श्रीदत्त प्रसन्न ।।

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरूस्तथा ।
पापं तापं च दैन्यं च हरेत् साधुसमागमः ।।१।।

अखिल जगतामध्यें आपली भारतभू सर्व गोष्टीत सुविख्यात आहेच. त्यांतल्या त्यांत विशेष वर्णन करावयाचें झाल्यास या भूमीत जेवढे संत सज्जन निर्माण झाले आहेत व होत आहेत तेवढे संतजन अन्यत्र क्वचित् निर्माण झालेले आढळतील. म्हणून या भूमीस पुण्यभूमि असें अन्वर्थक अभिधान मिळालेले आहे. भारत देशांत सर्वत्र संत महात्मे विखुरलेले असले तरी विशेषेकरून आपल्या महाराष्ट्रात संतमालिका थोडीथोडकी जन्मास आलेली नाही. श्रीसमर्थ रामदासस्वामी, संतशिरोमणी एकनाथ महाराज, मराठीचे आचार्य ज्ञानेश्र्वर, कवी मुक्तेश्र्वर, रंगनाथस्वामी, श्रीतुकाराम महाराज, नामदेव, जनाबाई, मोरोपंत वगैरे संत मशहूर आहेतच. या संतांची कामगिरी पाहिली तर या महनीय मराठी संतांच्या कार्यालाच पहिला मान द्यावा लागेल. अलिकडे ज्ञात आणि अज्ञात अशा संतांचे वाङ्मय आणि चरित्र ग्रंथ प्रसिध्द करण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. ही गोष्ट प्रशंसनीय आणि अभिमानास्पद अशीच आहे, यांत शंका नाही. अशा संत चरित्रांचे मुद्रण सध्याच्या काळात अत्यंत आवश्यक आहे. साधक व चिकित्सक वाचकांना त्याचा उपयोग व्यावहारिक आणि पारमार्थिक उत्कर्ष मिळवून देण्याकरतां खात्रीने होईल असे वाटते.

सामान्यतः संतचरित्रांपासून बोध घ्यावयाचा झाल्यास मुख्यतः त्याचे दोन भाग करावे लागतील. १) संतांचा आचार २) संतवचन व विचार. धर्मशास्त्रदृष्ट्या संतांचा आचार हा इतरेजनास प्रमाणभूत व ग्राह्य होणार नाही. कारण :-

" ईश्र्वराणां वचः सत्यं तथैवा चरितं क्वचित् ।
तेजोयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा ।। "

अशा प्रकारची सर्वसंमत संस्कृत वचनें प्रसिध्द आणि सर्वांच्या परिचयाची आहेत. अलौकिक संत महात्मे यांच्या अंगी असामान्य आणि सर्वांना दिपवून टाकणारे असें अद्वितीय सामर्थ्य असते. याचा अनुभव आपणा सर्वांनाच आहे. तशा प्रकारचें लोकातिक तेजस्वी सामर्थ्य सामान्य माणसामध्ये असत नाही हे स्पष्ट आहे. म्हणून त्यांच्या आचाराची बाजू सोडली पाहिजे. दुसरी गोष्ट विचार. सामान्य लोकांनी त्यांचा विचार करणे श्रेयस्कर होईल. कारण आपल्या ठिकाणी तसे सामर्थ्य नाही. शिवाय संतांचा आचार धर्मशास्त्रदृष्या जर बाधक होत नसेल तर त्याप्रमाणे आचार करणेंस प्रत्यवाय येणार नाही. म्हणून त्यांचे दैनंदिन कार्यक्रम कदाचित् अनुकरणीय होतील. शक्यता संभवनीय वाटते. श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वती आपल्या एका अभंगांत लिहितात. :-

सदा संतापाशी जावे । त्यांचे जवळी बैसावे ।
उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी ।
तेचि उपदेश होती । त्याही कष्ट नष्ट होती ।
वासुदेव म्हणे संत । संगे करिती पसंत ।।१।।

यावरून थोडाफार आचार साधकांनी करावयास हरकत नाही. मात्र आचाराचा विभाग लोकसंग्राहक असाच अनुकरणार्ह समजला पाहिजे. साधकांना संतचरित्रांचा उपयोग सुखसमाधान लाभणेस खात्रीने होईल. म्हणून मुद्रित आणि प्रसिध्द संतचरित्रे अवश्य वाचली पाहिजेत. अमुद्रित आणि अप्रकाशित संतचरित्रे जर कोणी प्रकाशित करीत असल्यास त्यांना शक्य ते सहाय्य करणे अत्यंत जरूर आहे. त्यामुळे स्वोन्नति साधून समाजाचे आणि राष्ट्राचे एक महान् कार्य होईल. सध्याच्या धार्मिक अवनत काळांत संतचरित्रे लोकांच्या हाती वाचावयास मिळणे ही गोष्ट अत्यंत गरजेची आहे.

प्रस्तुत संतचरित्रनायक परमपूज्य श्रीमन्नारायणस्वामीमहाराज यांचा जन्म भिक्षुक घराण्यांत विसापूर गांवी झाला. जन्म दिनांक मिळत नाही. तथापि श्री. प. प. वासुदेवानंदसरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळाचे प्रथम पुष्प युवाशिक्षा पान ५० वर श्रीमन्नारायणस्वामी समाधिकाल चै. व. अमावस्या श. १७२७ असा दिला आहे. त्यावरून कालगणना समजण्यास मदत होते. तत्कालीन इतिहासाची मदत घेऊन कारकीर्द, वयोमान ठरवता येईल. महाराजांचे घराणे पिढीजात वेदशाास्त्रविद्येत पारंगत असल्याने परंपरागत विद्याभ्यास बालपणी घरीच झालेला होता.

तदनुसार सभेत जाणे, पूर्वोत्तर पक्ष मांडणे, पंडितांच्या गाठीभेटी घेणे वगैरे गोष्टी महाराज करीत असत. एकदा पुण्यांत वादविवाद सभेत महाराजांचा थोडा अपमान झाला. “ मानो हि महतां धनम् ” या न्यायाने अर्थातच महाराजांना तो सहन झाला नाही. म्हणून महाराजांनी अधिक विद्या संपादण्याकरता काशीस प्रयाण केले. गुरूगृही राहून तेथे चांगलीच विद्या संपादन केली. विद्या समाप्त झाल्यावर प्रसंगानेच गुरूदक्षिणेचा प्रश्न उत्पन्न झाला. महाराजांना तो मान्य होता. गुरू शिष्याचे प्रेमळ संभाषण नेहमीच होत असे. गुरू आज्ञेप्रमाणे महाराजांनी दक्षिणा समर्पण केली. ती अशी की, येथून पुढे कोणत्याहि सभेत वादविवाद करणात नाही. गुरूंची परवानगी घेऊन महाराज स्वगृहास परत आले. महाराजांचे मनांत आनुवंशिक गुण, संस्कार परंपरा, ईश्र्वरनिष्ठा, गुरूजनांबद्दल नितांत आदर भाव, शुध्द आचार या गोष्टी किती खोल व दृढतर रूजल्या होत्या हे स्पष्ट समजते. विद्यार्जनाचा काळ येथेच संपतो. नंतर वडील मंडळींच्या आज्ञेवरून विवाह झाला. धर्मशास्त्राप्रमाणे तंतोतंत गृहस्थाश्रमाचे आचरण सुरू झाले. गृह्याग्नि व अग्निहोत्रादि कर्मानुष्ठान योग्य असे सुरू झाले. परंतु अल्पावधीत महाराजांच्या प्रथम पत्नीने इहलोक सोडला. नित्य नैमित्तिक द्विजकर्मे बंद झाली. कर्मानुष्ठान योग्य कालापर्यंत झाल्याविना चित्तशुध्दि, वैराग्यादिकांचा इष्ट परिणाम घडण्याची शक्यता कमी. म्हणून महाराजांचा द्वितीय विवाह झाला. गृहस्थधर्म पुनः सुरू झाला. नंतर महाराजांना दोन कन्या झाल्या. काही काळाने द्वितीय धर्मचारिणीचा अंतः काल झाला. एकंदरीत गृहस्थाश्रम काळ किती झाला याचा कयास करण्यास निश्र्चित पुरावा मिळत नाही. अंगी मूळचे वैराग्य असून स्वकीयांच्या इच्छेकरतां महाराजांनी गृहस्थधर्म आचरिला. यावरून लोकसंग्राहक धोरण दिसून येते. काशीतच विद्याभ्यासकाली महाराजांना गुरूजींकडून अशी सूचना मिळाली होती की, तुम्ही घरी जा, गृहस्थधर्म आचरा. नंतर काही काळाने योग्य अशा महान् विभूतींकडून तुम्हांस संन्यासदीक्षा मिळेल. तुमचे मनोरथ पूर्ण होतील, ऐहिक आमुष्मिक वगैरे सर्व गोष्टी यथायोग्य घडतील.

पत्नीद्वय निवर्तल्यावर पूर्वीपासूनच बीजरूपाने मनांत असलेला तुर्याश्रम विचार महाराजांच्या मनांत जोरांत सुरू झाला असावा. परंतु मुली अल्पवयीन असल्याने थोडा वेळ थांबावे लागले. नंतरच्या काळांत स्वामी आपल्या मुलींसह कोल्हापुरांत प्रथम कांही दिवस रहात असत. मुलींचे योग्य संगोपन करून ईशचिंतनांत पुढील काळ घालवावा असा महाराजांचा विचार असावा. मधून मधून ते श्रीदत्तमहाराजांचे दर्शनास नरसोबावाडीस येत आणि थोडे दिवस मुक्कामही करीत. त्यावेळी मुलींना कोल्हापुरांतच ठेवीत असत. हा क्रम वारंवार चालत असे. अशा प्रकारे श्रीदत्तमहाराजांची उपासना काही काळ चालू होती. एकदा महाराजांचा मुक्काम वाडीत असतांना श्रीदत्तांनी महाराजांना दृष्टांत देऊन सांगितले की, तुम्ही आतां वाडीसच रहा. तुमच्या बरोबर मुलीही येथेच राहू देत. नंतर मुलींसहवर्तमान ते कांही काळ वाडीस राहीले. नंतर दोन्ही मुलींची लग्ने झाली. ज्येष्ठ मुलीच्या वंशाबद्दल कांही माहिती मिळालेली नाही. कनिष्ठ मुलगी सेनापतिकापशीस दिली होती. तिचा वंश अद्याप रट्टीहळ्ळी या गांवी कर्नाटकांत आहे. दरम्यानच्या काळांत महाराजांच्या कुटुंबीय इतर मंडळींची हकीकत कशी काय होती याचा उल्लेख चरित्रांत नाही. मात्र कोल्हापूर मुक्कामापूर्वी महाराजांचा संचार कर्नाटकांत झाला होता असे चरित्रांत आढळते.

मुलींच्या कार्यातून मुक्त झाल्यावर संन्यासदीक्षा घ्यावी असा विचार महाराजांनी केला. परंतु दीक्षा योग्य विभूतीकडून मिळावी अशी इच्छा महाराजांची होती. हे घडणार कसे अशी चिंता महाराज करीत असत. एकदां महाराज स्नानाकरितां संगमावर (कृष्णा पंचगंगा) गेले. संगमांत बुडी मारली. पाण्यांतच श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी दिसले. तात्काळ त्यांनीच आश्रम दीक्षा, भगवी वस्त्रे उपदेश दिला. महाराज पाण्यांतून वर आले. पाहतात तो रूप परिवर्तन झालेले. मनांत समाधान झाले. निवासस्थानी परत आले. हा प्रकार पाहून ग्रामस्थांनी थोडीफार चेष्टाहि केली. पंरतु श्रीनृसिंहसरस्वतीमहाराजांनी खरी वस्तुस्थिती ग्रामस्थ मंडळींना दृष्टांतद्वारा समजावून सांगितली. त्यामुळे महाराजांविषयी लोकांची श्रध्दा आणि पूज्यबुध्दि दिवसेंदिवस अधिकाधिक वाढीस लागली. सदर प्रसंगावरून भक्तश्रेष्ठ श्रीमन्नारायणस्वामी आणि भक्तप्रतिपालक साक्षात् दत्तात्रेय स्वरूप श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांचे प्रेमरूप जिव्हाळ्याचे संबंध कसे होते हे वाचकांच्या ध्यानी येईल.

महाराजांचा संचार कर्नाटक आणि महाराष्ट्र एवढाच मर्यादित दिसतो. महाराजांनी संन्यासदीक्षेनंतर परोपकार, आस्तिकभावना, सनातन धर्मनिष्ठा, वर्णाश्रम परिपालन, सदाचार वगैरेंची जागृती लोकांत उत्तम केली आहे. प्रसंगानुसार काही अलौकिक चमत्कारही स्वतः महाराजांनी करून दाखविले असे चरित्रांत नमूद आहे. यामुळे चरित्रांतील काही प्रसंग उद्बोधक व आकर्षक वाटतात. संन्यासविधीनंतर महाराज बराच काळ श्रीनरसोबावाडीतच वास्तव्य करून श्रीदत्तप्रभूंच्या सेवाराधनेत एकनिष्ठपणे घालवीत असत. प्रसंगानुरूप लोकानुग्रहहि महाराज करीत असत. त्यांचा शिष्यसंप्रदाय महाराष्ट्र व कर्नाटकांत थोडाफार आढळतो. सात्त्विक वृत्ती आणि एकनिष्ठ, निष्काम सेवा यामुळे शिष्यवर्गात महाराजांसंबंधी नितांत आदरभाव दिसून येतो. चरित्राव्यतिरिक्त पारंपारित इतर कांही दंतकथाही लोकवार्तेत आढळतात. श्रीदत्तप्रभूंची मानसपूजा ते अत्यंत भक्तीने करीत असत. त्यातच ते दीर्घकाळ तन्मय होत. अशा संतश्रेष्ठांचे चरित्र आज प्रकाशित होत आहे. ही गोष्ट जनतेच्या सुकृतोत्कर्षाची समजणे अयोग्य होणार नाही.

प्रस्तुत चरित्र प्रकाशक प. पू. श्री. वामनराव गुळवणी हे महाराजांचे शिष्य सांप्रदायिक होते. त्यांचे थोरले बंधू वे. शा. सं. रा. शंकरशास्त्री गुळवणी यांनी सांप्रदायिकांकडून तोंडी व जुन्या टीपणांवरून मिळालेली माहिती मराठीत प्रथमतः एकत्रित केली. त्यांच्या संग्रहावरून प. पू. पं. आत्मारामशास्त्री जेरे, संस्कृताध्यापक, तत्वज्ञान मंदिर, अमळनेर यांनी त्याच संग्रहाचे रूपांतर संस्कृतात केले आहे. चरित्र पद्य रूपांत असून ते अध्याय १५ मध्ये विभागलेले आहे. पंडितांची भाषा नेहमीच अलंकारिक, विद्वत्ताप्रचुर असल्याने सामन्य वाचकास ती समजणे थोडे कठीण होते. परंतु या चरित्रांत भाषा सुबोध, साधी, आकर्षक व रसाळ अशीच आहे. त्यामुळे वाचकांना भाषेची कठीणता जाणवणारा अनुभव येणे संभवनीय वाटत नाही. लेखकाचें लेखनकौशल्य ओघवत व भावनाप्रधान असल्याकारणाने चरित्ररचना सुलभ व आकर्षक झाली. सर्व दर्जाच्या वाचकांना उपयुक्त असेच हे चरित्र झाले आहे. त्यामुळे लेखक आणि प्रकाशक यांच्या हातून यापुढे असेच जनता जनार्दन सेवाव्रत घडावे, हीच आमची इच्छा आहे. प्रस्तुत चरित्रावर प्रस्तावना लिहिण्याचा योग परमेश्र्वर कृपेने मला मिळाला ही एक प्रकाराची ईशकृपाच समजली पाहिजे. अशा प्रकारे अल्प प्रमाणतः कां होईना श्रीदत्तप्रभूंची सेवा करण्याचा लाभ वारंवार मजला मिळावा हीच श्रीदत्तमहाराजांचे चरणी माझी प्रार्थना आहे.

सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो ।

संतकृपाभिलाषी

( प्रथमावृत्तीची प्रस्तावना )

**नारायणशास्त्री वाडीकर**

नरसोबाचीवाडी

।। श्रीगणेशदत्तगुरूभ्योनमः ।।

# प्रथमावृत्तीचे प्रकाशकाचें निवेदन

कृष्णावेणीपञ्चगंगायुतिस्थं श्रीपादं श्रीवल्लभं भक्तहृत्स्थम् ।
दत्तात्रेयं पादुकारूपिणं तं वन्दे विद्यां शालिनीं संगृणन्तम् ।।१।।

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनारायणस्वामीमहाराज यांचे संस्कृत श्लोकात्मक चरित्र, मराठी भाषांतरासह छापून प्रसिध्द करण्याचा सुयोग आज श्रीगुरूप्रतिपदेचे दिवशीच येत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. भक्तवत्सल प्रभूची ही निर्व्याज कृपाच आहे यांत संशय नाही. सुमारे ६-७ महिन्यांपूर्वीच हे चरित्र हाती आले. त्याचवेळी ते छापण्याची तयारीही झाली. परंतु पुण्यावर कोसळलेल्या आकस्मिक जलप्रलयाच्या आपत्तीमुळे हे संकल्पित कार्य स्थगित करावे लागले. आज ईशकृपेने हा संकल्प पूर्ण होत असल्याचे पाहून समाधान वाटते.

सद्गुरू श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी नक्षत्रमालिका नांवाचे एक श्रीदत्तप्रभूंचे स्तोत्र केले आहे. त्याच्या शेवटी ते लिहितात. 'या सप्तविंशतिश्लोकैः कृता नक्षत्रमालिका । तद्भक्तेभ्योऽर्पिता भक्ताभिन्न श्रीदत्ततुष्टये' (ही सत्तावीस श्लोकांनी तयार केलेली नक्षत्रमालिका भक्ताभिन्न श्रीदत्त संतुष्ट व्हावेत म्हणून त्यांच्या भक्तांना मी अर्पण करीत आहे.) याप्रमाणे तें नक्षत्रमालिका स्तोत्र दत्तभक्तांना, श्रीमहाराजांनी अर्पण केले असून, यामुळें श्रीदत्तांचा संतोष निश्चित होईल असे सुचविले आहे. म्हणून स्वतः श्रीदत्तमहाराजांनी ज्यांना संन्यासदीक्षा देऊन कृतार्थ केले अशा भक्तराज श्रीनारायणस्वामींचे चरित्र प्रकाशित करण्याचे निमित्तानेही श्रीदत्तगुरूंचीच प्रिय सेवा घडत आहे हाही एक विशेष समाधानाचा अंश या प्रकाशन कार्यात आहे.

आमचे एक पूर्वज श्री. नागेश गुळवणी, हे श्रीनारायणस्वामींचे परमभक्त होते. त्यांना प्रथम संतति नव्हती. त्यांनी श्रीनारायणस्वामींची प्रार्थना केली असतां श्रीमहाराज म्हणाले की, 'तुम्हाला मुलगा होईल. पण त्याने आमच्या मठांत येऊन श्रींची पूजा-सेवा केली पाहीजे.'

श्रीमहाराजांच्या आशीर्वादाने श्रीनागेशभटजींना मुलगा झाला. पुढे उपनयनोत्तर तो श्रींचे मठांत सेवाही करण्यास राहीला. पुढे आमच्या वंशातच अशा प्रथा किंवा कुलाचार होता की, वडील मुलाने उपनयनोत्तर विवाह होईपर्यंत श्रींच्या मठांत राहून सेवा करावी. याप्रमाणे कोल्हापूर येथील अंबाबाईचे मंदिरांतील श्रींच्या मठांत सेवेकरीता आमचे वडील दोघे-तिघे बंधु क्रमाने राहीले होते. आमच्या हातून तशी विशेष सेवा घडली नाही म्हणूनच की काय श्रीनारायणस्वामींमहारांजांनीं, ही चरित्रप्रकाशनरूप सेवा, आमच्या हातून करून घेण्याची कृपा केली असावी असे वाटून अत्यंत समाधान होत आहे.

श्रीनारायणस्वामींमहाराजांची तपोभूमि, श्रीनृसिंहवाडी हे दिव्य क्षेत्र आहे. ज्या ठिकाणी श्रीनृसिंहसरस्वती दत्तप्रभूंचा वास बारा वर्षे झालेला आहे. याच ठिकाणी पूर्वाश्रमात राहून श्रीनारायणस्वामीमहाराजांनी श्रीदत्तगुरूंची अनन्यभावाने सेवा केली. त्यामुळे स्वतः श्रीदत्तगुरूंच्याकडूनच संन्यासाश्रमदीक्षेचा लाभ होऊन श्रीनारायणस्वामीमहाराज जीवन्मुक्त झाले. हा परमभाग्यवंतांच्या भक्तीचा महिमा सद्गुरू श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी स्तोत्ररूपाने गाईलेला आहे. त्यातील उपक्रम श्लोक असा आहे की,

## ‘कृष्णापञ्चनदीयोगऽभ्यर्च्य श्रीदत्तपादुके ।
## भक्तया नारायणस्वामी जीवन्मुक्तोऽधुनाभवत् ।’

कृष्णापंचगंगासंगमावर असणाऱ्या श्रीदत्तपादुकांच्या अर्चनभक्तीने श्रीनारायणस्वामी या कलियुगातही जीवन्मुक्त झाले - याप्रमाणे सगुण परमात्म्याच्या भक्तीचें श्रीनारायणस्वामींचे चरित्रावरून सर्वांना कळून यावे आणि सर्वानी आपल्या मानव जन्माचे सार्थक, भगवत्कृपा संपादून करावे याच सद्गुरू श्रीटेंबेमहाराजांच्या सूचित उद्देशास अनुसरून हे दिव्य चरित्र प्रकाशित करण्यात येत आहे.

प्रस्तुत चरित्र संस्कृतश्लोकरूपाने तयार करून व त्याचें मराठी भाषांतरही करून ते नृसिंहवाडी येथील पुजारीकुलोत्पन्न ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे यांनी आमच्याकडे प्रकाशित करण्याकरिता निरपेक्षबुध्दीने दिले. त्यांनी हे चरित्र तयार करून बरीच वर्ष झाली. त्याच्या आधी आमचे जेष्ठ बंधू पुर्वाश्रमीचे श्रीशंकरशास्त्री गुळवणी यांनी मराठीत हे चरित्र संक्षेपाने संकलित करून ठेवले होते. ते प्रतिवर्षी चैत्र मासात श्रीनारायणस्वामींचे उत्सव समयी वाडीस सेवेकरीता येत असत. पूर्वीही ते वाडीस पूज्य मातोश्रींसमवेत सेवेकरीता राहीले होते. त्यावेळी श्रीदत्तगुरूजींनी पूज्य मातोश्रींना फक्त तीर्थ देऊन असाध्य रोगापासून कसे मुक्त झाले त्यावरून स्मर्तृगामी श्रीदत्तदेवांचे भक्तवात्सल्य लक्षात येण्यासारखे आहे. या चरित्रप्रकाशनाने पूज्य वडील बंधूचीही सदिच्छापूर्ति होण्याचा योग आलेला आहे. ब्रह्मश्री आत्मारामशास्त्रीजी जेरे, हे ‘की पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ताराजर्षयस्तथा’ या भगवदुक्तीप्रमाणे ईशकृपापात्र असून, कर्म, भक्ति व ज्ञान या तीनही योगांचा सुमधूर संगम त्यांच्या जीवनात झालेला आहे. विशेषतः ते श्रीदत्तप्रभूंचे पूजककुलोत्पन्न असून श्रीगुरूभक्तप्रभृति भगवत्सेवकाप्रमाणे आपल्या कुलास भूषणभूत आहेत. ‘पोषणं तदनुग्रहः’ या खास भगवत्कृपेचे ते अधिकारी असून, ‘यस्यां न मे पावनभंग कर्म ......... वन्ध्यां गिरतां बिभृयान्न धीरः’ या भगवदुक्तधीरतेचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. त्यांच्या वाङ्मय तपाचे परिपक्व सुरस फलरूप हे श्रीचरित्र निर्माण झाले आहे. आम्हांला तर असे वाटते की, ‘निःस्तुतिर्निर्नमस्कारः’ अशा वीतरागस्थितीतच नित्य राहून केवल प्रभुभजनानंदाचाच आस्वाद घेऊ इच्छिणारे, इतकेच नव्हे तर त्याकरितां श्रीदत्तप्रभूंबरोबर परभक्तिरूपकलह करून, भक्त महात्म्य प्रकाशनाबद्दल असणारा सर्वेश्वराचा अमोघसंकल्पही स्थगित करणारे भक्ताग्रणी श्रीनारायणयतिराज, यांच्या चरित्राचें प्रकाशन आता आपणच केले पाहीजे असे वाटून त्या सर्वांतर्यामी श्रीदत्तमातेनेच ब्रह्मश्री आत्मारामशास्त्रीजींच्या मुखानें हें महात्म्य वदवून आपला पूर्वीचा संकल्प पूर्ण केला असावा. अशा विविध हेतूंनी भगवत्प्रेंरणेने हे प्रकाशन कार्य घडून येत आहे.

या पुस्तकांत, चरित्राचे मराठी भाषांतरही चरित्रलेखकांनेच, संस्कृतानाभिज्ञ सद्भक्ताकरिता दिलेले आहे. श्रीनारायणस्वामीमहाराज रोज जे भजन करीत होते ते त्यांचे भजनही शेवटी छापले आहे. श्रीनारायणस्वामींचे उत्सवसमयी नृसिंहवाडी येथे म्हटल्या जाणाऱ्या काही आरत्या, श्रीपादाष्टक व श्रीनारायणाष्टक ही ही जोडली आहेत.

या ग्रंथावर प्रस्तावना लिहिण्याबद्दल नृसिंहवाडी येथील प्रसिध्द विद्वान, तपोवृध्द, ब्रह्मश्री नारायणशास्त्री वाडीकर यांना प्रार्थनापत्र पाठविले होते. त्याचप्रमाणे त्यांनी योग्य प्रस्तावना अल्पावधीतच लिहून पाठवीली. तसेच ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे यांनीही स्वकृत चरित्र, प्रकाशनाकरितां, कोणतीही अट न घालता दिले व वेळोवेळी संशोधनादि विविध साहाय्यही अत्यंत आत्मीयतेनें केले. तसेंच श्रीदत्तमहाराज व तदभिन्न संतशिरोमणि श्रीमौनिस्वामीमहाराज यांच्या परमानुग्रहास पात्र झालेल्या कवीश्र्वरांच्या कुळांत आपल्या राहीलेल्या सत्कार्याकरितां पुनः प्रकट झालेल्या वक्रतुंड महाराज कवीश्र्वर स्वरूपी न्यायवेदान्तादिसर्वशास्त्रनिष्णात विद्यावाचस्पती या सार्थपदवीने विभूषित अमानित्वादिगुणालंकृत दत्तात्रेयशास्त्री कवीश्र्वर यांनीही या ग्रंथाच्या शुध्दीकरणादि सर्वच कार्यात श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती ग्रंथप्रकाशनाप्रमाणेच अत्यंत आत्मीयतेंने साहाय्य केलें याबद्दल श्रीदत्तस्वरूप या पंडितत्रयांचा मी आभारी आहे.

## ।। श्री नारायणस्वामी चरित्र ।।

हे प्रकाशनकार्य श्रीगुरूप्रतिपदेसच घडून येण्याकरितां प्रेसचे व्यवस्थापकांनीही फार परिश्रम घेऊन ठरलेल्या मुदतीत हे मुद्रण कार्य पार पाडले याबद्दल तेही धन्यवादास पात्र आहेत. श्रीपाद दत्तात्रय देशपांडे, श्री. नखात इ. सात्विक साधकांनीही हे कार्य पार पाडण्याकरितां, प्रुफे तपासणें, कॉपी लिहिणे इ. रूपाने अहर्निश प्रयत्न करून दक्षतेनें हे काम पार पाडले या त्यांच्या सेवेबद्दल श्रीनारायणस्वामीमहाराज त्यांचे पूर्ण कल्याण करण्यास समर्थ आहेत.

'असोनि सर्वत्र गुरूप्रसादाविना न लाभे करिताही खेदा । भेदाची वार्ता करी जो अपार्थ, तो पूर्ण आनंद गुरूसमर्थ' याप्रमाणें सद्‌गुरू श्री वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज गुरूस्वरूपांचे महात्म्य वर्णन करीत आहेत. गुरूप्रसादानेच ईश्र्वराची सर्व व्यापकता, श्रीनामदेवासारखे श्रेष्ठ भक्त जाणू शकले हें प्रसिध्द आहे. गुरूप्रसाद मिळविण्याकरिता काय साधनें करावीत, साधकानें सिध्दावस्था प्राप्त झाल्यानंतरही भगवत्प्रेमातच कसें रंगून जावें, ज्ञानी पुरूष, सगुणनिर्गुण उभयानंदाचा आस्वाद घेत राहूनही, लोकसंग्रहादि व्यवहारही भगवत्प्रेरणेनें किती चोख रीतीने पार पाडू शकतो, भगवद्‌भक्तांचे ठिकाणी, अमानित्वादी ज्ञानसाधनांचा व अभयसत्वसंशुध्द्यादि दैवी संपत्तीचा विकास, केवळ भगवद्‌कृपेनेंच कसा होतो इत्यादि अनेक विषयांचे ज्ञान या चरित्र्याचे चिंतनानें सहज होईल. स्वकर्मसूत्राने जखडलेल्या जीवांना हे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. ते करुन देण्याकरितांच श्रीभगवंताचे व भगवद्विभूतिरुप संतांचे अवतार वेळोवेळी या भारतवर्षात होऊन राहीले आहेत. 'सन्निकर्षोऽन्नत्र्यानामनादरणकारणम्' अशी कांहीशी स्थिती दुर्दैवाने आज भारतवर्षात दिसून राहीली आहे. ती दूर होऊन, 'ददामि बुध्दियोगं तं येन मामूपयान्ति ते' अशा भगवत्कृपेची पात्रता अधिकारी सज्जनांना ईशकृपेनें लाभावी आणि 'दुरितांचे तिमिर जावो । विश्र्वस्वधर्म सूर्ये पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।१।। चन्द्रमे जे अलांछन मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतूं ।।२।। किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होवोनि तिहीलोकी। भजिजो आदिपुरूषी अखंडित ।।३।।

हे महापुरूषाचें पसायदान सफल करून हें दिव्यचरित्र प्रकाशन कार्य सफल होवो हीच त्या सर्वधीप्रेरक सर्वेश्र्वर श्रीनारायणाजवळ शेवटी प्रार्थना आहे.

श्रीगुरूचरणान्तेवासी
अध्यक्ष **वा. द. गुळवणी**
श्रीवासुदेवानंदसरस्वती
ग्रंथप्रकाशन मंडळ, २० नारायण पेठ,
पुणे २.

माघ कृष्ण गुरूप्रतिपदा
शके १८८३
मंगळवार दि. २०-२-६२

# नारायणस्वामींचें अष्टक

रूद्राक्षभस्मं धृतरक्तवासं । कमंडलुं दंडकरेषु पद्मं । शंखं च चक्रं च गदायुधानि नारायणं त्वां शरणं प्रपद्ये ।।१।। योगीशमत्रं करूणेशपात्रं । सुपद्मनेत्रं च प्रहास्यवक्त्रं । दैदीप्यमुर्ति प्रभया विराजं ।। नारा. ।।२।। उध्दूलनं भस्मविभूषणांगं । स्वभक्तइच्छं परिपूर्णचंद्रं । कृष्णातटाकंस्थितिभूप्रकाशं ।। नारा. ।। ३ ।। आरक्तवस्त्रं मौक्तिकरूद्रहारं । करौ धृतं दंडकमंडलुं च । योगासनारूढसुरैकवंद्यं ।। नारा. ।।४।। आनंदमूर्ति यतिराजकीर्ति । गातं यशस्कं तव योगस्फूर्ति । भूलोकसारं शरणैककार्य ।। नारा. ।।५।। विश्र्वैकसारं तव नाम पारं । परात्परावर्णितविश्र्वधारं । करं स्वकार्य तव नाममाद्यं ।। नारा. ।।६।। नाथादिनाथं जगतादिनाथं । कारूण्यपूर्ण श्रुतिवर्गधीतं । भावब्धिपोतं करूणासमुद्रं ।। नारा. ।।७।। शांतादि दांतादि सुरादिध्यातं । कृपानियुक्तं मदनांतततातं । जगत्प्रपूर्ण यतिराजराजम् ।। नारा. ।।८।। ब्रह्मादि ब्रह्मं मुनिब्रह्मनामम् । ब्रह्मं तवैनाममहत्प्रब्रह्मम् । ब्रह्मादिकास्तौतिमहर्निशिं च ।। नारा. ।।९।। नानावतारं धृतमब्जनेत्रम् । वेदादिवर्णं च जगत्प्रकाशम् । कालादिकालम् । यतिराजवर्यम् ।। नारा. ।।१०।। अष्टकं च पठेद् भक्त्या महादुःखभयं हरेत् । यस्त्रिसंध्यं जपेन्नित्यम् मुक्तो भवति निश्र्चयः ।। नारायणस्वामींचे अष्टक समाप्त ।। ११ ।।

# श्रीदत्तात्रेयांचे अष्टक

वेदांतवेद्यो वरयोगिरूपम् । जगत्प्रकाशम् सुरलोकपूज्यम् । इष्टार्थसिध्दिं करूणाकरेशम् । श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ।। १ ।। योगीशरूषं परमात्मवेषं । सदानुरागं सहकार्यरूपम् । वरप्रसादं विवुधैकसेव्यम् ।। श्री. ।। २।। काषायवस्त्रं करदण्डधारिणं । कमंडलुं पद्मकरेण शंखं । चक्रंगदाभूषितभूषणाढ्यं।। श्री.।। ३।। भूलोकसारं भुवनैकनाथं। नाथादिनाथं नरलोकनाथं । कृष्णावतारं करूणाकटाक्षं ।। श्री. ।४।। लोकाभिरामं गुणभूषणाढ्यं । तेजोमुनिश्रेष्ठ मुनिर्वरेण्यम् । समस्त दुःखानि भयानि शांतम् ।। श्री. ।।५।। श्रीकृष्णावतीरं वसतिप्रसिध्दं । श्रीपादश्रीवल्लभ योगिमूर्तिं । सर्वेजनाश्र्चिंतितकल्पवृक्ष ।। श्री. ।।६।। मंत्राब्धिराजं यति राजपूज्यं । त्रैलोक्यनाथं जनसेव्यनाथं । आनंदचित्तं अखिलात्मतेजं ।। श्री. ।। ७ ।। मंत्रानुगम्यं महनिर्मितेजं । महत्प्रकाश महशांतमूर्तिं । त्रैलोक्यचित्तं अखिलात्मतेजं ।। श्री. ।। ८ ।। श्रीपाद अष्टकमिद ं पुण्यं । प्रातरूथ्थाय यः पठेत् । कोटिजन्म कृतं पापं स्मरेणन विनश्यति ।।९ ।।

★★★

।। श्री ।।

# अध्याय पहिला

दुर्लभंत्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम्
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरूषसंश्रयः ।।

( विवेक चूडामणिः )

भगवत्पूज्यपादश्रीमदाचार्यांनी आपल्या विवेक चूडामणि नांवाच्या परमश्रेष्ठ प्रकरण ग्रंथांत वरील श्लोक लिहिला आहे.

ते असें म्हणतात की, या अखिल ब्रह्मांडांत सर्व गोष्टी सुलभ म्हणजे सहज प्राप्त होण्यासारख्या आहेत. परंतु मनुष्याला मुमुक्षुत्व व महापुरूष म्हणजे भगवान् किंवा भगवद्भक्त संत यांचा आश्रय अत्यंत दुर्लभ आहे.

पूर्वीच्या अनेक जन्मांत संपादन केलेली पुण्याई फलोन्मुख होऊन अनंतकोटिब्रह्मांडनायक परमात्म्याचा जीवावर अनुग्रह झाला तरच मोठ्या कष्टानेंही न प्राप्त होणाऱ्या या तीन गोष्टी प्राप्त होतात. मग शुची किंवा श्रीमान् अशा कुळांत किंवा त्याहूनही श्रेष्ठ निष्काम कर्मयोगी भगवद्भक्त, योगी किंवा ज्ञानयोगी अशा परमपवित्र संतांच्या कुळांत या जीवाला जन्म मिळतो.

या कुळातील प्रायः सर्वच माणसें कर्म, ज्ञान, भक्ती यांपैकी कोणत्या तरी मार्गावर आरूढ असून भगवदुन्मूख अशीच असतात. लहानपणापासूनच त्यांची संगति, त्यांच्या आचार - व्यवहाराचे वळण व त्यांच्या विचाराचा प्रभाव या कुळांत जन्मलेल्या व्यक्तीला लाभून परमार्थ मार्गांतील प्राप्त झालेल्या मुक्कामाहून पुढच्या मुक्कामास जाऊन अखेर तो इष्टस्थळी जाऊन पोचतो व कृतकृत्य होतो.

हजारो उपदेशपर व्याख्यान-प्रवचनानें न होणारा लाभ यांच्या अमूल्य आचरणानें त्याला होतो.

मदालसा, चूडालादि सन्महिला व सर्व सत्पुरूष यांच्या चरित्राकडे पाहिले असतां हाच अर्थ स्पष्ट होतो. कांही कारणांनी प्रतिबध्द झालेलें यांचे शुभकर्म प्रतिबंधनिवृत्ति होऊन फलोन्मुख होते व पौर्वदेहिक बुध्दिसंयोगाचा लाभ होऊन बुध्दीवर आलेंले मोहपटल दूर होऊन ‘हियतेह्यवशोऽपि सः’ म्हणजे जबरदस्तीने यांना कोणीतरी खेचून खऱ्या सन्मार्गावर आणून पोचवितो व त्यायोगें त्यांचे परम कल्याण होतें. म्हणून कल्याणेच्छु मानवांनी नेहमी सत्संगति, सच्छास्त्र व सद्वासना यांच्याकडेच आपल्या चित्ताला वळवीत असावे, त्यायोगें दुर्लभ असणाऱ्या मनुष्यत्व, मुमुक्षुत्व व महापुरूषसंश्रय अशा तीन वस्तूंचा लाभ त्याला झाल्याशिवाय रहात नाही. या वस्तूंचा लाभ झाल्यावर आपला स्वतःचा उध्दार करून सर्व जगाचा उध्दार करण्यास तो मानव समर्थ होतो.

आजपर्यंत या जगांत जे अनेक संत - महात्मे झाले; त्यांच्या चरित्रांचे सूक्ष्म दृष्टींने अवलोकन केलें असतां हेंच तत्त्व त्यांच्या चरित्रांतून आपल्यास अनुभविण्यास मिळतें. सुमारें दीडशें वर्षांपूर्वी होऊन गेलेले संतशिरोमणि श्रीमन्नारायण स्वामीमहाराज यांच्या चरित्रांतही हीच गोष्ट आढळून येते.

संत तुळशीदास, बिल्वमंगल अथवा सूरदास यांच्या प्रपंच-वासना म्हणजे दुर्वासना जागृत होऊन त्या मार्गाला हे लोक लागणार तोंच भगवत्कृपेनें त्यांना तिकडून खेचून सन्मार्गाला लावले व आत्मोध्दार व नंतर जगदुध्दार अशी मोठीं कार्ये त्याच्याकडून करवून घेतली. प्रसंग, इतिहास व परिस्थिति जरी संतांची वेगवेगळी दिसली तरी सर्वांत तत्त्व एकच आहे व तें म्हणजे दुर्लभ अशा तीन गोष्टींचा लाभ, स्वात्मोध्दार व जगदुध्दार हेंच आहे.

हेंच स्पष्ट करण्याकरितां दृष्टांत म्हणून प्राकृत स्थळी महाराष्ट्र वाचकांकरितां संस्कृतांत असलेल्या नारायणस्वामी महाराजांच्या चरित्रांचे मराठी भाषेंत तात्पर्य देण्याचे ठरविलें आहे. त्यायोगे प्राकृत पण अधिकारी माणसास आपण काय केले असतां आपलें कल्याण होईल, याचा बोध या चरित्रावरून घेतां येईल व तसें झाल्यास संस्कृत किंवा प्राकृत चरित्र लिहिण्याचें सार्थक्य झाल्यासारखे होणार आहे.

वास्तविक पाहिलें असतां त्यांचे चरित्र त्यांनीच कृपा करून सांगितलें असतां समग्र व यथार्थपणें तें कळण्यासारखें आहे व खरे समाधान त्यांतच होणार आहे; परंतु तशी योग्यता आमच्या ठिकाणी नसल्यानें व दूध मिळणें शक्य नसल्यास दुधाची तहान ताकाने भागवावी या न्यायाने ज्या गोष्टी जितक्या प्रमाणांत परंपरेनें आमच्यापर्यंत आल्या तेवढ्याच यथामति येथे ग्रंथित केल्या आहेत. नाइलाजास्तव जिज्ञासूंनी संतुष्ट व्हावें अशी त्यांना प्रार्थना आहे.

आतां श्रीमन्नारायणस्वामी महाराजांच्या चरित्राकडे आपण वळूं. नारायणस्वामींचा जन्मकाळ व जन्मस्थळ हे जरी माहीत नसले तरी त्यांच्या शिष्यकोटीत प्रविष्ट अर्थात् तत्समान कालीन पुजारी कुलोत्पन्न व गुरूभक्त या नांवाने प्रसिध्द असलेलें ढोबळे या टोपण नांवाने युक्त कुलोत्पन्न पुरूषाचे पूर्वज यांनी केलेल्या नारायणस्वामींच्या आरतीत "सप्तविंशति शके सत्राशे वर्षी । विमानि बैसुनि गेले वैकुंठी हर्षी ।।" असा व "मधु इंदु अमावास्या" असा उल्लेख यांच्या समाधिकालाबद्दल केला आहे. श्रीमत्परमहंसपरीव्राजकाचार्य प्रातःस्मरणीय श्रीमद्वासुदेवानंद सरस्वतीस्वामिचरणांनी केलेल्या नारायण स्वामींच्या दिव्य चरित्रांत "शालिवाहन शके १७२७ भसप्तभूसंमिते सुमधुमास्यमातिथौ" असा उल्लेख केला आहे. त्यावरून नारायणस्वामींचा समाधिकाळ नक्की शालिवाहन शके १७२७ चैत्र वद्य अमावास्या सोमवारी आहे यांत शंका नाही. हल्लीही त्यांचे वंशज त्याच तिथीस त्यांची आराधना नरसोबाचे वाडीस येऊन त्यांच्या मठांत म्हणजे नारायणस्वामींचे देवळांत करीत असतात हे प्रसिध्द आहे व श्री टेंबेस्वामीमहाराज पूर्वाश्रमांत यांच्या उत्सवाकरतां प्रतिवर्षी माणगांवाहून वाडीस येत असत. ही गोष्ट त्यांच्या चरित्रांत प्रसिध्द आहे. हल्ली १८३३ शालिवहन शके प्लव नामसंवत्सर चालूं आहे त्यातून समाधि शक वगळला असतां प्लव संवत्सरांतील चैत्र वद्य अमावस्येस नारायणस्वामींची समाधी होऊन एकशे छप्पन्न ( १५६ ) वर्षे होतात.

शिवावतार श्री. चिदंबर दीक्षित व नारायणस्वामी यांची देवलपुरांत भेट झाल्याचे व उभयतांचा एकत्र तीन महिने सहवास, वेदान्त चर्चा वगैरेचे वर्णन चिदंबर चरित्रांत असल्यानें दोघेही समानकालीन होते हे निश्चित आहे. शके १६५० नंतरच्या काळांत नारायणस्वामी महाराजांचा जन्म अंदाजे धरावा लागतो. विसापूरच्या जोशांच्या कुळांत यांचा जन्म झाला असें चरित्रांत वर्णिले आहे. "पुत्र्यावादाय भिधुरः करनाटक देशतः" म्हणजे दोन मुलींना घेऊन पत्नीच्या निधनानंतर नरसोबाचे वाडीस येऊन ते श्रीदत्ताची उपासना करीत राहिले. असा उल्लेख श्री टेंबे स्वामीमहाराजांनी केलेल्या चरित्रांत असल्याने कर्नाटक देशांतील हे 'विसापूर' असावें असें सामान्यतः अनुमान काढतां येईल. यांचे गोत्र 'गार्ग्य' असून यांचे वडील देशस्थ ऋग्वेदी प्रसिध्द याज्ञिक होते. वडिलांचे नांव ( शंकरशास्त्री गुळवणी ) यांनी उल्लेखिले नाही; मातोश्रीचें नांव "भीमा" असें लिहिलें आहे.

## ।। अध्याय पहिला ।।

दत्तात्रय, श्रीपाद, नरहरी व नारायण अशी चार मुलें भीमाबाईला झाली. त्यातील आमचे चरित्रनायक नारायणस्वामी हे भीमामातेचे चतुर्थ पुत्र होत. नारायणाच्या मौजी बंधनानंतर वडीलांनी यांना वेद व शास्त्र पाठशाळेंत पाठवून यांच्याकडून वेद शास्त्राचा चांगला अभ्यास करविला व नारायण हे वेदशास्त्रसंपन्न अशा खऱ्या अर्थाने विभूषित झाले. यांची योग्यता व कीर्ती ऐकून, कोणी सद्‌गृहस्थांनी यांना आपली कन्या दिली. परंतु लवकरच ती स्वर्गवासी झाली. हें जाणून व योग्य वर आहे असें मनांत आणून करवीर इलाख्यातील 'तारळे' गांवातील राम दीक्षीत गुळवणी, नावाच्या कोणी सद्‌गृहस्थांनी आपली उपवर कन्या यांना दिली. अर्थात् नारायणशास्त्र्यांचा हा दुसरा विवाह होय.

या पत्नीपासून यांना तीन अपत्यें झाली. त्यांत विश्र्वंभरशास्त्री हे वडील चिरंजीव व नंतर दोन कन्या झाल्या. दुसऱ्या विवाहनंतर नारायणशास्त्री हे विसापुरातच गार्हस्थ्यधर्मानुष्ठान व वेदशास्त्र पठनादि करीत मोठ्या आनंदाने आपला काळ घालवू लागले. अर्थातच त्या प्रांतात मोठे शास्त्री म्हणून यांची प्रसिध्दी झाली व विद्वज्जनांत यांचे नांव श्रेष्ठपणें ऐकूं येऊं लागले. एकेवेळी विद्वज्जनांचे माहेरघर असणाऱ्या पुण्यपत्तनांत एक मोठी विद्वत्सभा झाली. ठिकठिकाणाहून अनेक पंडित आपल्या पांडित्याचा परिचय देण्याकरतां त्या सभेस आले होते. आमचे नारायणशास्त्रीहि निमंत्रणावरून त्या सभेस गेले होते. सभेंत शास्त्र चर्चा चालू असतां प्रतिपक्षांनी यांच्यावर कोटि करून यांचा पराजय केला; त्यामुळे त्यांचे मन अत्यंत खट्टू झाले. आजपर्यंत अध्ययन-अध्यापनांत अहोरात्र काळ घालवून अखेर सभेंत पराजय होण्याचीच पाळी आली हें कांही बरें झालें नाही असें त्यांना वाटले.

आता आपण सर्व शास्त्रांत अशी निपुणता संपादावी की, ज्यायोंगे सभेंत आपला कधीहि पराजय होऊ नये; त्याकरतां आपण पंडित श्रेष्ठ गुरूचा आश्रय केला पाहीजे. असें ठरवून काशी क्षेत्र हें अनादिकालापासून सर्व विद्येचें पीठ आहे, सर्व विद्या निधान असणाऱ्या विश्र्वेश्र्वरांची ती राजधानी आहे, बृहस्पतीबरोबरसुध्दा वाद करण्यास समर्थ असणारे व सरस्वतीचा पूर्ण अनुग्रह झालेले पंडित तेथे वास्तव्य करून पठन-पाठनांत सर्व काळ मग्न झालेलें आहेत, शास्त्र पठन-पाठन हीच तपश्र्चर्या असा त्या पंडितांचा त्रिकालबाधित सिध्दांत आहे, सर्व जगत्पावनी व पृथ्वीचे सौभाग्य रूप गंगामाता ज्या क्षेत्रांत अखंड जागृत असून भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण करीत विराजमान आहे, जेथें विद्यार्थीवर्ग शास्त्राध्ययनांत व शास्त्रचर्चेत सर्वदा गढून गेला आहे, अन्नपूर्णा माता सर्वांनाच अन्नाची पूर्तता करण्याकरतां सर्वदा सिध्द आहे. तरी आता सर्व मोह दूर सारून आपण काशीस जावे व कोठेहि आपला पराजय न होईल अशी विद्या संपादन करावी व प्रकाण्ड पंडित व्हावे असा निश्र्चय नारायणशास्त्री यांनी आपल्या मनांत केला. ते मनांत असे म्हणालें की, हा जो या सभेंत माझा पराजय झाला, तो खरोखरीच माझ्या उत्कर्षाकरताच झाला आहे; नाहीं तर कूपमंडूक न्यायानें मी एवढ्यावरच संतुष्ट राहून आपणांस कृतकृत्य व धन्य मानणार होतो. देवानेंच हा सर्व योग घडवून आणला आहे यांत शंका नाही.

गंगास्नान, विश्र्वेश्र्वर दर्शन व शास्त्रपठनपाठन असा दुहेरी तिहेरी लाभ व दिंगत पांडित्य असे सर्वच कल्याण यांत आहे. याप्रमाणे विचार करून नारायणशास्त्री पुण्याहून घरी आले. आपल्या पत्नीस सर्व विचार सांगून तिचे पूर्ण समाधान करून, आपला मुलगा विश्र्वंभर व साध्वी पत्नी यांना आपल्या आप्तांचे घरीं ठेवून हृदय दगडासारखें कठीण करून शास्त्रीबुवा काशी क्षेत्रांत अध्ययन करण्यासाठी गेलें.

जे शब्दब्रह्मात परब्रह्मात निष्णात आहेत, ज्यांची पांडित्याबद्दल दिगंत कीर्ति आहे, पंडिताग्रेसर असे ज्यांचे अनेक शिष्य आहेत, जे परम शांत व शिष्यकल्याणकारक आहेत अशा विश्र्वविख्यात सद्‌गुरूंना नारायणशास्त्री शरण गेले. सद्‌गुरूंनीहि यांची योग्यता, बुध्दिमत्ता व शास्त्राध्ययनाबद्दल उत्कट इच्छा पाहून यांना आश्रय दिला. शास्त्रीबुवांनी अपराजित प्रकाण्ड पांडित्याकडे दृष्टि ठेवून बरीच वर्षे अहोरात्र झटून अध्ययन केलें व सद्‌गुरूंच्या सर्व शिष्यांमध्ये ते अग्रेसर व गुरूप्रिय झाले. वादांत तर यांच्यापुढें कोणाचाही टिकाव लागत नसे.

आतां वादांत कोणासही आपण हार जाणार नाही अशी खात्री नारायणशास्त्री यांना झाली. आतां आपण धन्य व कृतकृत्य झालों असें त्यांना वाटूं लागले. इकडे सद्गुरूंनी नारायणाचे मनांतील उद्देश, त्यांचे विचार, त्याच्या सहाध्यायाकडून व स्वतःचे अंतर्ज्ञानाने जाणून नारायण याच मार्गाने गेल्यास त्याचा अधःपात होईल, माझ्या शिष्याने अधोगतीस जाणें परंपरेने माझीच ती अधोगति आहे, तरी आतां याला खरा कल्याणाचा मार्ग दाखवून याचा उध्दार करावा असा आपल्या मनांत विचार केला. नारायणाचा भाग्योदयच जवळ आल्यानें सद्गुरूंच्या मनांत हा विचार आला असें म्हणण्यास हरकत नाही.

एके दिवशी नित्याप्रमाणें नारायणासहित गुरूमहाराज गंगेच्या घाटावर स्नानाकरतां गेले. गुरूशिष्यांनीं स्नानसंध्यादि आन्हिक आटोपलें. नारायणांनी गुरूमहाराजांची वस्त्रें धुवून आपले खांद्यावर टाकली व पात्र भरण्याकरितां तो गंगा प्रवाहांत उतरला.

तें पाहून गुरूमहाराज नारायणास म्हणाले, "नारायणा ! आपल्या देश, स्त्रीपुत्रादि सर्वपरिवार सोडून तूं अध्ययनासाठी येथें बरीच वर्षे राहिलास. तुझी अध्ययनाची इच्छा पूर्ण झाली की नाही ?"

हा गुरूंचा प्रश्न ऐकून नम्रपणें नारायणशास्त्री म्हणाले, "महाराज ! शास्त्र अनंत आहे व माझी बुध्दि अत्यल्प आहे. संपूर्ण शास्त्राध्ययन अनेक जन्मांतही संपणार नाही. माझ्या अल्पमतीच्या मानाने मला अपेक्षित असलेलें अध्ययन परिपूर्ण झाले असे मला वाटतें."

गुरूमहाराज म्हणाले, "तर आता अध्ययनपूर्तीकरतां कांही गुरूदक्षिणा देऊन तूं आपल्या गांवी जावेस असें आम्हास वाटते. स्त्रीपुत्र व आप्तजन आतुरतेंने तुझी वाट पहात असतील."

गुरू महाराजांचे हे वाक्य ऐकून नारायणशास्त्री म्हणाले, "महाराज माझ्या शक्तीप्रमाणें मी आपणास दक्षिणा देण्यास सिध्द आहे. कृपा करून काय ती आज्ञा व्हावी."

सद्गुरू म्हणाले, "नारायणा तुझ्या शक्तीच्याबरोबर आम्ही कांही मागणार नाही. तरी गुरूदक्षिणा देतो असें म्हणून तूं हातांतून गंगोदक संकल्पपूर्वक सोड."

सद्गुरूंचे वचन ऐकून नारायणशास्त्र्यांनी हातांत गंगोदक घेतलें व गुरूंना इष्ट असलेली दक्षिणा मी देतो असें म्हणून तें उदक गंगेत सोडलें.

ते पाहून आनंदाने गुरूमहाराज म्हाणाले, "नारायणा, आजपासून मरेपर्यंत कोणाशीहि वाद करायचा नाही. ही गुरूदक्षिणा आम्हास पाहिजे आहे व ही दक्षिणा तुझ्या शक्तीच्याबाहेरही नाही. तरी आनंदाने ती तूं आम्हास द्यावीस अशी आमची इच्छा आहे."

नारायणशास्त्र्यांनी कांही विचार न करतां मरेपर्यंत कोणाशीहि वाद करणार नाही ही दक्षिणा गुरूमहाराजांस मी आनंदाने दिली आहे अशी गंगेत उभे राहून प्रतिज्ञा केली व गुरूमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला.

दोघेही गुरूशिष्य कृतकृत्य होऊन परतले. नारायणशास्त्रांनी त्या दिवशी गुरूमहाराजांच्या घरांतच गुरूपंक्तीस गुरूप्रसादाचे सेवन केले. गुरूसेवा वगैरे झाल्यावर रात्रीं एकांतात शय्येवर बसून नारायणशास्त्र्यांनीं आपल्या एकंदर परिस्थितीचें सिंहावलोकन केले. ते मनांत म्हणालें, 'मी घरदार सोडून मोठ्या कष्टानें दिग्विजयी पांडित्य संपादनासाठी येथे आलो व तसे पांडित्यही मला सद्गुरूकृपेने लाभलें. परंतु गुरूमहाराजांनी गुरुदक्षिणेच्या निमित्तानें ते माझे पांडित्य हरण केले. जवळजवळ माझें सर्वस्वच यायोगें नाहींसे झाले यांत शंका नाही. द्रोणाचार्यांनी एकलव्याजवळ त्याचा अंगठा कापून मागितला व त्याला मृतवत् केलें; तसेंच मलाही गुरूमहाराजांनी केलें. आतां स्वदेशी जाऊन आपल्या बंधूंना व दक्षिणेतील विद्वानांना आपले तोंडसुध्दा दाखविणे लाजिरवाणें आहे. यापेक्षां आतां स्वदेशी न जातां आमरण काशीवास करूनच गुरूमहाराजांच्याजवळ रहावे हेंच बरें. अप्रतिष्ठितपणे स्वदेशी राहण्यापेक्षां गुप्तरूपाने मृतवत् येथे राहणेंच श्रेयस्कर आहे. माझें दैव विपरीत आहे त्याला कोण काय करणार ?" इत्यादि सर्वसाधारण अज्ञ माणसासारखे विचार पंडित असूनहि नारायणशास्त्रांच्या मनांत आले व तें अत्यंत खिन्न मुद्रेने एकांतात बराच वेळ बसून राहिले.

गुरूमहाराजांनी नारायणाची ही सर्व परिस्थिती अंतःश्र्चक्षूने जाणली व ते दयार्द्रहृदय होऊन नारायणाजवळ आले व म्हणाले, "नारायणा ! तुझी मुद्रा चिंतामग्न दिसतें, तुला मोठा खेद झाला असावा असें मला वाटते, तरी मनांत बिलकूल संकोच व धरतां मला सर्व वृत्तांत तूं सांग."

गुरूमहाराजांचे हे वचन ऐकून नारायणाने इत्यंभूत आपली सर्व हकीकत गुरूचरणी निवेदन केली व आतां येथेच राहण्याबद्दलचा आपला स्वतःचा निश्र्चयहि त्यांना सांगितला.

तें ऐकून गुरू म्हणाले, "नारायणा, ज्याची विद्या दुसऱ्याचा पराभव करण्याच्या कामीं उपयोगी पडते त्याला शास्त्रांनी 'खल' म्हणज दुष्ट अशी पदवी दिली आहे. दुष्टांचे इहलोकी अकल्याण व अयश होते व मरणानंतर त्यांना घोर नरकाची प्राप्ति होते. मोठ्या भाग्याने मनुष्य जन्म प्राप्त झाला असतां जो मनुष्य इहलौकिक व पारलौकिक कल्याण संपादन करीत नाही त्याला शास्त्रकार 'आत्महा' म्हणजे आत्महत्त्या करणारा असे म्हणतात. विशेषतः दुर्लभ असा ब्राह्मण जन्म प्राप्त झाला असतां जो मनुष्य ब्रह्मज्ञान संपादन करून कृतकृत्य व धन्य होत नाही त्याच्यासरखा मूर्ख जगांत दुसरा कोणी नाही. ब्राह्मणाचा देह मान-प्रतिष्ठादि विषय लाभाकरतां नसून तपश्र्चर्या,भगवद्भजनादि साधन करण्याकरतांच ईश्र्वराने दिला आहे. याच देहाने जीवन्मुक्तिसुखाचा सोहळा भोगून सहज झालेल्या देह त्यागानंतर अखंड नित्य निरतिशय ब्रह्मानंद अशा निजस्वरूपांत स्थित होणे हेंच ब्राह्मण देहाचें ध्येय आहे. भगवंतांनी उध्दवास एकादश स्कंधात मोठ्या कळकळीनें हाच उपदेश केला आहे. तिकडे प्रत्येकाने लक्ष देऊन तदनुसार आचरण केले पाहीजे. परमभाग्याने प्राप्त झालेले ब्राह्मण देहरूप मूल्यवान् रत्न फुकट दवडतां कामा नये."

याप्रमाणें गुरूमहाराजांचें अज्ञान अंधःकार दूर घालविणारें वचन ऐकून नारायणशास्त्र्यांचें अज्ञान समूळ नष्ट झालें व अंतःकरणांत ज्ञानज्योतीचा उदय झाला. मोठ्या भक्तिभावाने त्यांनी गुरूचरणाला साष्टांग नमस्कार केला व म्हणाले, "महाराज, मी आज खरोखर कृतकृत्य व धन्य झालों. आतां यापुढे मी कसें वर्तन ठेवावें हें श्रीचरणांनी कृपा करून सांगावें, म्हणजे त्याप्रमाणें वागून माझ्या देहाचें मी सार्थक करीन."

हें नारायणाचे वाक्य ऐकून गुरूमहाराज फारच संतुष्ट झालें व म्हणाले, "नारायणा ! तुझें भाग्य फार उत्तम आहे. एका वाक्यांतच तुझें अज्ञान दूर होऊन तुला बोध झाला. आतां तूं घरी जा. लवकरच कृष्णापंचगंगा संगमतीर निवासी अनंत कोटि ब्रह्मांड नायक भक्तकामकल्पद्रुम श्रीमन्नृसिंह सरस्वतिस्वामिमहाराज तुझ्यावर कृपा करून स्वतःच तुला चतुर्थाश्रम देतील व कृतकृत्य करतील. माझा पूर्ण आशीर्वाद तुला आहे;" असें बोलून त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून त्यांनी त्याला दृढालिंगन व मोठ्या प्रमानें नारायणशास्त्र्यांना घरी जाण्यास निरोप दिला.

## ।। अध्याय पहिला ।।

परमपूज्य संतश्रेष्ठ गुरूमहाराजांना सोडून स्वदेशी जाण्याचें नारायणशास्त्र्यांच्या अगदी जिवावर आलें; परंतु त्यांची आज्ञा व पुढील सर्व भविष्य जाणून हृदय कठिण करून गुरूजींची आज्ञा त्यांनी घेतली व ते स्वदेशी परत आले. पती आलेले पाहून साध्वी पत्नी व पुत्रादिकांना जो परमानन्द झाला त्यांचे वर्णन करणें अशक्य आहे.

नारायणशास्त्री काहीं दिवस तारळे गांवात आपल्या श्र्वशुरांच्या घरांत राहून नंतर विसापूर नांवाच्या आपल्या गांवात आले व तेथेच राहून औदासीन्यपणे आपला प्रपंचाचा गाडा हाकूं लागले. नारायणशास्त्र्यांना तेथे दोन कन्या झाल्या. त्यानंतर त्यांची पत्नी स्वर्गवासी झाली, पतीला जणूं तिने चतुर्थाश्रमाला परवानगी दिली असें म्हणण्यास हरकत नाही.

शास्त्रीबुवा त्यानंतर आपली तीन अपत्यें घेऊन विसापूर सोडून कोल्हापुरांस आले. विश्र्वंभर नांवाच्या पुत्राला पुण्यास आपल्या एका मित्राच्या घरी शास्त्राध्ययनाकरतां त्यांनी ठेविलें व दोन्ही मुली आपल्या आप्तांच्या घरात कोल्हापुरांतच ठेऊन ते तात्पुरते निरूपाधिक झाले.

चतुर्थाश्रमाची पूर्वतयारी करण्याकरता एकांतात भगवद्भजनच केलें पाहिजे असे मनांत आणून कोल्हापुरापासून जवळच दोनचार मैलावर असणाऱ्या कात्यायनीच्या रम्य व निर्जन अशा डोंगरांत देवी मंदिराजवळच एक झोपडी बांधून ते तेंथे भजनानंदाचा आस्वाद घेत राहिलें. तेथे राहून एकादशस्कंधात भगवंतांनी सांगितलेल्या “कृपालुरकृतद्रोह” इत्यादि साधुत्वलक्षणाचा व गीतेत सांगितलेल्या “अमानित्वमदंभित्वं” सद्‌गुणांचा त्यांनी तेथें उत्तम अभ्यास केला व हे सर्व गुण त्यांनी आपल्या अंगांत बाणविले.

नारायणस्वामींच्या चरित्रात पदोपदी हे सर्व गुण स्पष्टपणें आढळून येतात. अशी नारायणस्वामींच्या चरित्राची पूर्वपीठिकाच या पहिल्या अध्यायांत निरूपण केली असें म्हणण्यास हरकत नाही.

याप्रमाणें नारायणशास्त्री कात्यायनीच्या डोंगरांत भजनानन्दांत मग्न होऊन एकांतात राहू लागले. नारायणस्वामींच्या चरित्ररूप अमृत समुद्रातून या पहिल्या अध्यायांत सद्‌गुरूप्रसाद रूप पहिलें दिव्यरत्न प्रकट केले आहे तें घेऊन गुरूभक्त संतुष्ट होवोत.

**इति पूर्वपीठिका नांवाचा प्रथमोऽध्याय:** ।।ॐ **तत्सत्** ।।१।।

★★★

।। श्री ।।

# अध्याय दुसरा

मागील अध्यायांत नारायणशास्त्री कात्यायनीच्या डोंगरांत एकांतांत भगवद्भजनादि साधनानुष्ठान करीत राहिले असे सांगितले. त्यांचे साधनानुष्ठान निर्विघ्नपणें व उत्तम तऱ्हेंने तेथें चालू होते. त्याचवेळी कोल्हापुरांत जगदंबा महालक्ष्मीच्या मंदिरांत कोणी एक बाह्मण आपली इष्टकामना सिध्द होण्याकरतां तपश्र्चर्या करीत होता. या ब्राह्मणाने दिवसा पल्लवसहित सप्तशतीचा पाठ मोठ्या निष्ठेंने करावा व रात्री जगदंबेची मूर्ती मनांत आणून स्तोत्र पाठादि करावे. या प्रमाणे पुष्कळ काळ त्यांनी जगदंबेची उपासना केली. भगवदुपासना केव्हांहि व्यर्थ होत नाही. योग्यकाळी ती फलद्रूप होतच असते हा सिध्दान्त आहे. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाचा भाग्योदय काळ आला.

एके दिवशी रात्रीं एकांतात ब्राह्मण स्तोत्र पाठ करीत बसला असतां मध्यरात्र झाली. ब्राह्मण स्तोत्र पाठाच्या आनंदात मग्न आहे व सर्वत्र प्रशांत वातावरण आहे अशावेळी कोटि सूर्याप्रमाणें दैदीप्यमान असें एक दिव्यतेज त्या ब्राह्मणाच्या समोर आले व त्यांतूनच 'वरंब्रूहि' म्हणजे 'वर माग' असा आवाज निघाला. ब्राह्मण त्या तेजाला पाहून दुर्दैववशात् मूर्छित होऊन काष्ठाप्रमाणें तेथेच स्तब्ध होऊन पडला. जगदंबेने क्षणभर वाट पाहिली व नारायणशास्त्रीबुवांकडूनच यांचे अभिष्ट सिध्द करावे असें मनांत आणून ती तेथून निघून सर्व शहरांत पर्यटन करून एका क्षणांत कात्यायनी डोंगरांतील शास्त्रीबुवांच्या पर्णकुटीजवळ आली. नारायणशास्त्री भजनानंदांत निमग्न असलेलें तिने पाहिले व मोठ्या प्रेमभरानें "शास्त्रीबुवा ! मी प्रसन्न आहे माझ्यापासून कांही वर मागून घ्या" अस ती त्यांना म्हणाली. ते दिव्यवाक्य ऐकून नारायणशास्त्री आपल्या झोपडीतून बाहेर आले व जो पहातात तो कोटी सूर्याप्रमाणे तेज:पुंज परमशान्त असें श्रीमहालक्ष्मीचें दिव्य रूप त्यांच्या दृष्टीस पडले. तात्काळ त्यांनी परम भक्तिभावाने जगदंबेस साष्टांग नमस्कार केला व म्हणाले "हे जगज्जननी महालक्ष्मी तुमच्या दर्शनानें मी कृतकृत्य व धन्य झालों. माझा जन्म आज सफल झाला. अनेक जन्मांत केलेली पुण्याई आज फलद्रूप झाली. आपली यत्किंचितहि सेवा न करणाऱ्या या बालकाला 'वर माग' असें आपलें वचन मोठें आश्र्चर्यकारकच आहे अथवा आईच्या दयार्द्रह्रदयाची कप्लना अज्ञ बालकाला कशी होणार ? हे सच्चिदानन्दरूपे नारायणि जगाची सृष्टि, स्थिति, संहार ही आपली केवळ लीला आहे. आपल्या दर्शनमात्रे करुनच माझ्या हृदयांत ज्ञानज्योतीचा प्रकाश झाला आहे. आपण सप्तशती पाठक ब्राह्मणास वर देण्याकरतां हे रूप धारण केले आहे हें आपल्या कृपेनेंच मला कळून आले आहे. आई ज्याकरता हें रूप आपण धारण केलें त्या गरीब ब्राह्मणालाच आपण वर देऊन कृतार्थ करावे अशी माझी प्रार्थना आहे."

याप्रमाणें नारायणशास्त्र्यांचे वचन ऐकून त्यांची समदृष्टि व दीनाविषयी कळकळ पाहून जगदंबेला अत्यंत आनंद झाला व ती त्यांना म्हणाली, "बाळा नारायणा तू खरोखर धन्य आहेस. तुझी वृत्ति आचरण पाहून तुला काय वाटेल तें देण्यास मी सिध्द आहे. तू जी गुरूभक्ति करीत आहेस त्यामुळें मी तुझ्या आधीन झालें आहे. माझी सेवा करणाऱ्यांपेक्षा गुरूभक्ति करणारे जे लोक आहेत ते मला प्राणाहून प्रिय आहेत. सप्तशती पाठक ब्राह्मणाला केवळ निमित्तमात्र करून तुझ्याकरतांच मी हें अपूर्व व अगम्य रूप धरून येथे आले आहे. तरी बाळ आतां तूच मंदिरात जाऊन परमपावन अशा तुझ्या हातानें त्या मूर्छित् ब्राह्मणाला स्पर्श करून त्याला शुध्दीवर आण."

याप्रमाणे देवीचे कृपापरिपूरित वचन ऐकून नारायणशास्त्र्यांना गहिवरून आले. नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले व सर्व शरीरावर रोमांच उभे राहिले. हात जोडून नम्रपणें शास्त्रीबुवा म्हणाले, "आईसाहेब, मला वर मागण्याच्या संकटांत आपण कां घालतां. मी गुरूदक्षिणेच्या निमित्ताने आतां सर्वच वासनांचा त्याग केला आहे."

हें वचन ऐकून महालक्ष्मी म्हणाली, "नारायणा, तुझें अंतःकरण मी पूर्णपणें जाणून आहे. तू निरिच्छ आहेस हें मला ज्ञात आहे, तरी पण तुझ्याकरतां मी येथें आलें आहे. तें माझे येणे सफल होण्याकरतां तू कांही माझ्यापासून मागून घेतलें पाहिजेस त्यायोगे मला आनंद होईल."

नारायणशास्त्री म्हणाले, "आई, मी आपल्या आज्ञेप्रमाणें वर मागतो, परंतु प्रथम त्या गरीब बिचाऱ्या ब्राह्मणास वर देऊन कृतार्थ करा."

नारायणशास्त्र्यांचे हें भूतदया परिप्लुप्त वचन ऐकून भगवती जगदंबा अत्यंत संतुष्ट झाली व 'तथास्तु' असे म्हणून शास्त्रीबुवांसहित एका क्षणांत आपल्या मंदिरांत आली व पाहते तो सप्तशती पाठक ब्राह्मण अद्यापि मूर्छितावस्थेंत आहे असे तिला दिसले. 'शास्त्रीबुवा या ब्राह्मणाला स्पर्श करून शुध्दीवर आणा' असे ती त्यांना म्हणाली.

देवीच्या आज्ञेनें नारायणशास्त्र्यांनी त्या ब्राह्मणाला स्पर्श करताच झोपेंतून जसा एखादा माणूस जागा व्हावा, त्या प्रमाणें तो ब्राह्मण शुध्दीवर आला.

आपली इष्टदेवता जगदंबा आपल्यासमोर उभी असलेली त्याने पाहिली. मोठ्या भक्तिभावानें देवीला त्यांने साष्टांग नमस्कार घातला. जगदंबेनेही त्याला अभीष्ट असलेला वर देऊन त्याला निरोप दिला.

तो ब्राह्मण तेथून घरी गेल्यावर शास्त्रीबुवांना देवी म्हणाली, "शास्त्रीबुवा ! तुमच्या इच्छेप्रेमाणे ब्राह्मणाला मी कृतार्थ केले आहे. आतां तुम्हांला अभीष्ट असणारा वर तुम्ही मागा."

शास्त्रीबुवा म्हणाले, "आईसाहेब आपल्या चरणकमलापेक्षा मला दुसरे कांहीच अभिष्ट नाही. निरंतर हे चरणकमल माझ्या हृदयांत असावे एवढीच कामना आहे. तरी पण आपण वर मागच म्हणता म्हणून आपल्या संतोषाकरता मी आणखीहि एका वस्तुची याचना आपल्या चरणाजवळ करीत आहे. ती म्हणजे मी काशीत अध्ययनाकरता गुरूमहाराजांजवळ असतां त्यांनी प्रसन्न होऊन 'श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज तुला दर्शन व संन्यास दीक्षा देऊन कृतार्थ करतील' असा वर दिला होता तोच वर मी पुनः आपल्या चरणाजवळ मागत आहे. आपण 'तथास्तु' म्हणून तो सफल करावा एवढी इच्छा आहे."

देवी म्हणाली, "शास्त्रीबुवा, लवकरच सद्गुरू तुमच्यावर अनुग्रह करून तुम्हाला कृतार्थ करतील त्याविषयीं मनांत कांही चिंता बाळगूं नये. महाराजांनी अनुग्रह केल्यानंतर चतुर्थाश्रम स्वीकारून कांही दिवस येथे राहून तुमचे अत्यंत मधूर भजन मला ऐकवावें. कात्यायनीच्या डोंगरांत तुमचे भजन ऐकल्यापासून माझ्या मनांत ते भरले आहे. ते पुष्कळ वेळ ऐकण्याची माझी इच्छा आहे."

देवीचें हें प्रेमळ वचन ऐकून शास्त्रीबुवा म्हणाले, "आईसाहेब, गायन शास्त्राची अधिष्ठात्री गायनप्रवीण सरस्वती देवी सुध्दां आपल्या स्वतःच्या गायनांने आपल्या मनाची करमणूक करण्याविषयी असमर्थ असतां, 'तुझें भजन माझ्या मनांत भरलें आहे,' असे आपले वाक्य मला मोठेपणाच्या अभिमानांत पाडून माझी परीक्षा पाहण्याकरता तर नाही ना ? किंवा आपल्या बालकाचे बोबडे बोल वेडेवांकडे असले तरी ते मातेला अत्यंत गोड लागतात. कारण मातृहृदय कांही वेगळेंच आहे.

## ।। अध्याय दुसरा ।।

म्हणून मातृहृदयानेच आपण माझे भजन ऐकण्याविषयी उत्सुक झाला असाल. माझी परीक्षा घेणे हे आईच्या हृदयाला संभवतच नाही. कसेंही असो आपल्या इच्छेप्रमाणे चतुर्थाश्रमानंतर येथे येऊन आपली भजनरूप सेवा करण्याचें मी निश्चित केले आहे. परंतु गुरूमहाराजांनी मला तशी आज्ञा मात्र दिली पाहिजे. कारण मी सर्वस्वी त्यांच्या आज्ञेबाहेर कांहींहि करण्यास समर्थ नाही व स्वतंत्रही नाही."

भगवती जगदंबा म्हणाली, "नारायणा, तूं हो म्हण. गुरूमहाराज तुझ्या इच्छेबाहेर नाहीत. ते तुला अगदी वशच आहेत. त्यांत मुळीच शंका नाही. गुरूभक्त गुरूमहाराजांना फार प्रिय आहेत.'

हें ऐकून शास्त्रीबुवांना फार समाधान झालें व त्यांनी मोठ्या प्रेमाने आईसाहेबांना साष्टांग नमस्कार करून 'मी येथें येऊन अवश्य आपली भजनसेवा करतो' असें देवीला वचन दिले.

त्यानंतर जगदंबा अंतर्धान पावली व श्रीनारायणशास्त्रीही कात्यायनी डोंगरांतील आपल्या पर्णकुटींत येऊन नित्याच्या कार्यक्रमांत मग्न झाले.

कांही काळ तेथे राहून त्यांनी संन्यासाश्रमाला योग्य असें आपले शरीर बनविले. पुढें नरसोबाच्या वाडीस गुरूमहाराजांच्या सेवेस जावे अशी वारंवार अन्तः स्फूर्ति त्यांना होऊ लागल्याने ते महाराजांची उपासना करण्याकरतां श्रीनृसिंहवाडी क्षेत्रात लवकरच प्राप्त झाले.

याप्रमाणें नारायणस्वामींच्या चरित्रामृत समुद्रांत महालक्ष्मी श्रेष्ठवर प्राप्तीरूप द्वितीय रत्न सांपडलेले या द्वितीयाध्यायांत प्रकट केले आहे. याचा अंगीकार करून, कंठांत ठेवून गुरूभक्त आनंदित होवोत अशी प्रार्थना आहे.

**इति नारायणस्वामि चरित्रे द्वितीयोऽध्यायः ।। ॐ तत्सत् ।। २ ।।**

★★★

।। श्री ।।

# अध्याय तिसरा

श्रीगणेशानमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः वैकुंठतुल्य असणाऱ्या पवित्रतम अशा नरसोबाच्या वाडींत गुरूमहाराजांकडून झालेल्या अंतःप्रेरणेंने नारायणशास्त्री येऊन राहिले.

कोल्हापूर संस्थानच्या अधिपतींचे वाडींतील उपाध्ये म्हणजे राजोपाध्ये ही पदवी प्राप्त झालेले आबा भट पुजारी यांच्याच घरात प्रथम नारायणशास्त्री आले. म्हणून वाडीतील राजोपाध्ये हेच शास्त्रीबुवांचे उपाध्ये झाले. हल्ली नारायणस्वामींच्या उत्सवांतसुध्दा राजोपाध्यांच्या घराण्याकडेच उपाध्येपणाचा मान आहे. विधुर व असंग असलेले शास्त्रीबुवा विरक्तपणें यांच्या घरांत राहून तत्परतेनें गुरूमहाराजांच्या सेवेंत मग्न झाले.

वाडींतील श्रीपादुकांच्या पुजेची व एकंदर उपासनेची पध्दती पाहून शास्त्रीबुवांच्या चित्तास फार समाधान झाले. विशेषतः गुरूमहाराजांचे नृसिंहवाडींत असलेले सान्निध्य व जागृती पाहून त्यांना पराकाष्ठेचा आनंद झाला व येथें येण्यानेंच मी कृतार्थ झालो असें त्यांना वाटूं लागले. कृष्णा व पंचगंगा यांचा मनोहर संगम, सर्व पातकांचे तात्काळ शमन करणारी कृष्णा, प्रवाहांतील शुक्ल काम्य सिध्दवरदादि अष्टतीर्थे, अश्वत्थ, औदुंबर, शमी वगैरे पुण्यतमवृक्षांची घनदाट छाया, मनोहर वालुकामय तीर व सुशोभित दोनचार प्रशस्त घाट यांनी रमणीय दिसणारी नरसोबाची वाडी म्हणजे अनंतकोटि ब्रह्मांडनायक दत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनृसिंह सरस्वतीस्वामीमहाराजांनी राजधानी आहे यांत कांही शंकाच नाही. येथें महाराजांचे अखंड वास्तव्य आहे व गुरूचरित्रांत आम्ही गुप्त रूपाने सर्व येथे राहूं असें त्यांनी गाणगापुरास प्रगटरूपाने जातेवेळी योगिनींना प्रतिज्ञापूर्वक सांगितलेहि आहे.

ही सर्व सामग्री माझ्या संन्यासाश्रमाच्या स्वीकाराला अनुकूलच आहे. तथापि संन्यासाश्रम स्वीकारण्याबद्दल इतक्यात घाई करूं नये. कारण शंभर वर्षे आयुष्यातील तिसरा भाग म्हणजे पन्नास ते पंचाहत्तर वर्षापर्यंत काल संन्यासाश्रमाला आवश्यक असणाऱ्या शमदमादि साधनांचे पूर्णपणे संपादन करण्याकरता शास्त्रांत नेमून दिला आहे. दुःखप्रचुर असणाऱ्या स्वर्गादि भोगांत पूर्णपणे वैराग्य झाल्यावरच अग्निहोत्राचा त्याग करून संन्यास घ्यावा असे शास्त्र सांगते. शिवाय विषयांची चट लागलेली इंद्रियें विषयोपभोगाच्या अभ्यासानें मोठी बलिष्ठ झालेली असतात, ती सहसा ताब्यात येत नाहीत. विद्वानांची सुध्दा त्यांनी अनेकवेळा दुर्दशा केलेली दिसते. तरी वैराग्यपूर्ण इंद्रियनिग्रह होऊन शमादि साधनसंपत्ति संपादन करण्याचाच उद्योग तूर्त या पवित्रतम स्थानांत करावा. घाई करून स्थानारूढ होऊन खाली पडण्यापेक्षा स्थानारूढ न होता अविचल स्थिति प्राप्त होण्याचा प्रयत्न करणें हेंच श्रेयस्कर आहे.

असा पूर्ण विचार करून निषिध्द असलेले अनाश्रमित्व स्वीकारूनहि नारायणशास्त्री कांहीं काळ विधुरावस्थेंतच साधनानुष्ठान व भगवत्सेवा करीत वाडींत राहीले.

याप्रमाणें त्यांची कालक्रमणा चालली असतां भक्तांची कीर्ति वाढविणे हे ज्यांचे ब्रीद आहे अशा सद्‌गुरूमहाराजांनी नारायणशास्त्र्यांना स्वप्नांत आपल्या दिव्य स्वरूपाचे दर्शन दिले व ते त्यांना म्हणाले की, कोल्हापूराहून आपल्या दोन्ही मुलींना तू येथेंच घेऊन ये. विवाहाच्या पूर्वी मुलींचे लालनपालन आईबापांच्याकडून जसें होईल तसे ते इतरांकडून होत नाही. दुदैव वशात् तुझ्या मुलींना मातृसौख्य जरी फार काळ लाभले नाही तरी पितृसौख्य त्यांना मिळण्यास कांहींच हरकत नाही.

याप्रमाणे बोलून सद्‌गुरू अदृश्य झाले व शास्त्रीबुवाही जागे झाले. स्वप्नांत का होईना गुरूमहाराजांचे दर्शन व संभाषण याचा लाभ झाल्याने शास्त्रीबुवांना फार आनंद झाला व गुरूमहाराजांनी माझ्या अंगीकार केला आहे असे वाटून मी खरोखर धन्य आहे असे ते मनांत म्हणाले. स्वप्नांतील महाराजांच्या आज्ञेप्रमाणे ते कोल्हापुरास गेले व आप्तांच्या घरी ठेवलेल्या दोन्हीही मुलींना वाडीस घेऊन आले.

हल्ली ज्या ठिकाणी श्री नारायणस्वामींचे मंदिर आहे, त्याच ठिकाणी आपल्या दोन्ही मुलींसह एक छप्परवजा घर बांधून ते श्रीसेवा करीत राहीले असावे असे वाटते. शास्त्रीबुवांचा त्यावेळेस दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे होता.

ब्राह्ममुहूर्तावर उठून श्रीगुरूमहाराजांच्या पदकमलांचे ध्यान, श्रीगुरूस्त्रोत्रपाठादि वाचिक उपासना, प्रातर्विधी, श्रीकृष्णपंचगंगासंगमावर जाऊन प्रातःस्नान, संध्यापूजादिकांचे अनुष्ठान, रोज प्राकृत गुरूचरित्राचे सप्ताह रीतीने वाचन, मध्यान्हकालीं वेदपाठ व महापूजेस हजर राहून सांगपूजा पहाणे, हितकारक मित असे भोजन ( हे भोजनान्न स्वतः हातांनी करीत होते की अन्य काही प्रकार होता हे स्पष्ट कळण्यास मार्ग नाही ) “स्वयं यवागूंपयाययित्वा” असे महाराजांनी त्यांच्या चरित्रांत लिहिलें असल्यामुळे बहुतेक स्वयंपाकच करीत असावे असें वाटतें. पुढे सायंकाळपर्यंत अध्यात्म ग्रंथांचे चिंतन, सायंसंध्या, गुरूनाम जप, रात्री एकान्ती ध्यान, समाध्यभ्यास, भगवच्चिंतनमय निद्रासुखानुभव याप्रमाणें पवित्रतम आचारांनी शास्त्रीबुवांचा सर्वकाळ मोठ्या आनंदाने नृसिंहवाडीत सार्थकी लागत होता.

मनुष्याला मिळालेला आयुष्याचा अमूल्यकाळ कसा घालवावा याविषयी शास्त्रीबुवांचे त्यावेळचे वर्तन म्हणजे एक आदर्श होऊन गेलें होते. असो.

याप्रमाणे कार्यक्रम चालला असतां दोन्ही मुलींना वारंवार शौच होण्याचा विकार झाला. अर्थात् त्याची औषधपथ्यपाण्याची वगैरे व्यवस्था शास्त्रीबुवांनाच करावी लागे. हा आजार गुरूमहाराजांनी आपले भक्तवात्सल्य प्रकट करण्याकरताच कदाचित निर्माण केला असणें शक्य आहे. कसेंही असो, शास्त्रीबुवांनी मात्र आपण असंग राहून कर्तव्यपालन या दृष्टीने दोन्ही मुलींची ते सर्व व्यवस्था चोख ठेवत. शिवाय गुरूमहाराजांनी ‘मुलींना येथें घेऊन ये,’ असे सांगितले असल्याने त्यांच्या आज्ञेप्रमाणे त्यांची व्यवस्था त्यांना ठेवणें आवश्यकही होते. एवढ्याच काळांत मुलींनाही पितृसौख्य लाभावयाचे होते असेही असल्यानें शास्त्रीबुवांकडून दक्षतेंने त्यांचे जोपासन झाले.

एके दिवशी समाध्यभ्यासासाठी एकान्तात बसण्यापूर्वीच त्यांनी मुलींना शौचास नेऊन, धुवून आणले व पथ्य म्हणून थोडी यवागू (पेज) त्यांना शास्त्रीबुवांनी पिण्यास दिली, अंथरूणावर त्यांना निजविले. कदाचित मध्यंतरी उठावे लागल्यास पाणी जवळ असावे म्हणून दोन तांबे त्यांच्या उशाजवळ भरून ठेवले. याप्रमाणे आपल्या समाध्यभ्यासांत यांच्याकडून कांही विघ्ने येऊ नये म्हणून जेवढी तयारी करतां येईल तेवढी करून त्यांना आतां झोप लागली, असें पाहून शास्त्रीबुवा समाध्यभ्यासासाठी एकान्तात जाऊन बसले.

थोडक्याच वेळांत त्यांचे चित्त निर्विकल्प समाधीत मग्न झालें व स्थूल देहांचे भान हरपलें. “ब्रह्मानंदी लागली टाळी” अशी त्यांची अवस्था नित्याभ्यास असल्यानें थोडक्याच वेळांत झाली. इकडे झोपी गेलेल्या दोन्ही मुलींना एकाएकी जागृति आली व शौचाचीहि प्रसक्ती झाली. त्यांनी शास्त्रीबुवांना ‘बाबा, बाबा’ म्हणून हाका मारण्यास सुरवात केली; परंतु त्या हाकांचा कांहींच उपयोग झाला नाही. कारण शास्त्रीबुवा गाढ समाधीत मग्न होते.कदाचित् अशाच सारख्या हाका मुलींना मारल्या असत्या तर समाधिभंग होण्याचा संभव होता, परंतु तसें झालें असते तर भगवंताला आपली लीला दाखविण्याची संधि मिळाली नसती व शास्त्रीबुवांनाही तात्काळ निरूपाधिक होण्याची त्वराही झाली नसती म्हणूनच कीं काय गुरूमहाराजांनी तात्काळ श्रीनारायणशास्त्र्यांच्या सारखें रूप धारण केलें. मुली हाका मारून दमल्या.

## ।। अध्याय तिसरा ।।

त्यांना उत्तर न मिळाल्यानें त्या बऱ्याच खिन्न झाल्या व आपापल्यांत बोलू लागल्या. त्या म्हणाल्या, ‘आमच्यापासून बाबांना फारच पीडा झाली म्हणून आम्हांला कंटाळून ते कुठेतरी वैतागून निघून गेले असावें, आतां आम्ही काय करावें, आतां आमचा सांभाळ कोण करील ? बाबा येथें असते तर इतक्या हाका मारल्यावर ते ओ दिल्याशिवाय व आमची व्यवस्था केल्याशिवाय कधींच राहीले नसते. आम्हाला कितीतरी ते जपतात, वगैरे बोलून त्यांनी मोठ्यानें रडावयास आरंभ केला.

त्यांच्या रडण्यापासून शास्त्रीबुवांच्या समाधीत विघ्न येईल असा विचार करून मुलींची केविलवाणी अवस्था पाहून नारायणशास्त्र्यांचे रूप धारण केलेले महाराज मुलींजवळ आले. बाबा आलेले पाहिल्याबरोबर मुलींचें रडणें थांबले. त्या म्हणाल्या, ‘बाबा आम्हांला शौचाला लागली आहे. आम्ही तुम्हाला कितीतरी हाका मारल्या; अंधारांत बाहेर जाण्याची आम्हाला भीति वाटते. तुम्ही आम्हांला कंटाळून कुठेंतरी निघून गेला असे वाटून आम्हाला फार वाईट वाटले व रडू कोसळलें.’

तें भाषण ऐकून गुरूरूप नारायणशास्त्री म्हणाले, ‘मुलींनो मी तर इथेच होतो. अंमळ डोळा लागला असेल नसेल, इतक्यांत तुमचें रडणें कानावर आल्यांने इथें आलो. भिऊ नका, तुम्हाला सोडून मी दुसरीकडे कशाला जाऊ ? आता तुमचा सगळा भार माझ्यावर आहे. एकदा तुमचे लग्न करून दिले म्हणजे मी मोकळा झालो.’ इत्यादि प्रकारांनी गुरूमहाराजांनी त्यांचे सांत्वन केलें. सर्वांच्या बुध्दीला प्रकाश देणाऱ्या स्वयंप्रकाशमान परमात्म्यांने दिवा लावून पणती हातात घेतली. एका हातांत तांब्या घेऊन दोन मुलींना बाहेर नेऊन शौचास बसविले. शौचानंतर स्वतः त्यांचे अंग धुवून, फडक्याने पुसून, त्यांना अंथरूणावर निजविले.

एवढ्या वेळांत स्वतोव्युत्थान पदवीवर असणारे शास्त्रीबुवा ठराविक वेळांत समाधीतून व्युत्थित झाले व मुलींची काही तक्रार आहे की काय, त्यांना झोप लागलेली आहे की जाग्या आहेत, इत्यादि चौकशी करण्याकरता आपल्या एकान्तस्थानातून मुलींच्या जवळ येतात तोंच नारायणशास्त्री रूपधारी गुरूमहाराज आता आपले काम संपले.( कारण अनन्यांचा योगक्षेम करणें हे त्यांचे कार्य आहे; व्युत्थानावस्थेनंतर गेली म्हणून यांचेही काम संपले.) असे जाणून मायिक नारायणशास्त्र्यांचें रूप टाकून आपल्या नृसिंहसरस्वती या रूपांत म्हणजे स्वस्वरूपांत ते स्थित झाले.

प्रतिभासिक म्हणजे खोटे नारायणशास्त्री गुप्त होऊन व्यावहारिक नारायणशास्त्री म्हणजे खरे नारायणशास्त्री आपल्या मुलींजवळ आले व मुली जाग्याच असलेल्या पाहून ते त्यांना म्हणाले, ‘मुलींनो तुम्ही केव्हां जाग्या झाल्या, शौचास वगैरे जायचे आहे काय ? मला उठायला बराच वेळ झाला. आतां शौचमुखमार्जन होऊन स्नान होईपर्यंत पाणी घालण्याचे बंद होते कीं काय कोणास ठाऊक,’ इत्यादि भाषण आपल्या वडिलांचे ऐकून दोन्ही मुली आश्चर्यचकित झाल्या. त्या मनात म्हणाल्या, ‘बाबा’ असे काय बोलतात ? नंतर त्या वडिलांना म्हणाल्या, ‘बाबा, आपण असें काय बोलतां ? आत्ताच तर तुम्ही आम्हांला शौचाला नेऊन स्वच्छ धुवून पुसून येथे आणून निजविले. आमचे पायसुध्दा अजून वाळले नाहीत, थोडे ओलेच आहेत. वाटल्यास पहा. तुम्हांस सोडून मी कुठें जात नाही. थोडा डोळा लागला वगैरे आत्ताच तर तुम्ही बोलला आणि आतां हें असें पूर्वीचे काही माहित नसल्यासारखे बोलता याचा अर्थ कांही आम्हांला कळत नाही.’

हे मुलींचे भाषण ऐकल्याबरोबर शास्त्रीबुवा आश्र्चर्यचकित झाले. दिवा लावून पहातात तो खरेच त्यांचे पाय ओले आहेत व उशाशी ठेवलेला तांब्याही रिकामा आहे हें त्यांना दिसून आलें. गुरूमहाराजांनी हें काम कें‌ले यांत शंका नाही, असा चक्क प्रकाश त्यांच्या बुध्दीत पडला व त्यांच्या मनाला अत्यंत खेद झाला. ‘या हतभाग्य पामराकरता गुरूमहाराजांना किती कष्ट झाले व किती हलकें काम त्यांना करावें लागले. धिक्कार असो माझ्या जीविताला.’ असे वारंवार ते आपल्या मनाशीं म्हणाले.

## ।। अध्याय तिसरा ।।

वास्तविक पाहता इच्छामात्रे करूनच जगत्सुष्टि स्थितिसंहार करणाऱ्या परमात्म्याला यांत कष्ट कांहींच नाहींत. भक्तप्रिय असें याचें ब्रीद असल्यानें भक्तांकरतां त्यांनी सर्व लाज सोडली आहे, इंद्रादिक देवालासुध्दा ज्याचा दरारा आहे त्यांनी अर्जुनाच्या घोड्याला खरारा करावा व धर्माच्या घरांत उष्टी काढावी, लक्ष्मी ज्याच्या घरची दासी त्यांनी सुदाम्याने आणलेले पोह्याचे कण जबरदस्तीने त्याच्याकडून घेऊन मिटक्या मारीत खावे, ब्रह्मानंदांत निरंतर मग्न असणाऱ्याने गोपींची सर्व कामें करावी व शेंबड्या मेकड्या गोपाळांचें ताक प्यावे, श्रीपती असून दामाजीपंतांकरतां रसीद भरणारा महार व्हावे, अशी एक की दोन हजारो उदाहरणें या भक्तवत्सल परमात्म्याची जगांत प्रसिध्द आहेत.

मग भक्तश्रेष्ठ नारायणशास्त्र्यांच्या मुलींकरतां हें कृत्य त्यांनी करणें ह्यांत वावगे कांहींच नाही. परंतु भक्ताला मात्र आपल्या करतां देवानें असें काम केलेलें बरे वाटत नाही. शास्त्रीबुवांना गुरूमहाराजांनी केलेल्या कृत्याने फार दु:ख झालें. त्यांना चैन पडेनासे झाले. ते तसेच खाली मंडपांत गेले, साष्टांग नमस्कार घालून हात जोडून ढळढळा रडूं लागले व म्हणाले, 'महाराज,' या अधमाकरितां आपणाला हे कष्ट झाले व अतिगलिच्छ काम करावे लागले. धिक्कार असो माझ्या जीविताला व या मोडक्या प्रपंचाला. माझ्याकडून हे अयोग्य कृत्य करवावे म्हणूनच कोल्हापुराहून मुलींना आणण्याकरितां श्रींनी स्वप्नांत सांगितले काय ? श्रींच्यापुढे मी काय बोलणार ? कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् श्रीसमर्थच आहेत. यापेक्षा मला कांही बोलतां येत नाही.

इत्यादि भाषण श्रींच्या बंद असलेल्या दारांतच करून शास्त्रीबुवा वर आले व नित्याप्रमाणे स्नानसंध्यादि आन्हिक त्यांनी केलें. परंतु चित्तात तोच विषय घोळात असल्यानें त्या दिवशी आन्हिक यथातथाच झाले. मुलींना जेवावयास घालून आपण प्रायश्चित्त या बुध्दीनें त्या दिवशी ते उपवासीच राहिले. ज्यांच्याकरितां गुरूमहाराजांना संकट पडले ती उपाधी लवकरच दूर केली पाहिजे असा विचार करून, लवकरच अनुरूप अशी दोन मुलें पाहून, शास्त्रीबुवांनी नरसोबाच्या वाडीतच त्या दोघींचा विवाह करून दिला. त्यांतील एक मुलगी कापशी गांवांतील ब्राह्मणाला व दुसरी सोळांकुरांतील ब्राह्मणाला दिली. त्यापैकी कापशीत दिलेल्या वंश अद्यापि आहें म्हणतात. दुसऱ्या मुलीचा वंश विद्यमान नाही. तथापि गुरूमहाराजांच्या हस्ताचा स्पर्श या परम भाग्यशाली मुलींना झाल्याने त्यांचा प्रपंच मोठ्या सुखाचा झाला व परत्रहि कल्याण झाले.

पुढे लवकरच विश्र्वंभरशास्त्री नांवाच्या आपल्या मुलाचा विवाह करुन शास्त्रीबुवा सांसरिक सर्व उपाधींतून कायमचे मुक्त होऊन संन्यासाश्रम स्वीकारण्यास परमयोग्य झाले.

धन्य आहे त्या नारायणशास्त्रीबुवांची कीं ज्यांच्याकरितां प्रत्यक्ष गुरूमहाराजांनी असें अद्‌भुत चरित्र करून आपलें भक्तवात्सल्य सर्व जगांत प्रगट केलें. अशा सद्‌गुरूंचे भजन न करणारे साक्षात् पुच्छविषाणहीन असेंच पशुरूप प्राणी आहेत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाही, असो.

याप्रमाणे गुरूमहाराजांचे वात्सल्य प्रकट करणारे नारायणस्वामींच्या चरित्रसागरांतील तृतीय रत्न येथे प्रकट केलें आहे. त्यांने गुरूभक्त आनंदित होवोत.

**इति तृतीयोऽध्याय:** ।। ॐ **तत्सत्** ।। ३ ।।

★★★

।। श्री ।।

# अध्याय चौथा

पूर्वाध्यायांत वर्णिल्याप्रमाणें नारायणशास्त्री प्रापंचिक सर्व उपाधींपासून विमुक्त झाले. त्यांनी आपली सर्व इन्द्रियें वश केली. शान्त, दान्त, परम वैराग्यशाली व उदासीन असे होऊन मोठ्या आनंदाने भगवदुपासनेंत त्यांचा काळ चालला होता.

एके दिवशी त्यांच्या मनांत असा विचार आला की, आतां संन्यासाश्रम स्वीकारण्याला प्रतिबंधक कांहीच नाहीं. 'यदहरेव विरजेत्तदहरेव प्रवजेत्' असे श्रुतिमाऊली सांगते. आतां वित्तेषणा, लोकेषणा, दारेषणा वगैरे कोणत्याहि प्रकारची वासना मला नाही. वैराग्य शब्दाचा अर्थ कोणत्याहि प्रकारची अनात्मवासना नसणें हाच आहे व तें वैराग्य माझें ठिकाणी झालें आहे, असे मी अन्तःकरणाची सूक्ष्म रीतीनें परीक्षा घेऊन जाणलें आहे.

काशींत अध्ययनास असतांना गुरूजींनी श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज तुला साक्षात् स्वयं संन्यास देऊन कृतार्थ करतील असा वर दिला आहे व कोल्हापुरांत जगदंबेचें दर्शन झाल्यामुळे त्या जगज्जननींने कृपा करून त्या वरप्रदानास अनुमोदनहि दिलें आहे. हा देहहि चतुर्थाश्रमाला योग्य असा झाला आहे. तरी आतां "अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपिद्विजः" या शास्त्रवचनानुसारे अनाश्रमी न राहतां संन्यासाश्रम देण्याबद्दल गुरूमहाराजांचे चरणी प्रार्थना करावी. ते दीनदयाळभक्तवत्सल परमात्मा माझी प्रार्थना ऐकून कृपा करतील.

याप्रमाणे विचार करून गुरूमहाराजांची शेजारती होऊन सर्व भक्तमंडळी आपापल्या ठिकाणी गेल्यावर एकांतात शास्त्रीबुवा 'पिहित द्वार' अशा श्रींच्या मंदिराजवळ आले. भक्तिभावानें श्रीचरणाला त्यांनी साष्टांग नमस्कार केला व अत्यंत नम्रभावाने आपणास संन्यासाश्रम देण्याची कृपा श्रींनी करावी अशी प्रार्थना केली व पुनः नमस्कार करून ते आपल्या झोपडींत आले. सर्व भार श्रीचरणावर सोपवून महाराजांचे स्मरण करीत ते शय्येवर पहुडले.

त्याच रात्री शास्त्रीबुवांच्या स्वप्नांत श्रीगुरुमहाराज आले व त्यांना आश्र्वासन देऊन 'कांही चिंता करूं नको योग्य मुहूर्त पाहून मी तुला संन्यासदीक्षा देईन' असें म्हणून तात्काळ गुप्त झाले.

शास्त्रीबुवाही जागे झाले व आतां आपणाला महाराजांच्याकडून संन्यासदीक्षा मिळणार, आपण धन्य आहो, आपलें भाग्य उदयाला आलें असें आपल्या मनाशीच म्हणालें.

कांही दिवस गेल्यावर पुनः शास्त्रीबुवांच्या स्वप्नांत श्रीगुरूंनी येऊन आतां मुहूर्त जवळ आला आहे. आपल्या प्रपंचाच्या सामानाची सर्व निरवानिरव करून टाक. परंतु लोकांना मी संन्यास घेणार आहे असें कळूं न देतां ही व्यवस्था करावी असें सांगून महाराज अदृश्य झाले.

शास्त्रीबुवाही तात्काळ स्वप्नांतील आज्ञेप्रमाणे आपल्या सर्व वस्तूंची यथायोग्य विल्हेवाट करून संन्यासाश्रमाकरतां सिध्द होऊन राहिले.

एके दिवशी नेहमीप्रमाणे पहाटेच्यावेळी कृष्णा-पंचगंगा संगमावर स्नानाकरिता गेले व गंगेला साष्टांग नमस्कार करून, हातपाय धुऊन, तांब्या भांडे वगैरे घासून त्यांनी वस्त्रे धुऊन ठेवली व आचमन संकल्पादि करून स्नानाकरिता कृष्णेच्या प्रवाहांत उतरले.

आतां बुडी मारणार इतक्यांत पाय निरसल्यासारखे होऊन नदीच्या डोहांत ते बुडाले. त्यांनी वर येण्याचा बराच प्रयत्न केला परंतु तो सर्व व्यर्थ गेला. कोणीतरी मनुष्य जोरानें आपल्याला आंत ओढतो आहे असा त्यांना भास झाला.

इतक्यांत आत मोठा झगझगीत प्रकाश त्यांना दिसला. त्यांतच एक सुंदर असे मंदिर आहे. वेदपाठी पुष्कळ ब्राह्मण त्या मंदिरांत बसले आहेत, त्यांचेजवळच दिव्य सिंहासनावर दण्डकमण्डलु व रम्यकाषायांबरधारी परमतेजस्वी सद्‌गुरूमहाराज बसले आहेत व वेदश्रवण करीत आहेत असें शास्त्रीबुवांना दिसलें.

त्यांनी गुरूमहाराजांना साष्टांग नमस्कार केला. महाराजांनी बसण्याची आज्ञा केल्यावर तेथेंच एका आसनावर ते बसले व मोठ्या आश्र्चर्याने इकडे तिकडे पाहूं लागले.

ते पाहून सद्‌गुरू म्हणाले, “शास्त्रीबुवा आश्र्चर्यानें इकडे तिकडे काय पाहता ?”

शास्त्रीबुवा म्हणाले, “महाराज नित्याप्रमाणे मी स्नानकरतां संगमावर आलों व प्रवाहांत उतरलों तो कोणी मला जोरानें आंत ओढले व येथे आलों. येथील सर्व दृश्य पाहून पाण्यामध्यें हें सर्व कसें काय आहे इत्यादि विचार मनांत येऊन मी आश्र्चर्याने इकडे तिकडे पहात आहे. पण ओढून आणणारा माणूस कोठें नाहींसा झाला, हें स्वप्नही म्हणतां येत नाही. कारण मी नित्याप्रमाणे जागा होऊन शौचमुखमार्जनादि करून स्नानास आलों आहे. श्रीगुरूमहाराजांचीच ही कांही तरी माया असावी. मला यांत कांहींच कळत नाही. मी पाण्यांत असून श्वास निरोध वगैरे प्रकार न होता सर्व व्यवहार बाहेरच्याप्रमाणे चालले आहेत. यांतील तत्त्व श्रीचरणांनाच गम्य आहे. माझ्या बुध्दीच्या बाहेरचें तें आहे.” असें म्हणून त्यांनी नम्रभावानें श्रीचरणांस नमस्कार केला.

तें पाहून गुरूमहाराज म्हणाले, “शास्त्रीबुवा, संन्यासदीक्षा देण्याबद्दल तुम्ही आमच्याजवळ प्रार्थना केली होती व त्यानंतर योग्य मुहूर्त पाहून तुम्हाला दीक्षा देऊं, प्रपंचांतील वस्तूंची इष्टती विल्हेवाट करा, असें आम्ही स्वप्नांत तुम्हांला सांगितले. त्याप्रमाणें तुम्हीहि सर्व व्यवस्था करून दीक्षा घेण्यास सिध्द आहां, असे जाणून व आज दीक्षेस उत्तम मुहूर्त आहे असे पाहून आम्हीच तुम्हास येथें आणलें आहे. येथें सर्व संन्यासाची सामग्री सिध्द आहे तरी आपलें आन्हिक आटोपून संन्यास ग्रहणास तयार व्हा.”

याप्रमाणें यतिराजांचें वचन ऐकून हेच अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज भक्तकामकल्पद्रुम नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज आहेत व यांच्या पायाची सेवा करण्यासाठी अष्टसिध्दि व नवनिधि हात जोडून सर्वदा सुसज्ज असल्यानें कृष्णा प्रवाहाच्या आंतच मंदिरादिकांची स्थिति व बाहेरच्याप्रमाणें सर्व व्यवहार होणें हें कांही अशक्य नाही.

गंगानुजाला याचप्रमाणें श्रींनी सर्व दृश्य दाखविले असें गुरूचरित्रांत जें वर्णन आहे तें अगदी यथार्थ आहे. माझें परम भाग्यच आज उदयाला आलें आहे. वाराणसीवासी श्रीगुरूंनी दिलेले व जगदंबेने अनुमोदिलेलें वचन आज फलद्रुप झालें व मी परमधन्य झालों असा विचार करून शास्त्रीबुवांनी श्रीचरणाला अनन्य भावाने साष्टांग नमस्कार घातला व श्रीचरणावर आपल्या प्रेमाश्रूंनी अभिषेक केला.

## ।। अध्याय चौथा ।।

नंतर श्रींच्या आज्ञेप्रमाणे सर्व आन्हिक आटोपून दीक्षा घेण्याकरतां शास्त्रीबुवा गुरूमहाराजांजवळ आले.

महाराजांनी प्रेषोच्चारपूर्वक महावाक्योपदेश व दंड, कमंडलू, काषायवस्त्रादि सर्व देऊन नारायणसरस्वती असें नांव प्रसिध्द केले. कांही काळ त्यांना आपल्या सहवासांत ठेवून यति धर्माचा उपदेश व महावाक्य विवरणादिकांनी अद्वैत साम्राज्यपदावर त्यांना अभिषिक्त करून कृतार्थ केले. प्रेमालिंगनादिकांनी त्यांना स्वस्वरूप करून ज्या जागेवरून ते पाण्यांत बुडले होते, त्या जागेवर पुन्हां आणून सोडले.

यानंतर आतां नारायणशास्त्रीबुवांना आपण नारायणस्वामी या शब्दाने संबोधू; कारण महाराजांनीच यांना संन्यासदीक्षा देऊन 'स्वामी' या पदावर अभिषिक्त केलें आहे. असो.

नारायणस्वामीमहाराज संन्याशी स्वरूपांत दण्डकमण्डलु काषायवस्त्रादि स्वरूपानें शोभायमान होत्साते गुरूपादुकांच्या दर्शनार्थ मंडपांत आले व त्यांनी श्रीपादुकांना परमप्रेमानें दंडवंदन केलें.

शास्त्रीबुवांना संन्याशी वेषांत पाहून ( अलौकिक घटना माहीत नसल्यानें ) सर्व लोक आश्र्चर्याने थक्क झाले.

आपण संन्यास केव्हां घेतला, कोठें घेतला, आपले गुरू कोण वगैरे प्रश्र्न नारायणस्वामींना ते विचारू लागले व हे न सांगितल्यास आपले वर्तन धर्मशास्त्राविरूध्द आहे असें समजून आपणावर आम्ही बहिष्कार घालूं असें मठाधिपतींच्या प्रेरणेनें सर्व लोक म्हणूं लागले.

हे मठाधिपति नरसोबाच्या वाडीतच राहणारे कोणी होते. महाराज टेंबेस्वामी चरणांनी केलेल्या 'मठपःप्रहस्य' एवढेंच सामान्यपद आहे. त्यामुळें यांची विशेष माहिती नाही.

नारायणस्वामींनी भगवंतांनी केलेली लीला गुप्त ठेवण्याकतां, शिवाय आपली प्रसिध्दी व प्रतिष्ठा मुळींच न व्हावी याकरतां मौन धारण करून काहींच उत्तर कोणालाही दिले नाही. श्रीपादुकांना नमस्कार व प्रदक्षिणा करून आपल्या झोपडीतून ते आले. तेथें सुध्दा लोकांना येऊन त्यांना बराच त्रास दिला व अपमानही केला. परंतु भिक्षुगीतार्थ त्यांना पूर्णपणे अवगत व हस्तगत झाला असल्यानें खलांच्या दुर्वचनाकडे व अपमानाकडे बिलकुल लक्ष न देतां नारायणस्वामी समुद्राप्रमाणे परमशान्त असेंच राहिले.

तेथील मठाधिपतीनींही अज्ञानाने ज्यावेळी त्यांच्यावर बहिष्कार घातला त्यावेळी प्रातःकाळ पूजेवेळी श्रीपादुकांवर कृष्णाजल समर्पणाचा स्वामींचा नियम व दत्तदर्शनार्थ मंदिरांत प्रवेश ही दोन्ही जेव्हां पुजारी लोकांकडून बंद झाली तेव्हां नारायणस्वामींच्या उपासनेत प्रतिबंध होऊन त्यांना कष्ट होऊ लागले.

मग नारायणस्वामींनी निरूपायास्तव खालीं जाण्याचे सोडून आपल्या मठाचे दार बंद करून एकांतात भगवद्भजनच सारखे सुरूं ठेवलें. याप्रमाणें त्यांच्या भजनाचा प्रकार सुरू झाल्यावर दत्तमहाराज ( नरसिंह सरस्वती ) मोठ्या सिंहाचे रूप धारण करून त्याचें पुढें बसून भजन ऐकू लागले. याप्रमाणे देव-भक्त यांचा भजनानंदाचा सोहळा सुरूं झाला.

हे एकान्तात बसून काय करतात अशी जिज्ञासा होऊन मठाधिपति एकदा दाराच्या फटींतून आत पाहूं लागले, तो मोठा सिंह याचें भजन ऐकतो असे त्यांना दिसलें. ते पाहून मठपांना पश्र्चात्ताप झाला. हे साक्षात् महापुरूष आहेत असे मानून त्यांना दार उघडण्यास सांगून ते त्यांना शरण आले व त्यांचे शिष्य झाले.

## ।। अध्याय चौथा ।।

ही हकीगत "आरब्धेत्वमुनानृसिंह भजने सिंहोग्रतः प्राप्तवान्" या शब्दांनी टेंबेस्वामी चरणांनी स्वकृत चरित्रांत दिली आहे.

त्यानंतर दत्तमहाराजांनी पुजाऱ्यांच्या स्वप्नांत जाऊन नारायणस्वामींना मी स्वतः संन्यास दिला आहे त्यांना बिलकूल त्रास देऊ नका व झालेल्या अपराधाबद्दल त्यांची क्षमा मागून त्यांच्याकरतां एक मठभिक्षेचा समारंभ करा अशी आज्ञा वाडीतील बऱ्याच पुजाऱ्यांना एकाचवेळी केली.

सकाळी परस्परांस परस्परांनी रात्री पडलेलें स्वप्न सांगून ते सर्वजण नारायणस्वामीमहाराजांजवळ येऊन त्यांनी त्यांच्याजवळ कृतापराधाची क्षमा मागितली.

मठाधिपतींनाहि आपलें अज्ञान व नारायणस्वामींची योग्यता पुजाऱ्यांना सांगितली असेलच.

त्यानंतर श्रींच्या आज्ञेप्रमाणे मोठ्या थाटाने त्यांनी मठभिक्षा केली व नारायणस्वामी ब्रह्मनिष्ठ परमभक्त व श्रींना अत्यंत प्रिय असल्यामुळे आम्हांस ते गुरूस्थानीं आहेत असे त्या दिवसांपासून ते समजू लागले.

हल्ली नारायणस्वामींचे मंदिर जेंथे आहे त्या ठिकाणी राहण्यास नारायणस्वामींना देवांनी आज्ञा दिली; तदनुसार तेथेंच एका कुटींत स्वामी राहू लागले. त्यानंतर ते सर्वांनाच पूज्य झाले.

"यस्य प्रसन्नो भगवान् गुणैमैंत्र्यादिभिर्हरीः । तस्मैनमन्तिभूतानि निम्नमाप इरा स्वयम् ।।" या उक्तीप्रमाणें ज्यांच्यावर भगवंताची कृपा झाली. त्यांना सर्व लोक स्वतः आपण होऊनच मानतात असा सिध्दांत असल्यानें नारायणस्वामी सर्वांना आधारभूत होऊन सर्वांचे कल्याण करीत नृसिंहवाडी क्षेत्रात राहिले.

एकान्तात ब्रह्मानंदांत निमग्नचित्त होऊन निर्विकल्प समाध्यवस्थेत कांहीं वेळ रहावे, व्युत्थानकाली वेदान्तार्थ चिंतन व उपदेश यांत कांही काळ घालवावा, गुरूमहाराजांच्या भजनोपासनेस कांही काळ द्यावा, आलेल्या भक्तजनांची पीडा निवारण करून त्यांना सन्मार्गास लावण्याकरतां कांही काळाचा व्यय करावा, याप्रमाणें सर्वकाळाचें सार्थक करून परमानन्द मग्न अशा स्थितींत स्वामीमहाराजांचा काळ जाऊ लागला.

येथें नारायणस्वामी चरित्रामृत समुद्रांतील यतिवर पदप्राप्तिरूप रत्न या चौथ्या अध्यायांत प्रकट केलें आहे. याचा अंगीकार करून गुरूभक्त आनंदित होवोत अशी प्रार्थना आहे.

**इति नारायणस्वामि चरित्र संन्यासप्राप्ति नामक चतुर्थोऽध्यायः समाप्तः ।। ॐ तत्सत् ।**

★★★

।। श्री ।।

# अध्याय पांचवा

याप्रमाणें महापुरूष श्रीसद्‌गुरू नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांकडून प्रत्यक्ष संन्यासाश्रम स्वीकारून नारायणसरस्वतीस्वामीमहाराज निस्त्रैगुण्य, वीतशोक, निर्ग्रंब्रह्मवित्तम, आत्मतृप्त, आत्मरति, आत्मक्रीड, गतव्यथ, संप्राप्तप्रापणीय अशा अनेक पदव्यांनी विभूषित होऊन लोकोपदेशाकरतां म्हणजे लोकसंग्रहाकरतां यतिधर्माचे उत्तम प्रकारें अनुष्ठान करीत नरसोबाच्या वाडींत मोठ्या आनंदाने राहिले.

जगांतील इतर लोकांचे कल्याण व स्वामींची कीर्ति वाढावी या इच्छेने सद्‌गुरूमहाराजांनी एकेवेळी नारायणस्वामींना तीर्थयात्रा करून येण्याविषयी आज्ञा दिली.

गुरूचरणांना सोडून कोठें जाणें हें स्वामींना जरी इष्ट नव्हते तरी महाराजांची आज्ञा अनुल्लंघनीय आहे असें जाणून श्रींची आज्ञा शिरसामान्य करून नारायणस्वामी निघाले व थोडक्याच काळांत भारतांतील सर्व तीर्थे करून आपल्या सहज संचाराने तीर्थक्षेत्राला व तेथील अधिकारी लोकांना कर्मज्ञानभक्ति इत्यादिकांच्या मार्गाच्या उपदेशाने पवित्र करून कृतकृत्य होत्साते सद्‌गुरूंची राजधानी जी नरसोबाची वाडी तिथें गुरूमहाराजांच्या सान्निध्यांत राहण्याच्या इच्छेनें तीर्थयात्रेहून ते परतले.

परत येतांना कर्नाटकांतील देवलपुरांत प्रत्यक्ष श्रीशिवावतार महास्वामी चिदंबरमहाराजांच्या मुक्काम आहे असें समजल्यानें कांहीं काळ त्यांच्या सहवासांत घालवून दर्शन, वेदांत चर्चा इत्यादि आनंदाचा लाभ करून घ्यावा असें मनांत आणून ते देवलपुराकडे वळले.

सर्वज्ञ महास्वामी चिदंबरमहाराजांनी यतिराज आपल्याकडे येण्यास निघाले आहेत असें अन्तर्ज्ञानानें जाणून आपल्याबरोबर असलेल्या भक्त मंडळींनां ते म्हणाले, ‘भक्त हो लवकर येथें एक यतिवर्य येणार आहेत. हे यतिराज सामान्य नाहींत. फार मोठ्या अधिकारांचे व ब्रह्मनिष्ठ सत्पुरूष ते आहेत. नरसोबाच्या वाडीस म्हणजेच अमरापुरास आम्ही गेलो असतां पूर्वाश्रमांत यांनी योगाग्नीने पाक सिध्द करून आमचे मोठे आदरातिथ्य केलें होते. सिध्दि यांच्याजवळ हात जोडून सेवेकरतां उभ्या आहेत. परंतु हे त्यांत आसक्त नाहींत. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांना हे अत्यंत प्रिय आहेत. त्यांनी यांना स्वतः संन्यास दिला आहे. शाब्दे परेच निष्णात असे हे आहेत. दुसऱ्यावर उपकार करणें हें जणूं यांचे ब्रीदच आहे, तरी पण हे प्रसिध्दिपराङ्मुख आहेत. आम्हाला यांचा स्वभाव फारच आवडतो. ते आतां देवलपुराजवळ आले आहेत. त्यांना सामोरे जाऊन मोठ्या आदरानें तेथें घेऊन येणें आम्हा गृहस्थाश्रम्यांचे कर्तव्य आहे. तरी आपण सर्वजण त्यांना आणण्याकरता जाऊ.’

असें बोलून महास्वामी चिदंबरेश्वरमहाराज सर्व लोकांना घेऊन देवलपुराच्या सीमेजवळ एक कोस अंतरावर येतात, तो यतिवर्य नारायणस्वामीहि तेवढ्यांतच तेथे आले.

उभयतांची हरिहराप्रमाणें भेट झाली; परस्पर आलिंगनादि सोहळा मोठा अपूर्वच झाला. उभयतांचे द्वैतभान हरपून दोघेहि अद्वैतस्वरूप झाले व प्रेमसागरांत मग्न झाले. कांही वेळाने दोघेहि भानावर येऊन त्यांनी परस्परांची प्रेमानें स्तुति केली व धन्यता

मानली.

चिदंबरमहाराजांचा नारायणस्वामी हात धरून त्यांना ते आपल्या वसतिस्थानाकडे मोठ्या सन्मानानें घेऊन आले. त्यांना राहण्यास उत्तम स्वतंत्र अशी आपल्याजवळच जागा दिली. त्यांना स्नान वगैरे घालून गंधपुष्पादिकांनी त्यांची पूजा करून नाना प्रकारच्या पक्वान्नांची त्यांना भिक्षा दिली; याप्रमाणे त्यांची सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें केली.

चिदंबरमहाराजांच्या प्रेमामुळें नारायणस्वामी तीन महिने त्यांच्या सान्निध्यांत देवलपुरांत राहिले. रोज परमानन्दाचा लाभ देणारी ब्रह्मचर्चा उभयतांमध्ये होत असे व हे बाल स्वानुभवाचे असल्यांने मोठा आनंद प्रकट होई. नारायणस्वामी निरूपण करूं लागले म्हणजे चिदंबरमहाराजांनी श्रोते व्हावे व चिदंबरमहाराज वक्ते झाले म्हणजे नारायणस्वामींनी श्रोते व्हावे. निरूपणानंतर वक्त्याची वाहवा श्रोत्यांनी करावी.

याप्रमाणें ब्रह्मानन्द समुद्रामध्ये दोघे पूर्ण मग्न झाले. यांची निरूपणें ऐकून दुष्ट लोक सज्जन झाले, आळशी परमार्थाचे साधक झाले, मुमुक्षु मोक्षद्वारांत जाऊन पोचले, अशा त्या सत्संगाचे वर्णन करणेंच अशक्य आहे. ही एक ज्ञानाची पर्वणीच त्यावेळी प्राप्त झाली असे म्हणण्यास हरकत नाही.

याप्रमाणे आनंदीआनंद चालला असतां त्यांतच ‘अर्धोदय’ नांवाचे पर्व प्राप्त झाले. चिदंबरमहाराजांनी या पर्वानिमित्त स्नान करण्यासाठी तेथून बऱ्याच अंतरावर असलेल्या नदीतीरावर सर्व भक्तांसहित जाण्याचें ठरविलें.

तें ऐकून स्वामीमहाराज चिदंबरमहाराजांना म्हणाले, “महाराज, आपल्या चरणाजवळ सर्व तीर्थे वास करून राहिली असतां आपण नदीला जाण्याचें कांहीच कारण नाही. शिवाय हेमंत ऋतु हल्ली असल्यानें थंडीहि बरीच आहे. रात्री आपण प्रवास करणार, त्यामुळें सर्व लोकांना त्रास होईल असें मला वाटतें. तरी तो बेत रहित केल्यास बरे होईल.”

याप्रमाणें स्वामींचे वचन ऐकून चिदंबरमहाराज म्हणाले, “यतीश्र्वरा आपण यात्रेचा निषेध केला, त्याचा अभिप्राय माझ्या लक्षांत आला. वास्तविकदृष्टीने ‘तस्य कार्यं न विद्यते’ या न्यायानें आपलें म्हणणें योग्यच आहे. परंतु लोकशिक्षण देण्याकरितां आम्ही असे नदीला जाण्यांचे ठरविलें होते. परंतु आपली इच्छा नसल्यास आम्ही तो बेत रहित केला आहे. येथून जवळच असलेल्या विहिरीवर अर्धोदय पर्वणीनिमित्त स्नानासाठी सर्वांसह आम्ही जावू व तें जाणेसुध्दा आपल्या इच्छेवरच अवलंबून आहे. आपली इच्छा नसल्यास तोहि बेत रहितच होईल असे समजावे.”

हें वचन ऐकून नारायणस्वामींनी विहिरीवर स्नानास जाण्यास आपली संमति दिली. मग चिदंबरमहाराज, सर्व भक्त मंडळी व स्वामीमहाराज यांचेसह स्नानासाठी त्या विहिरीजवळ गेले व पहातात तो विहीर बरीच मोठी व आंत उतरून स्नान करण्यासाठी होती; परंतु त्यांत पाण्याचा थेंबहि नाही.

हें पाहून पर्वस्नानाकरितां सर्व यात्रा लोटलेली जाणून चिदंबरमहाराजांनी त्यावेळी जगज्जननी गंगेची प्रार्थना केली. त्याबरोबर भराभरा झऱ्यांतून गंगाजलाप्रमाणे शुभ्र असे विपुल जल निर्माण झाले.ते पाहून चिदंबरांनी नारायणस्वामींना प्रथम स्नान करण्यास विनंती केली.

ती मान्य करून नारायणस्वामी स्नान करून वर आले व काषाय वस्त्र परिधान करून भस्मलेपन करून आसनारूढ झाले.

नंतर सर्व यात्रेकरू भक्तमंडळींसह श्री चिदंबरमहाराजांनी स्नान तर्पणादि आन्हिक आटोपले.

## ।। अध्याय पांचवा ।।

त्यावेळी नारायणस्वामींनी सर्व लोकांना सांगितलें की, हे भक्तहो, प्रत्यक्ष शंकरांनी ही गंगा भागिरथी देवनदी तुम्हां सर्वांकरतां येथे प्रकट केली आहे. येथे स्नान केलें असतां सर्व पापांचा नाश होईल. येंथे पिंडदान व पितृतर्पण केलें असतां पितरांना मुक्ति मिळणार आहे, यांत बिलकूल संशय मानूं नका. तुमच्या भाग्याने श्री चिदंबरांनी तुम्हाला हा मोठा लाभ करून दिला आहे. त्याचा उपयोग श्रध्दाभक्तीनें तुम्ही करून घ्या, इत्यादि भाषण करून चिंदबरमहाराजांसहित मोठ्या जयजयकारांत ते परत आपल्या स्थांनी आले.

त्यादिवशी भिक्षा झाल्यावर स्वामींनी नरसोबाच्या वाडीस जाण्यासाठी चिदंबरेश्वरांजवळ आज्ञा मागितली.

चिदंबरमहाराज म्हणाले, "स्वामीमहाराज, हे तीन महिने आपल्या सत्संगतीत मोठ्या आनंदांत गेले, आपल्या समागम एक क्षणभरच झाला असें वाटतें साधूंचा सहवास किती जरी घडला तरी तो पुरेसा वाटत नाही. प्रत्येकांची कर्मे विचित्र प्रकारची असल्यानें प्रेमी माणसांचा समागम एके ठिकाणी फार दिवस होणें दुर्घटच आहे. जेवढा झाला त्यांतच समाधान मानलें पाहिजे. तुम्ही तरी त्यास अपवाद कसे होणार," वगैरे स्नेहपरिप्लुप्त वाक्यांनी यतिराजांचा गौरव करून त्यांना जाण्यास मोठ्या कष्टाने त्यांनी परवानगी दिली.

पुनः ते म्हणालें कीं, नरसोबाचे वाडीस जातांना मध्ये सांगलीस थोडा वेळ मुक्काम करून माझा एक भक्त नाना त्र्यंबक नांवाचा सांगलीकरांच्या कारागृहांत आहे. त्याला दर्शन द्यावें व त्याचे सांत्वन करून आजपासून सोळावे दिवशी बंदीखान्यांतून तुझी सुटका होईल असें त्याला सांगावें व मग पुढे जावें.

याप्रमाणें सांगून मोठ्या प्रेमाने नारायणस्वामींस चिंदबरमहाराजांनी आलिंगन दिले व जाण्यास निरोप देऊन त्यांना पोचविण्याकरतां गावाच्या वेशीपर्यंत येऊन स्वामींचा निरोप घेऊन परत आपल्या मुक्कामास गेले.

नारायणस्वामी चिदंबरमहाराजांचे प्रेम व आदर वगैरे गोष्टींचे स्मरण करीत करीत सांगलीस येऊन पोहोचले. सांगलीकरांच्या कैदेत असलेल्या नाना त्र्यंबक भक्तास दर्शन देऊन आजपासून सोळावें दिवशी तू बंधमुक्त होशील, कांही चिंता करू नको. श्रीचिदंबरमहाराजांनी हा निरोप सांगण्याकरिता मला पाठविले आहे. तुझी येथून सुटका झाल्याबरोबर प्रथम तूं चिदंबर दीक्षितांच्या दर्शनास जा वगैरे उपदेश त्याला केला.

या नाना त्र्यंबकांनीं कैदेत असतां शेणांनी भिंतीवर सर्व चिदंबर चरित्र लिहिले होते. असा हा चिदंबरांचा परम भक्त होता. असो. याप्रमाणें सर्व यात्रा करून चिदंबरमहाराजांच्या सान्निध्यांत तीन महिने परमानंदांत घालवून नारायणस्वामीमहाराज परत नरसोबाच्या वाडीस आले. श्रीचरणांचें घेऊन यात्रेचा सर्व वृत्तांत श्रींना निवेदन करून पूर्ववत् आपल्या मठांत भगवदुपासना करीत ते राहूं लागले.

याप्रमाणें नारायणस्वामींच्या चरित्रसमुद्रांतील तीर्थयात्रा व चिदंबरमहाराजांचा सहवास नांवाचे परमरत्न या पांचव्या अध्यायांत प्रकट केले आहे ते घेऊन गुरुभक्त आनंदित होवोत, अशी प्रार्थना आहे.

**इति श्रीमन्नारायणचरित्रे तीर्थयात्रा चिदंबर भेट नांवाचा पञ्चमोऽध्यायः । ॐ तत्सत् ।**

★★★

।। श्री ।।

# अध्याय सहावा

प्रत्यक्ष वैकुंठाप्रमाणें असणाऱ्या नृसिंहवाडी क्षेत्रांत सद्गुरूमहाराजांच्या सान्निध्यातील अपूर्व आनंदाचा सोहळा भोगीत नारायणस्वामी राहिले असतां संन्यासाश्रमानंतर कांहीं दिवस सान्निध्यात राहून आपणास भजन ऐकविण्याची सेवा करीन असे महालक्ष्मी जगदंबेला दिलेल्या वचनाची स्वामीमहाराजांना आठवण झाली व तें वचन यथार्थ करण्याकरितां कोल्हापुरास जाण्याचा त्यांनी विचार केला. वचन परिपालन हा संतांचा धर्मच आहे; त्यामुळे सद्गुरू चरणाला सोडून कोठेहि जाऊ नये असें वाटत असतांहि कोल्हापुरास जाण्याविषयी स्वामींनी श्रीचरणाजवळ प्रार्थना केली.

श्रींनीहि, परत लवकरच या, असें सांगून त्यांना प्रेमानें आज्ञा दिली.

तात्काळ नारायणस्वामी कोल्हापुरास आले. श्री जगदंबेला दंडवत करून देवालयाच्या आवारांतच असलेल्या मठांत त्यांनी मुक्काम ठेवला. श्रीजगदंबेला व दत्तमहाराजांना भजन श्रवणार्थ बसण्यासाठी मठांत स्वामींनी दोन कट्टे तयार करविले. रोज प्रातःकाळी चार वाजण्यापूर्वीच उठून पंचगंगेचें स्नान करून यावें व यथायोग्य संध्या-गुरूचरित्रपाठ-ध्यानादि पुण्यमय आचारांनी दिवसाचें सार्थक करावें, रात्री शेजारती झाल्यावर एकान्तात श्रीजगदंबा व श्रीदत्तमहाराज यांना प्रेमानें आवाहन करावे व ते येऊन आसनारूढ झाल्यावर प्रेमळ अशा भजनास आरंभ करावा.

श्रीदत्तमहाराजांचेही स्थान जगदंबेच्या मंदिराच्या दक्षिण बाजूस आहे व भिक्षेकरितां कोल्हापुरांत रोज दत्तमहाराज येतात, ते कोणतें रूप धरून येतात, हें ब्रह्मनिष्ठ भगवद्भक्तांवांचून इतरांना कसें कळणार ?

“मद्भक्ता यत्र गायंति तत्रतिष्ठामि नारद” असें भगवंताचें वचन असल्यानें नारायणस्वामींनी श्रवणास बोलाविल्याबरोबर दत्तमहाराज व जगदंबा दोघेही श्रवणास येत असत.

स्वामी ज्या देवतेस बोलावून तिचे भजन करीत ती देवता साक्षात् त्यांच्यासमोर येऊन त्यांचें भजन ऐकत असे असा त्यांचा प्रभाव होता. ‘दयाघन भक्तां आकळिला’ असें वाक्य प्रसिध्दच आहे, असो.

दोन तास भजन ऐकून दोन्हीहि देव आपापल्या ठिकाणी गेले म्हणजे नारायणस्वामी सद्गुरूंचें स्मरण करून सुषुप्तिसुखांत कांही वेळ घालवीत व पुनः नित्यक्रमास सुरूवात होत असे.

याप्रमाणे जगदंबेच्या इच्छेप्रमाणे कांही दिवस करवीरांत नारायणस्वामी राहिले. स्वतः ब्रह्मनिष्ठ व विधिनिषेधातींत असूनही अज्ञ लोकांना वळण लागण्याकरितां व आपल्या आचरणानें धर्माचा उपदेश देण्याकरितां शास्त्रानुरूप पवित्रतम आचार मोठ्या दक्षतेनें करीत तेथें ते काळ घालवू लागले.

स्वामींच्या सान्निध्यामुळें कोल्हापूरकर मंडळीचे परमभाग्यच उदयास आलें असें म्हणण्यास हरकत नाही. स्वामींचे आचरण व वैराग्य किती कडकडीत होते हें पुढील गोष्टीवरून लक्षांत येण्यासारखे आहे. तो प्रसंग असा :-

एकदां कोल्हापुरांतील मूर्ति बनविणाऱ्या नामांकित कारागिरानें दत्तभक्त असलेल्या एका गिऱ्हाईकाकडून आधीच कांहीं रक्कम घेऊन त्याला हवी होती तशी सुवर्णाची सुंदर दत्तमूर्ति - शास्त्रोक्त सर्व चिन्हें व लक्षणें यांनी युक्त असलेली - बनविली व ती मूर्ति त्या गिऱ्हाईकाला देण्याकरितां वस्त्रांत गुंडाळून तो त्याच्या घराकडे निघाला. स्वामींच्या मठावरूनच त्याच्या घराकडे जाण्याचा रस्ता असल्यानें तो कारागीर मठासमोरून जाऊं लागला.

इतक्यांत स्वामीमहाराजही कांही कार्यामुळे मठाच्या दरवाजांत आले. स्वामीमहाराज म्हणजे एक महान् विभूति आहे असे कोल्हापुरांत प्रसिध्द असल्यांने स्वामींना पाहतांच मोठ्या भक्तिभावानें कारागिरानें त्यांना साष्टांग नमस्कार केला.

स्वामींनी 'नारायण' म्हणून त्याला आशीर्वाद दिला व सहज विचारले कीं, अरे तुझ्या हातांत हें कपडयानें झांकलेलें काय आहे ? कोणास न दाखविता गुप्त ठेवण्यासारखें असल्यास माझें कांहीं म्हणणें नाही. परंतु तसें नसल्यास सांगण्यास किंवा दाखविण्यास कांही हरकत नाही.

मूर्तिकार म्हणाला, महाराज आपल्यापासून लपवून ठेवण्यासारखें माझ्याजवळ काय असणार ? एका ग्राहकानें दत्तमूर्ति करण्यास सांगितली होती ती करून त्याला देण्याकरितां मी जात आहे. धूळ वगैरे उडून खराब होऊ नये म्हणून कपडा झाकला आहे; असें बोलून कपडा काढून ती मूर्ति त्याने स्वामींच्या पुढें ठेवली.

प्रसन्नमुखकमल असलेली व सर्वावयव सुंदर आणि शास्त्रीय लक्षणांनीयुक्त असलेली ती प्रभूंची मूर्ति पाहून स्वामीमहाराजांचे चित्त अगदी प्रसन्न झालें. वारंवार त्या मूर्तीकडे सर्व बाजूंनी त्यांनी पाहिले.

ते त्याला म्हणाले, 'शाबास ! कारागिरी असावी तर अशी असावी. तू मूर्ति फारच सुंदर केली आहेस. भगवंतांच्या वर्णनाप्रमाणे बरोबर मूर्ति साधली तर त्यांत भगवत्कलेचा प्रवेश होतो. म्हणजे 'बिंबाभिरूप्यात्सान्निध्य' या शास्त्राप्रमाणें देवाचे त्या मूर्तीत वास्तव्य होते. तुझी मूर्ति तशीच आहे. असें म्हणून ती मूर्ति ग्राहकाकडे घेऊन जाण्यास त्याला सांगितले व आपण उद्योगाकरतां मठांत आले.

मूर्तीकारानीं आपल्या मूर्तीविषयी स्वामीमहाराजांच्या मनांत फार प्रेम आहे, त्यांना ही मूर्ति फार आवडली आहे व त्यांनाच ही मूर्ति दिली असतां ती योग्य ठिकाणी जाईल व माझेही कल्याण होईल, परंतु काय करणार ? पूर्वीच ग्राहकाकडून पैसे घेऊन मी ही मूर्ति बनविली व ती देण्याची मुदतही भरली, आतां ही मूर्ति त्यालाच देणें भाग आहे. त्यास काही इलाज नाही. आतां स्वामीमहाराजांकरतां याहून उत्तम दुसरी मूर्ति करून त्यांना अर्पण करावी असा विचार करून तो कारागीर आपल्या गिऱ्हाईकाकडे गेला व ठरल्याप्रमाणें त्यांने ती मूर्ति त्याला दिली व त्याबद्दल मोबदला घेऊन तो घरी आला व तात्काळ दुसरी मूर्ति करण्याच्या उद्योगाला लागला. थोड्याच दिवसांत पूर्वीपेक्षा अत्यंत सुंदर अशी दत्तमूर्ति त्यांने केली व मोठ्या आनंदाने तो महाराजांच्या मठांत आला. साष्टांग नमस्कार करून ती मूर्ति त्यानें महाराजांच्यापुढे ठेविली व म्हणाला, "महाराज ही मूर्ति आपणाकरतां मी आणली आहे. तिचा स्वीकार करून मला आशीर्वाद द्यावा."

ते ऐकून महाराज म्हणाले, "तुझें कल्याण होवो. परंतु आम्हाला या मूर्तीची गरज नाही. मूर्ति पहिल्याहूनहि सुंदर आहे व तूहि भक्तिभावानें आमच्याकरतां ही केली आहेस. द्रव्यप्राप्तीकरतां कांहीं केली नाहीस हें सर्व जरी खरें असलें तरी आम्हाला या मूर्तीपासून उपाधी होईल. ही मूर्ति सुवर्णाची आहे व संन्याशानें धातूला स्पर्श करू नये असें संन्यासशास्त्र सांगत आहे. तरी आग्रह न करतां तूं ही मूर्ति घेऊन जा. मनांत खट्टू होऊं नकोस. सर्वांनी शास्त्राज्ञेचें प्रतिपालन केलें पाहिजे. कारण शास्त्र म्हणजे भगवंतांनी केलेली आज्ञा आहे.

कामानें, भयानें किंवा लोभानें ती आज्ञा मोडू नयें, एवढेंच काय प्राण जरी जाण्याचा प्रसंग आला तरी शास्त्राज्ञा मोडू नये असा भगवदभिप्राय आहे. त्याप्रमाणें वागले असता आपले व जगाचेहि कल्याण होते." इत्यादि वचनांनी त्या कारागिराचें सांत्वन करून त्याला घरी पाठवून महाराज नित्याच्या भगवत्चिंतनादि कार्यास लागले.

वास्तविक दृष्टीने विचार केला तर सर्व ब्रह्ममय आहे अशी ज्यांची दिव्यदृष्टी झाली आहे व समलोष्टाश्मकांचन असा ज्यांचा अनुभव आहे त्यांना या धातु मूर्तीच्या स्पर्शाने काय होणार ? परंतु लोकशिक्षणाकरितां बाह्यदेहाचा व्यापार शास्त्रानुरूप ठेवणें हेंच महात्म्यांचे ध्येय असते व तो त्यांचा स्वभावच बनलेला असतो. भगवंतांनीसुध्दा गीतेंत शास्त्रानुसार वर्तन करून मला अभ्युदय व निःश्रेयस हें कांही प्राप्त करून घ्यायचे नाहींत कारण मी आप्तकाम व पूर्णकाम असा आहे. परंतु शास्त्रोक्त सर्व कर्मे मी मोठ्या दक्षतेंने करतो असें "नानावाप्तमवाप्तव्यंवर्त एवचकर्मणी" अशा वचनांनीं त्यांनी सांगितले आहे, मग इतरांची कथाच काय ?

स्वामीमहाराज भगवद्रूप झाले असल्यानें त्यांनी असें आचरण कडक ठेवणें हे योग्यच आहे. 'न हि कश्चित्क्षणमपि जातुतिष्ठात्यकर्मकृत्' या सिध्दांताप्रमाणें कामवाद, कामभक्ष, कामाचार म्हणजे यथोपपाद मूत्र पुरीषादिही तत्वज्ञानी करू शकतो व नियतवाद, नियतभक्ष व नियतचार म्हणजे शास्त्रानुसारी वर्तनही करू शकतो. कोणत्याही आचरणापासून त्याला हानी किंवा लाभ नाहीं. 'न वर्धते कर्मणा नोकनीयान्' असा तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे; परंतु लोकोपकाराकरतां आजपर्यंत भगवदवतार व त्यांचे शिष्यभक्त शास्त्रानुसारच वागत आले आहेत व शास्त्राधारें वागणेच ईश्वराला अत्यंत प्रिय असल्यानें सप्तमभूमिकारूढ होईपर्यंत म्हणजे शुध्दीवर असेपर्यंत शास्त्राधारानें वागणेंच इष्ट आहे, हे तत्त्व स्वामीमहाराजांनी आपल्या आचरणानें सर्वांना दाखविलें व कोल्हापूरकरांना आनंदसागरात बुडवून ते तेथें राहिलें.

सर्वांना आनंद देणारी जगज्जननी महामाया लक्ष्मीसुध्दां ज्यांच्या भजनानें मोहाला पावली, म्हणजे प्रेमानंदांत निमग्न झाली त्या यतिराजांचें व त्यांच्या भजनाचें वर्णन शारदा, सहस्त्रमुख शेष प्रभृति मोठे अधिकारी लोकही करूं शकणार नाहींत; मग इतरांची कथाच काय ? धन्य आहे त्या नारायणस्वामीमहाराजांची व त्यांच्या भजनाची.

याप्रमाणें नारायणस्वामीमहाराजांच्या चरित्रामृत सागरांतील स्वामीमहाराजांचे भजन, वैराग्यशास्त्रनिष्ठा वर्णनरुप सहावें रत्न येथें प्रगट केलें आहे. गुरूभक्तांनी याचा स्वीकार करून आनंदित व्हावें.

**इति नारायणस्वामीचरिते वैराग्यादिवर्णन नामक षष्ठोऽध्यायः** ।। ६ ।। ॐ **तत्सत्** ।

★★★

# अध्याय सातवा

याप्रमाणें करवीरक्षेत्रांत जगज्जननी महालक्ष्मी व श्री दत्तमहाराज यांना आपल्या प्रेमळ भजनानें संतुष्ट करणारे नारायणस्वामीमहाराज कोल्हापुरांत असतां एकेवेळी दोन्ही देवांसमोर नित्यांचे भजन झाले. भजनानंदांत मग्न झालेले देवद्वय भजनानंतर श्रीनारायणस्वामींना म्हणालें, 'नारायणस्वामिन् उद्यां तुम्ही दुर्गमान ( हल्ली याला दुर्ग - मानवड असे म्हणतात ) नावांचे डोंगरावर जावें.'

ही आज्ञा ऐकून नारायणस्वामींनी ती शिरसामान्य केली. कारण, "बाढमित्यनुमन्येत गौरवेण गुरोर्वचः ।" गुरूंची कोणतीही आज्ञा असली तरी 'होय' म्हणून शिष्यानें ती मान्य केली पाहिजे. त्यांत त्याचें कल्याणच आहे, असे शास्त्र आहे व शिष्ट शिष्यांचा संप्रदायही तसा आहे.

समर्थांनी एकेवेळी अंबादास नांवाच्या शिष्याला, विहिरीवर आलेल्या झाडाच्या डहाळीवर चढण्यास सांगून, तो चढल्यावर पुढें बसून मागचा डहाळीचा भाग तोडण्यास सांगितला. त्यानें कांही विचार व करतां समर्थांच्या आज्ञेप्रमाणें, भाग तोडताच, डहाळीसहीत खालीं खोल असलेल्या विहिरीत पडून तो बुडाला. तीन दिवसानंतर समर्थांनी विहिरीच्या काठावरून विचारलें की, 'अंबादास, कसें काय आहे ?' त्यानें आंतून उत्तर दिलें की, 'महाराज कल्याण आहे. यानंतर तो वर आला व त्यांचे 'कल्याण' असें नांव समर्थांनी ठेवलें. या तीन दिवसांत समर्थांनी त्याच्यावर अनुग्रह करून त्याला पूर्ण ब्रह्मरूप, कल्याणरूप केलें, अशी कथा समर्थचरित्रांत आहे. म्हणून गुरूवचन सर्वथा अनुल्लंघनीय आहे.'

देव म्हणालें, 'तुम्ही तिकडे निघाला म्हणजे काय काम आहे, तें कळेल.'

तें ऐकून उभयतांना स्वामींनी साष्टांग नमस्कार केला व 'उद्या जातो,' असे ते म्हणाले. दोन्ही स्वाऱ्या आपापल्या ठिकाणी गेल्या.

दुसरें दिवशी नित्याप्रमाणें स्वामींनी पंचगंगेत प्रातःस्नान केलें. आपलें आह्निक संक्षेपतः आटोपलें व एक दोन शिष्यांना बरोबर घेऊन श्रीमहालक्ष्मी व दत्तमहाराज यांना वंदन करून ते दुर्गमान पर्वताच्या रस्त्याला लागले. जातांना रस्त्यांत 'देवद्वयांनी मला कां बरे डोंगरावर जाण्याची आज्ञा दिली असेल ?' असा एकाग्रतेनें ते थोडा विचार करतात. तोच पुढें होणारें व्याघ्र पीडा निवारणादि सर्व दृश्य अकस्मात् त्यांच्या मनःश्र्चक्षूसमोर उभें राहिले. मग निश्र्चिंत होऊन ते रस्ता चालू लागले.

हा दुर्गमान पर्वत कोल्हापुराच्या नैऋत्य दिशेला कोल्हापुराहून सुमारे २६-२७ मैल दूर आहे. याची शोभा मोठी रमणीय आहे. आंबे, फणस, कवठ, चिंच वगैरे मोठमोठी झाडें त्यावर विपुल आहेत. नाना प्रकारच्या वनस्पती, लता इत्यादिकांनी हा व्याप्त आहे. यांच्यावर असलेल्या जंगलांत सांबर, अस्वले, कोल्हे, डुकरे, वाघ वगैरे अनेक पशु व नाना प्रकाराचे पक्षी वास्तव्य करतात. दिवसासुध्दां एकटया दुकटयाला येथें जाणें अगदीं कठीण आहे.तरी पण हा भाग मनोहर

आहे. गर्द झाडी असल्यानें दुपारच्या बारा वाजताच संध्याकाळ झाली की काय ? असा भास होतो. याच्या पायथ्याशी विजया देवीचें झोपडीवजा एक मंदिर आहे. त्याला द्वार नसले तरी तें बन छायेने सुंदर दिसतें. या पर्वताच्या दरीत भैरी देवाचे लिंग आहे. तेथेच स्वच्छ पाण्याचा एक झरा बारा महिने अखंड वहात असतो. या झऱ्यापासूनच किंवा हा झरा म्हणजेच पंचगंगेतील 'तुळशी' नदी होय. यांतील पाणी लोकोपयोगाकरता एका मोठ्या टाकीत साठविलें आहे. असा हा सर्वगुणसंपन्न रमणीय दुर्गमान पर्वत आहे.

तेथे जाण्याकरता शिष्यांसह स्वामीमहाराज चालले. सकाळींच कोल्हापुराहून निघाले असल्यानें व त्यांची चालहि जलद असल्यानें, सुमारे अकरा वाजण्याच्या सुमारास कोल्हापुराहून १५–१६ मैलांवर असणाऱ्या 'कौलव' नांवाच्या गांवात स्वामीमहाराज आले. तेथे स्वामीमहाराजांनी ज्यांच्यावर अनुग्रह केला होता असे सात्विकवृत्तीचे, स्वकर्मनिष्ठ व भगवद्भक्त नागेशभटजी गुळवणीं नांवाचे गृहस्थ रहात होते. त्यांच्या घरांत अकस्मात् बाराच्या सुमारास महाराज आले व 'नारायण' असा भगवन्नामाचा उच्चार उच्च स्वरांत त्यांनी केला.

स्वर ओळखीचा जाणून नागेशभटजी बाहेर येऊन पहातात तो प्रत्यक्ष परब्रह्म स्वरूपीं आपल्या गुरूमहाराजांची मूर्ति त्यांच्या दृष्टीस पडली. ती पाहून त्यांच्या आनंदाला कांहीं पारावार राहिला नाही. बोलावूनसुध्दा न येणारे महाराज अकस्मात् आपण होऊन आपल्या घराकडे आले म्हणून नागेशभटजी आनंदाने नाचूं लागले. अनेक जन्मांत संपादन केलेली तपश्चर्या फलद्रुप झाली म्हणजेच अशा सद्‌गुरूंचा लाभ होतो. तीन दुर्लभ गोष्टींपैकी 'महापुरूषसंश्रय' नागेशभटजींना मिळाली व स्वेच्छेने आपल्या घराकडे चालून आली, मग त्यांच्या भाग्याचे वर्णन काय करावे ? त्यांनी प्रेमभराने स्वशिष्यांसह गुरूमहाराजांना आदरानें घरांत आणून आसनावर बसविले.

नागेशभटजी गुळवणी कोल्हापूर जिल्हयांतील राधानगरी तालुक्यांतील 'कौलव' गांवात राहणारे. या गांवाशेजारच्या कुडुत्री, तारळें, सोळंकर इत्यादि गावातहि गुळवणी उपनावांची कांही घराणी होती. राधानगरीकडे मोटीरींने जाऊ लागले की, वाटेत घाटमाथ्यावर गैबीनाथाचें ( गहिनीनाथांचें ) स्थान आहे. त्या स्थानावरून खाली जाण्यासाठी अनेक फाटे फुटले असून डोंगराच्या कुशीत वर दिलेली निसर्गाच्या मनोरम दृष्याने नटलेली गांवे वसलेली आहेत.

नागेशभटजी सदाचारसंपन्न असून परंपरागत वैदिक वृत्तीनें आपला प्रपंच चालवीत असत. त्यांना पुत्रसंतान नसल्यामुळे ते उदासीन असत. पण नारायणस्वामी यांची भेट होऊन त्यांना पुत्रलाभ झाला म्हणून मुलाचें नांवही त्यांनी नारायण ठेविले; नागेशभटजींवर कृपा करतांना नारायणस्वामींनी एक लहानशी अट घातली होती. 'वंशपरंपरेनें स्वकीय घराण्यांतील कोणीतरी एक मुलगा कोल्हापुरी सेवेसाठी द्यावा.' ही प्रथा वामनरावजींच्या बंधूंपर्यंत सर्वांनी चालविली आहे.

नारायणस्वामींच्या कृपेनें झालेला नारायण वेदशास्त्रसंपन्न होताच त्याला वे. मू. नारायणभटजी असें अभिधान प्राप्त झालें. त्यांना चार मुलगे आणि तीन मुली झाल्या. त्यापैकी ज्येष्ठ चिरंजीव वे. मू. दत्तंभट हे सपत्नीक ( सौ. उमाबाईंसह ) कुडुत्रीस रहावयास गेले.गैबीनाथाच्या स्थानापासून जे दोन तीन रस्ते फुटतात, त्यापैकी उजव्या बाजूच्या रस्त्यानें गेले की, १–२ मैलावर हें गांव आहे. कोंकण व घाट यांची एकत्रित शोभा कोठें पहावयाची असेल तर गैबीच्या टेकडीवर पहावी. अशा निसर्गरमणीय स्थानी गेल्यावर पारमार्थिक वृत्तींच्या साधकाचें विवेकवैराग्य द्विगुणित व्हावें यांत कांहींच आश्र्चर्य नाही.

दत्तंभट व सौ. उमाबाई यांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता. उदरनिर्वाहाकडे त्यांचे अगदी जरूरीपुरतेंच लक्ष असें. इतर वेळीं तें भगवद्‌भक्तीत रंगून जात असत. पुढें पुढें तर त्यांनी सर्व भार ज्येष्ठ पुत्रावर सोपवला आणि आपण साधनमग्न झाले.

## ।। अध्याय सातवा ।।

परान्न वर्ज्य करून महान्यासपूर्वक रूद्र, एकादशिनी व पंचसूक्त पवमानांनी युक्त अशी साभिषेकपूजा करून ते बारा वाजता अर्ध्या मैलावर असलेल्या भोगावती नदीवर ब्रह्मयज्ञ करावयास जात व नंतर भोजन करीत. दुपारी श्रीविष्णुसहस्त्रनामाचे पाठ करीत आणि रात्री श्रीनारायणस्वामीमहाराजांचे सांप्रदायिक भजन करीत.

दर पौर्णिमेला घोड्यावरून श्रीनृसिंहवाडीची सहकुटुंबवारी करीत. धन, मान, ऐश्र्वर्य मिळावे असा ऐहिक हेतूहि या तपाचरणाच्या बुडाशी नव्हता. मात्र उभयातांची एकच सात्त्विक तीव्र इच्छा होती कीं, श्रींच्या पादुका प्राप्त व्हाव्यात.

बऱ्याच दिवसानंतर सौ. उमाबाई बेचैन झाल्या. पुराणांतरी वर्णन केलेले दृष्टांताचे दाखले मनांत आणून आपल्याला श्रींच्या पादुका प्राप्त व्हाव्यात असा तीव्र हेतु त्यांनी मनांत धरला आणि सहा सात दिवस अगदी कडक उपोषण करून, निष्ठापूर्वक त्यांनी श्रींपुढे निदिध्यास धरला. शेवटी त्या परम कारूणिक श्रींना त्यांची करूणा आली आणि सातव्या दिवशी दुपारी बारा वाजता, सौ. उमाबाई निदिध्यासांत निमग्न असतांना त्यांच्या ओटीत श्रींनी चांदीच्या अष्टगंधयुक्त पादुकांचा प्रसाद आणून घातला.

मरेपर्यंत त्या पादुकांची पूजा उमाबाईंनी सोडली नाही. आजहि त्या चांदीच्या पादुका त्यांचे चिंरजीव वामनराव यांच्या देवपूजेंत षोडशोपचारयुक्त पुजेचा मान घेत डौलाने विराजमान असतांना सर्वांना दिसत आहेत. "शुध्द बीजापोटी । फळें रसाळ गोमटी ।।" अशी संतांची उक्ति किती यथार्थ आहे हें या उदाहरणावरून लक्षांत येण्यासारखें व घेण्यासारखें आहे.

सौ. उमाबाईंना श्रीकृपेचा आलेला एक दिव्य अनुभव स्पृहणीय आहे. श्रीशके १८१५ तली गोष्ट. सौ. उमाबाईंच्या पोटांत एक रोग झाला. अनेक औषधे झाली; पण गुण येईना. शेवटी त्यांना कोल्हापूरला आणले. तेथील सर्जन डॉ. आपटे यांना त्यांची प्रकृति दाखविली.

पोटांतला हा रोग एक प्रकारचा असाध्य गुल्म किंवा कॅन्सरसारखा कांही प्रकार असून त्यावर औषधोपचार किंवा शस्त्रक्रिया यांचा कांही उपयोग होणार नाही असें त्यांनी सांगतिले. त्यावर कांही दैवी उपाय करणे असेल तर करावा असेंही त्यांनी सुचविलें.

डॉक्टरांचे मत नक्की कळल्यावर शेवटचा उपाय म्हणून श्रींची सेवा करून श्रीचरणावरच भार टाकण्याचे सर्व मंडळींनी एकमताने ठरविलें. सौ. उमाबाईंना घेऊन नरसोबाचे वाडीस गेले. श्री. शंकर भटजी ( शंकरस्वामी मूळ चरित्र लेखक) रोज पहाटे श्रींच्या सेवेसाठी जात आणि दीड दोनच्या सुमारास खोलीवर येत. ज्या खोलीत ही मंडळी रहात ती नारायणस्वामींच्या देवळाजवळ दक्षिणेस अगदी लागूनच आहे. ( श्री. वामनरावजींना सत्तर वर्षे उलटल्यानंतर वाडीस त्यांची भैमरथी शांति झाली त्यावेळेस ज्या खोलीत होमहवन झालें त्याच्या पाठीमागेच ही खोली आहे.)

एक दिवस दुपारी २ वाजतां शंकरभटजी आपलें नित्यानुष्ठान संपवून कृष्णामाईवर ब्रह्मयज्ञास गेले होते. सौ. उमाबाई स्वयंपाक करीत होत्या. इतक्यांत एक तेजस्वी संन्यासी नारायणस्वामींच्या मठांतील त्या खोलीत आले. सौ. उमाबाईच्याजवळ यतिवर्यांनी प्रकृतीची चौकशी केली. चुलीपाशीच परातीत हात धुवून उठल्या आणि त्यांनी यतिमहाराजांना नमस्कार केला. आपल्या कमंडलूतलें दोन पळ्या तीर्थ स्वामीमहाराजांनी सौ. उमाबाईंच्या हातावर घातलें व ते निघून गेले. तीर्थ पोटांत गेल्याबरोबर सौ. उमाबाईंच्या पोटातील गुल्म फुटलें आणि आंतील रक्त, पू इ. वाहू लागलें. सौ. उमाबाई तेथेच निश्र्चेष्ट पडून राहिल्या.

## ।। अध्याय सातवा ।।

श्री. शंकरभटजी तीन वाजता आन्हिक आटोपून येतात तो मातोश्रींची ही अवस्था. श्री. प. पू. टेंबेस्वामीमहाराजांच्या मावशी ( दुर्गामावशी ) यांनी त्यांना शुध्दीवर आणलें व त्यांना कृष्णानदीचें स्नान घालून घरी आणले. श्री. शंकरभटजी कृष्णामाईवर ब्रह्मयज्ञ करीत होते. ते खोलीवर आलेच नव्हते. स्वामीमहाराज म्हणजे प्रत्यक्ष नृसिंहसरस्वतीच आपल्या भक्ताचें संकट निवारण करण्यासाठी आले होते. श्रींनी प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांना शारीरिक रोगांतून मुक्त केलेच पण त्या माउलीची भवरोगाचीहि बाधा त्याच क्षणापासून लयाला गेली. सौ. उमाबाई शेवटपर्यंत श्री. वामनरावजींबरोबरच रहात असत. ही हकीकत ज्या दिवशी घडली त्याच दिवशीचें ( आश्विन शु. ३ ) श्री. शंकरभटजींचे वे. मू. दत्तभटांना लिहिलेल्या पत्राचा फोटो या पुस्तकांत छापला आहे.

श्री. टेंबेस्वामीमहाराजांनी दिलेला उपदेश निरंतर ध्यानांत ठेवून त्यांनी दिलेले साधन त्या करीत असत. सर्वांशी गोड बोलणे, अथितअभ्यागताचा सत्कार करणें, वामनरावजींची काळजी घेणे व गोदूबाईंवर प्रेमाची दृष्टि टाकणें, याशिवाय त्या माउलीनें जन्मभर अन्य व्यवसाय केला नाही. त्याची मूर्ति चाळीतील लोकांच्या अजून स्मरणांत आहे. इ. स. १९३३ मध्यें त्यांचा अंत झाला. योगी वामनरावहि विचलित झाले. साक्षात्कारी मातेंचे योग्य ते अंत्यसंस्कार वामनरावांनी केले आणि त्यांच्या अस्थि प्रयागराजांत जाऊन विसर्जित केल्या.

दत्तभटांचे ज्येष्ठ चिरंजीव शंकरशांस्त्री यांनीच ( या ग्रंथाचे चरित्रनायक ) नारायणस्वामींचे चरित्र आपले वडील दत्तंभट, आजोबा नारायणभट, पणजोबा नागेशभट, यांच्याकडून परंपरेने ऐकलेलें टांचणरूपाने मराठींत करून ठेवले होते. पुराण सांगण्यास यावे असे 'या टांचणांचे संस्कृत श्लोकांत भाषांतर करून द्या' असे त्यांनी मला सांगितल्यावरून ही वेडीवाकडी श्रींची चरित्रलेखनरूपसेवा मला करता आली.

शंकरशास्त्रीसुध्दां सत्कर्मनिष्ठ, प्रेमळ, भगवद्भक्त होते. शेवटी त्यांनी संन्यास ग्रहण करून नरसोबाच्या वाडीत श्रीसेवा करीत काळ घालविला. त्यांना कवित्वशक्ति असल्यानें त्यांनी 'गुरूप्रसाद' नांवाचा मराठी ओवीबध्द ग्रंथ वाडीच्या पूर्वजांच्या म्हणजे भैरंभटाच्या वर्णनपर लिहिला आहे.

दत्तंभट व उमाबाई यांचे पांचवे पुत्र आजही पुण्यांत, नारायण पेठेंत, गोवईकरांच्या वाड्यांत एका लहानशा खोलींत रहात आहेत. पूर्वी बाह्यदृष्टीनें नूतन मराठी विद्यालयांत ड्राइंग मास्तर म्हणून पुण्यांत ओळखले जाणारे परंतु आजन्म ब्रह्मचर्य पाळून श्रीसद्‌गुरू परमहंसपरिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती सरस्वती श्रीचरणांना सद्‌गुरूत्वानें वरून, त्यांच्याकडून खेचरी मुद्रेपर्यंत सर्व योगाची प्रक्रिया हस्तगत करून, आपल्या कुटीत त्याचा प्रसिध्दिवैमुख्यानें अंतरंग अभ्यास करणारें, महाराजांनी घालून दिलेल्या नियमांचे प्रयत्नपूर्वक पालन करून परमशांतचित्तवृत्ति ठेवून जीवन्मुक्ताप्रमाणें वागत आहेत.

त्यांनी महाराजांची अल्पतरी सेवा घडावी आणि त्याद्वारें लोकांत ज्ञानज्योती तेवत ठेवावी या उद्देशानें अत्यंत उपकारक अशी 'वासुदेवानंद सरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळ' नांवाची संस्था काढून महाराजांचे मुद्रित, अमुद्रित अशा सर्व ग्रंथांचे भाषांतरासहित सुंदर मुद्रण केलें आहे.

श्रीलोकनाथस्वामींनी दिलेल्या शक्तिपातविद्येनें सुशिक्षित, अशिक्षित सर्व लोकांना त्या विद्येची चमक दाखवून, त्यांना सन्मार्गाची गोडी उत्पन्न करणारे, महाराजांच्या भजनांत, नामस्मरणांत व उत्सवांत सर्वदा निमग्न असणारे "अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। ही भगवदुक्ति आपल्या जीवनादर्शानें सार्थ करून दाखविणारे, 'वामनरावजी गुळवणी' योगीराज हे नागेश भटजी गुळवणी या सद्भक्तांचे पणतु होत.

## ।। अध्याय सातवा ।।

महापुरूष संश्रयानें काय काय लाभ होतात हें दाखविण्याकरितां प्रसंगवशात् अनुभूत गोष्टी लिहिल्या व स्वामींच्या चरित्रास थोडा फाटा फुटला. त्याबद्दल वाचक क्षमा करतील. मी बाजूला वळलों याचें कारण हा फाटा मूळ वृक्षाचाच आहे व तो फुलांनी बहरलेला आहे. असो.

नागेश भटजींनी मोठ्या आनंदाने व भक्तिभावानें महाराजांना भिक्षेची प्रार्थना करून, शिष्यासह भिक्षा दिली व 'मी आज धन्य झालों. माझें जीवित सफल झालें. माझा फाटका प्रपंच धड झाला. निरंतर कृपा असावी' अशा त्यांच्या चरणी विनंति केली.

श्रींनीही प्रसन्न होऊन त्यांना पूर्ण आशीर्वाद दिला व त्यांच्या घरीं त्या रात्री मुक्काम केला. दुसरे दिवशी प्रातःस्नान व आन्हिक तेथेंच करून नागेश भटजींच्या इच्छेनुसार त्यांनाही बरोबर घेऊन स्वामीमहाराज पुढें निघाले. बारा वाजण्याच्या सुमारास ते 'तारळे' नांवाच्या गांवात आले. तेथे रामदीक्षित गुळवणी नांवाच्या आपल्या पूर्वाश्रमांतील श्वशुरांच्या घरांत त्यांचे प्रार्थनेवरून शिष्यासहित स्वामीमहाराजांनी भिक्षा केली व लगेच ते दुर्गमान पर्वतावर जाण्यासाठी निघाले.

कोणत्या उद्देशानें तिकडे श्रींचे गमन होणार असे ग्रामस्थांनी विचारले असतां 'जाण्यास भगवदाज्ञा आहे, 'विजया' देवीचें दर्शनही होईल,' असे उत्तर श्रींनी दिले.

तें ऐकून ग्रामस्थ मंडळी म्हणाली कीं, आजचा मुक्काम येथें करून उद्या सकाळी तिकडे गेल्यास आम्हीही आपल्याबरोबर मार्ग दाखविण्यास येऊ.

स्वामीमहाराज म्हणाले की, 'आज सायंकाळींच तेथें पोहोचले पाहिजे.'

ग्रामस्थ म्हणाले, 'महाराज ! तेथें पुष्कळ दिवस झाले कोणाची वस्ती नाही. अलिकडे एक महिना झाला विजया देवीची पूजासुध्दां बरोबर घडत नाही, कारण एक मोठा वाघ तेथे वारंवार येत असतो.'

हें ऐकून महाराज म्हणाले, 'तर मग तुमच्यापैकी आमच्याबरोबर कोणीच येऊं नये, आम्हांस आज तेथें गेलेच पाहिजे. तुम्ही प्रापंचिक माणसांनी आमच्या नादी लागणे बरें नाहीं आम्ही उद्या येथें येऊ किंवा कार्यपरत्वे कांही दिवस तेथेंही राहूं. निश्र्चित कांही सांगता येत नाही. आज तिकडे गेले पाहिजे ही गोष्ट खरी आहे.'

तें ऐकून ग्रामस्थ म्हणाले, 'महाराज ! असें म्हणूं नका, उद्या आम्ही सर्वजण बरोबर येऊ व मिळूनच तेथील कार्य आटोपून परत येऊं. आतां तिकडे जाण्यास अंधारही होईल, याउपर श्रींची इच्छा जशी असेल त्याप्रमाणे होईलच.'

हें त्यांचे म्हणणें ऐकून स्वामीमहाराज त्यांना म्हणाले, 'लोकहो ! वाघ तेथे वारंवार येतो ही गोष्ट सत्य आहे व आम्हांसहि अवश्य तेथे गेले पाहीजे. मग आज काय, उद्या काय, वाघ आम्हांस खाणार असला तर तो उद्या खाणार नाही हें कशावरून ? भगवदिच्छेशिवाय झाडांचे पानसुध्दां हालत नाही. 'भीषास्मद्वातः पवते' इत्यादि श्रुति, भगवंताच्या भीतिनें सर्व जग त्याच्या आज्ञेनुसार वागते, मोठेमोठे इंद्र, सुर्य, वायु, अग्नि,यम वगैरे देवसुध्दां भगवदाज्ञा उल्लंघन केली तर शासन होईल या भीतिनें आपापलीं कामें नियमितपणे करतात, असें निश्र्चितपणे सांगते. मग वाघ तरी ईश्र्वराज्ञेशिवाय आम्हांस कसा खाईल ? ईश्र्वराने तर तिकडे जाण्यास आज्ञा दिली आहे. देव अनुकूल असला म्हणजे उघडी असलेली वस्तुहीं सुरक्षित राहतें व त्याची अनुकूलता नसल्यास प्रयत्नांनी रक्षण केलेल्या वस्तूंचाहि नाश होतो.

## ।। अध्याय सातवा ।।

अशी शेकडों उदाहरणें आहेत. शिवाय नीतिशास्त्र असें सांगते कीं, वाघ आळशी आहेत, सर्पाला भीति आहे व दुर्जन लोक निर्धन आहेत म्हणून इतर प्राणी या जगांत जिवंत राहिले आहेत. तसे नसतें तर या तिघांनी जगाचा केव्हांच फडशा पाडला असतां. त्यामुळे वाघांची भीति बाळगण्यांचे काही कारण नाही. असें असूनही जर तुम्हांस भीति वाटत असेल तर मी एकटाच जातो. तुम्ही कोणी येऊ नका, असें म्हणून स्वामींमहाराज जाण्याकरितां निघालेच.

हे पाहून व महाराजांच्या बोधामृतानें भीति दूर झाल्यानें लोकहि त्यांच्याबरोबर तिकडे जाण्यास निघाले.

महाराज त्यांच्याकडे पाहून त्यांना म्हणाले की कोणी तरी दोन चार बिब्बे व एकदोन सुया बरोबर घ्या. या वस्तूंचा तेथे उपयोग होण्यासरखा आहे.

हें ऐकून त्या वस्तू घरांतून तात्काळ एकजण घेऊन आला.

महाराज नागेश भटजी गुळवण्यांना म्हणाले, 'या वस्तु तुमच्याजवळ घ्या.'

त्याप्रमाणें त्यांनी बिब्बे व सुया आपल्याजवळ घेतल्या.
ग्रामस्थांना महाराज म्हणाले, 'शिष्यांसहित आम्ही जातो, तुम्ही घरींच रहा, आम्ही लवकरच परत येऊं.'

हें त्यांचे वाक्य ऐकून त्यांच्याबरोबर जाण्याची इच्छा असूनही निरूपायास्तव सर्व लोक परतले व स्वामीमहाराज शिष्यांसह पुढें चालले.

अत्यंत रमणीय असणारी वनश्री पहात पहात एकान्तस्थळी असणाऱ्या विजया देवीच्या रमणीय मंदिराजवळ महाराज आले. देवीला दंडवंदन करून, प्रसन्न मनाने मंदिराच्या ओट्यावरच महाराज काहीं वेळ भगवद्‌चिन्तन करीत बसले. वृक्षांची घनदाट छाया असल्यानें सर्व मंडळींना संध्याकाळ झाली असें वाटूं लागले.

महाराज म्हणाले, 'अद्यापि संध्याकाळ होण्यास अवकाश आहे. या छायेमुळे तसें भासत आहे. रात्री बरीच थंडी पडेल असें दिसते. तरी दिवसा उजेडीच इंधन गोळा करून ठेवा, म्हणजे रात्री अग्नि प्रज्वलित करून थंडीचे निवारण करतां येईल.

शिष्यांनी आज्ञेप्रमाणें बरेंच सर्पण गोळा करून ठेवलें व ते सर्व श्रीचरणाजवळ बसले. इतक्यांत देवीची व्यवस्था करणारा सालकरी गुरव एका माणसास सोबतीला घेऊन दिवा लावण्याकरतां आला. देवीच्या नंदादीपात तेल भरून वात सारून तो परत गांवी गेला व सुर्यही अस्त पावला.

श्रीमहाराजही जवळ असलेल्या झऱ्यावर सायंसंध्यावंदनादिकृत्य उरकण्याकरितां शिष्यमंडळींसहित गेले व सर्व आन्हिक आटोपून परत देवी मंदिरात आले. विजयादेवीला दण्डवन्दन करून ओट्यांवरच शिष्यांनी घातलेल्या आसनावर विराजमान झाले.

सर्व शिष्यमंडळीहि आपापलें आन्हिक आटोपून जमविलेल्या इंधनाची एक शेकोटी पेटवून गुरूमहाराजांचें दिव्य व देवी सान्निध्यकारक भजन ऐकण्याकरतां मोठ्या भक्तिभावानें व विनयानें बसले व भजनास सुरूवात झाली. कांहीं वेळ भजन चाललें. इतक्यांत, गांवांतील सर्व लोकांना ज्याची भीति वाटत होती तोच वाघ भजनाचा आवाज ऐकून, एका पायाने लंगडत लंगडत महाराजांच्या जणूं दर्शनाकरतां व आपणांस झालेल्या पीडेच्या निवारणाकरतां, देवीमंदिराजवळ आला.

## ।। अध्याय सातवा ।।

महाराजांना पाहून अगदी आर्तस्वरांने आपली पीडा त्यानें व्यक्त केली व देवीद्वाराजवळ मस्तक ठेवून व्याकूळ अशा अवस्थेंत तो स्वस्थ बसला. वाघाचा आवाज व त्यांचे प्रत्यक्ष रूप पाहून सर्व शिष्यांनी तर गाळणच उडाली. सर्व थरथर कापूं लागले. त्या सर्वांना भिऊं नकां असें सांगून, 'तूं त्या जागेवरून हालू नको' असें वाघासही सांगितले. नंतर महाराजांनी आपलें भजन आटोपतें घेतले. नंदादीपांत तेलही कमी असल्यांने व व्याघ्राची व्याधी दिव्याच्या उजेडांतच पाहून घालविण्याची असल्यानें भजन आटोपतें घेणेच त्यांना भाग पडले.

महाराजांची आज्ञा ऐकून वाघही जागेवरून हालला नाही. शिष्यांना भिऊ नका, हा वाघ तुम्हांस कांही करणार नाही, असें पुन्हा सांगून, वाघाला त्यांनी जवळ बोलावले. त्याची आर्तता महाराजांकडून पाहविली गेली नाही.

वाघ जवळ येतांच त्याचा लंगडा पाय श्रींनी आपल्या हातांत घेतला. 'बाबा कशानें हें दुःख तुला झालें ?' असें म्हणून त्यांनी शिष्यांना दिवा जवळ आणण्यासाठी आज्ञा केली. भिऊ नका असें श्रींचे आश्वासन असतांही, व्याघ्राचें भयंकर रूप पाहून भीतभीतच, एक शिष्य दिवा घेऊन आला. महाराजांनी वाघाच्या पायाकडें न्याहाळून पाहिलें तों, एक जबरदस्त काटा त्याच्या पायांत बराच आंत घुसून गेला आहे व पाय सुजून, त्यांत पूही झाला आहे, असें श्रींना दिसले.

शिष्याकडून सुई मागवून घेऊन, हळूंच तो फोड सुईने त्यांनी फोडला. त्याबरोबर बरेच रक्त व पू पायांतून भळभळ बाहेर आले व याबरोबर तो भयंकर काटाही आला. श्रींनी तो काढून टाकला. आपल्या वस्त्राने त्याच्या पायांतील पू, रक्त वगैरे घाण, स्वच्छ पुसून, आणलेले बिब्बे भाजून त्यावर चांगले दोन चार चरके दिले.

आंतील व्याधी निघून गेल्यावर वाघास पूर्ण आराम होऊन तो स्वस्थ झाला. 'आता तूं आपल्या जागीं जा,' असें महाराजांनी सांगितलें असतांही, वाघ श्रीचरणांना सोडून कांही केल्या जाईना. त्याची आपल्या संगतींत काही वेळ राहण्याची इच्छा जाणून श्रींनी शिष्यांना 'तुम्ही स्वस्थ झोपा' अशी आज्ञा केली व 'हा वाघ गरीब आहे. तुम्हाला कांहीं करणार नाही' असे आश्र्वासनहि दिलें.

आतापर्यंतच्या अनुभवानें 'वाघापासून आतां आपणास काही पीडा होणार नाही' असा विश्र्वास निर्माण झाल्यानें सर्व शिष्यमंडळी आपापल्या जागी जाऊन निजली. महाराजही तेथेंच कृष्णाजिनावर पहुडले. महाराजांच्या चरणांजवळच कृतज्ञता दाखविण्याकरतां तो वाघही बऱ्याच दिवसांनी मिळालेल्या झोपेत मग्न झाला, त्याप्रमाणें बाळगलेले मांजर धन्याजवळ गाढ झोपते, त्याचप्रमाणे हा वाघ श्रींच्याजवळ मोठ्या आनंदाने झोपला.

ज्याच्या व्याधीच्या निवारणाकरतां लक्ष्मी व दत्तमहाराज यांनी श्रीनारायणस्वामींमहाराजांना आज्ञा केली, तो कांही सामान्य वाघ नसावा; पूर्व जन्मांत कोणी तरी चांगला अधिकारी साधक असून दैवदुर्विपाकानें प्रारब्ध भोगाकरतां या व्याघ्रयोनींत आला असावा. नाहींतर हा साधुसंगम वगैरे प्रकार लाभणें कठीणच आहे, यांत तिळमात्र शंका नाही. श्री टेंबेमहाराज श्रीचरणांनी 'व्याघ्रस्याधिमपाहरत्' एवढ्या वाक्यांत ही सर्व कथा संक्षेपाने सांगितली आहे.

स्वामीमहाराजांचे 'सर्वभूतसमत्व' या कथेंत प्रकट झालें आहे. रामेश्र्वर भटांना तुकाराममहाराजांनी उपदेशपर लिहून पाठविलेला अभंग नारायणस्वामींच्या या चरित्रास अगदी तंतोतंत जुळत आहे, तो असा.

चित्तशुध्द तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्पतया ।।१।।
विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।२।।
दुःख देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ।।३।।
आवडेल जीवा जीवाचिये परी । सकळां अंतरी एक भाव ।।४।।
तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजे तें येणे अनुभवें ।।५।।

"आरब्धेत्वमुना नृसिंह भजने सिंहोग्रतः प्राप्तवान्" असे महाराजांनी नायायणस्वामींच्या चरित्रांत लिहिलें आहे. भजनाचे वेळी सिंह पुढे येऊन बसलेली गोष्ट मागे आलेलीच आहे.

ब्राह्ममुहूर्तावर स्वामीमहाराज जागे झाले व तो वाघही जागा झाला. त्याच्या पाठीवर हात फिरवून, महाराज त्याला म्हणाले, की "बाबा तुझ्या येथे येण्यानें देवीच्या पूजेंत अडथळा होतो, तरी तूं दिवसा येथे यापुढे येऊ नकोस, रात्री कदाचित् आलास तर कोणालाही पीडा करूं नकोस.' यांप्रमाणे सांगून सत्संगतीने पवित्र झालेल्या वाघास स्वामीमहाराजांनी निरोप दिला. त्या वाघाचा पुढील जन्म अवश्य चांगल्या ठिकाणी होईल यांत कांही शंका नाही.

तेव्हांपासून त्या देवीमंदिराजवळ तो किंवा दुसरा कोणताही वाघ येत नाही व हे स्थान त्यायोगें निर्भय आहे, याची साक्ष अद्यापि तेथे येत आहे. सत्संगतीने क्रूर हिंस्त्र प्राणीसुध्दां शांत व निष्पाप होतात, मग मनुष्य शांत व कल्याणमार्गगामी होईल, यांत आश्र्चर्य काय ?

मैत्र्यादिगुणांनी ज्याच्यावर भगवान् प्रसन्न झाला त्याच्यापुढें सर्व प्राणी नम्र असतात. अनुभवापर्यंत ज्याची बुध्दि परमात्मतत्त्वावर आरूढ होते, त्याची दृष्टि ज्याच्यावर पडेल तोसुध्दां सर्व पातकांपासून मुक्त होतो, असें शास्त्रवचन आपल्या आचरणाचें खरें करून दाखविणारे स्वामीमहाराज खऱ्याखुऱ्या आचार्यपदाचे अधिकारी आहेत, शंका नही. असो.

श्रींनी शौचमुखमार्जन, स्नान, संध्यादि आह्निक, तेथे आटोपले व शिष्यागणासहित ते परत माध्यान्हकालास तारळे गांवांत आले. तेथें भिक्षा आटोपून सायंकालचे सुमारास कौलव ग्रामास येऊन रात्री नागेश भटजी गुळवणी यांच्या घरी वस्ती करून दुसरे दिवशी तेथें भिक्षा वगैरे आटोपून शिष्यांसहित कोल्हापुरास आले.

महालक्ष्मी व दत्तगुरू यांना वंदन करून दुर्गमान गडावर झालेली सर्व हकीकत त्यांच्या चरणाजवळ निवेदन करून महाराज मठात आले. महाराजांचा सर्व भूतात्मभाव मोठा अद्भूतच आहे. व्याघ्राची पीडा जाणून ती दूर होण्याकरतां कळवळ्याने नारायणस्वामींना आज्ञा देऊन, ज्याप्रमाणें वाघाला आनंदित व कल्याणभजन उभयदेवांनी केले, त्याप्रमाणें संसार महाव्याघ्रानें पीडीत असणाऱ्या व व्याघ्राप्रमाणें हिंसाप्रचुर असणाऱ्या आम्हावरही कृपा करून देवद्वयानें स्वामीमहाराजांना आज्ञा देऊन आमची पीडाहि दूर करावी अशी प्रार्थना देवदेवी यांच्या चरणी करून, नारायणस्वामी चरित्र सागरांतील सर्वभूतसमत्वरूप दिव्यरत्न येथें प्रकट केले आहे. तें घेऊन गुरूभक्त आनंदित होवोत, अशी प्रार्थना आहे.

यांप्रमाणें नारायणस्वामी चरित्रामृतांतील व्याघ्रव्याधिनिवारण व सर्वभूतसमत्व प्रकट करणारा हा सातवा अध्याय संपला.

ॐ **तत्सत्**

★★★

।। अध्याय सातवा ।।

।। श्री ।।

# अध्याय आठवा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । श्रीनारायण स्वामीमहाराज आपल्या भजन सेवेंने, महालक्ष्मी व दत्तगुरूंना संतुष्ट करीत, कोल्हापुरांत राहिले. 'कस्तुरी :ठेवितां जनतेसी । सुगंध केवी गौप्य होय ।' या न्यायानें स्वामीमहाराजांचा प्रभाव सर्वतोमुखी झाला. तो ऐकून करवीराधिपति श्रीमान् छत्रपति शिवाजीमहाराजांचे वंशज राजेसाहेब श्रींच्या दर्शनार्थ मोठ्या नम्र भावानें आले. श्रींची मूर्ति पाहून राजेसाहेबांना फारच आनंद झाला. प्रत्यक्ष 'नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजच यांच्यारूपानें आपच्या कोल्हापुरांत राहिले आहेत,' असें त्यांना वाटून 'मी व कोल्हापुरस्थ जनता अत्यंत धन्य आहोत. आमचे पूर्वपुण्यफलद्रूप झालें म्हणूनच श्रींचें येथे वास्तव्य झालें,' इत्यादि प्रेमोद्गार त्यांनी काढले. तदनंतर नित्यनेमाने देवीचे दर्शन, प्रदक्षिणा वगैरे करून झाल्यावर मठांत येऊन स्वामीमहाराजांचे दर्शन, कुशल प्रश्र्न वगैरे करून क्षणभर त्यांच्या संगतीचा लाभ घेऊन, राजेसाहेब आपल्या वाड्यांत जात असत.

याप्रमाणें काही काल गेल्यावर श्रींचे ठिकाणी त्यांची भक्ती अत्यंतच दृढ झाली. नित्याप्रमाणें एक दिवस श्रींचे दर्शन घेऊन राजेसाहेब जवळ बसले. नम्र भावानें हात जोडून, ते श्रींचे दर्शन म्हणाले, 'महाराज आपल्या चरणाजवळ एक प्रार्थना आहे. आज्ञा झाल्यास सांगतो !' स्वामीमहाराज म्हणाले, 'राजन् ! आपले म्हणणें निःशंकपणें आमच्या जवळ सांगा. परंतु तुम्ही प्रार्थना हा शब्द काढला त्याचें आश्र्चर्य वाटते. राजांची प्रार्थना सर्व लोकांनी करावी. राजांनी दुसऱ्याची व विशेषतः आमच्यासारख्या निःसंग संन्याशाची प्रार्थना ती का करावयाची ?' हें ऐकून राजा म्हणाला, "महाराज आम्ही नुसते राजे आहो. आपण महाराज, म्हणजे राजांचेही राजे आहांत. त्रिभुवनांचे ऐश्र्वर्य आपल्या पायापाशी लोळण घेत आहे. तरी सुध्दा आपण ढुंकूनही पहात नाही. गुरूचरणांजवळ याहून अधिक कांही मला बोलता येत नाही व समजतही नाही, ते असो. माझी इच्छा आपल्या चरणांची कांही सेवा करण्याची आहे. तरी ती स्वीकारण्याची कृपा व्हावी."

महाराज म्हणाले, "छत्रपते ! राजांनी प्रजेची सेवा,तिला देव मानून करावयाची असते. त्यांतच त्याचें कल्याण आहे असे शास्त्र सांगते. आम्ही त्यक्तैषण असल्यानें आम्हांस सेवेची कांहीं अपेक्षा नाही. "स्वयंदासास्तपस्विन" तपस्वी स्वतःचे दास असतात. त्यांना इतरांच्या सेवेची गरज नसते." राजेसाहेब म्हणाले, "महाराज ! संत निरपेक्ष असतात, परंतु आम्हां भक्तांच्या इच्छेनुरूप त्यांच्या कल्याणार्थ, संतांनी सेवा घेणे योग्यच आहे. असें माझ्या अल्पमतीला वाटते." स्वामी महाराज म्हणाले, 'राजन् ! आमची काय सेवा करण्याची तुझी इच्छा आहे ?' राजा म्हणाला, 'महाराज श्रींनी येथेंच मठांत रहावे व दोन गांवे श्रींच्या नांवे मी करून देणार आहे. त्याचा स्वीकार श्रींनी करावा अशी माझी इच्छा आहे.' हे ऐकून महाराज म्हणाले, 'राजन् ! सेवा तरी गुरूंना आनंद देण्याकरताच आहे ना ? मग तूं जर आमचा खरोखरच शिष्य म्हणवीत असशील तर आम्हाला आनंद देणारी सेवाच तूं करावीस, हेंच योग्य आहे कीं नाही ?'

राजा म्हणाला, 'अगदी योग्य आहे.' महाराज म्हणाले, 'तर उद्यापासून देवींचे दर्शन घेतल्याबरोबर परस्परच आपल्या वाड्यांत जावे. रोज दर्शनास येत जाऊं नये व दक्षतेनें प्रजापालन करीत जावे. हीच सेवा आम्हाला अत्यंत प्रिय आहे. उद्यापासूनच ती सुरूं करावी. आम्ही येथें रहावे असें तुला वाटत असल्यास, याप्रमाणे आमची सेवा करावी.

उपाधिकारक दुसरी कोणतीहि सेवा आम्हाला इष्ट नाही.' हें हृदयाला जाळून टाकणारें श्रींची वचन ऐकून राजा ( बाबासाहेब महाराज ) अत्यंत खिन्न झाला.

स्वामी महाराज म्हणाले, 'राजा, तूं खिन्न होऊं नकोस. गुरूंच्या मनाप्रमाणें वागणें त्याची सेवा आहे. ते काय सांगतील ते आनंदाने स्वीकारून करीत रहावे, त्यांतच आपले कल्याण आहे. आजपर्यंत सर्व सेवक या प्रमाणेंच वागून कल्याणभजन झाले आहेत.' वगैरे वाक्यांनी राजाचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां राजा म्हणाला. 'हे कृपानिधे, कृपा करून मला दर्शनाची परवानगी कसेही करून द्यावी.' असा पुन:पुनः राजानें आग्रह धरल्यामुळे, शेवटी राजाने मठांत न येतां, बाहेरून त्याला दर्शन व्हावें, म्हणून महाराजांनी त्याच्याकडून आपल्या आसनासमोर भिंतीत दगडी जाळी ( १।। फूट रूंद. ३ फूट उंच ) बसवून घेतली. राजेसाहेब तेथून दर्शन घेऊन जात.

हल्लीचें देवस्थान सुधारणा मंडळाने त्या ठिकाणचें स्थानच काढून टाकल्यामुळे, ती जाळीही मठासह भाविक लोकांना दुर्लभ झाली आहे.

अपरिग्रहानें व शांत अंतःकारणानें शोभणारे स्वामीमहाराज नित्यतृप्त अशा वृत्तीनें कोल्हापुरांत होते. जी वस्तु आपणास मिळणे शक्य नाही त्याबद्दल आपल्यास वैराग्य आहे असें म्हणणे सर्वांनाच शक्य आहे. वस्तु प्राप्त झाली असतां ती अन्तःकरणपूर्वक टाकणें हे ईश्र्वरसाक्षात्कारी भगवद्भक्तांनाच शक्य आहे. कारण, सर्व वस्तूंच्या लाभापासून होणाऱ्या आनंदाच्या शतपटीने आनंद त्यांना या ईशभक्तीत प्राप्त झालेला असतो.

मिष्टान्न भोजनानें तृप्त झालेला माणूस, ज्याप्रमाणें विष खाण्याची इच्छा करीत नाही, त्याप्रमाणें ईशभजनांने खऱ्या आनंदांत तृप्त झालेले भगवद्भक्त विषयानंदाकडे ढुंकूनसुध्दा पहात नाहीत. उलट त्याबद्दल त्यांच्या मनांत तिरस्कारच असतो. ग्रामीण कांता, म्हणजे खेडवळ स्त्री ज्याप्रमाणें नागरि पुरूषास भुलवूं शकत नाही त्याप्रमाणेच येथे समजावे. ब्रह्मानंदांत निरंतर मग्न अशा स्थितीत करवीर नगरांत महालक्ष्मींची भजनसेवा करीत राहिले. येथे नारायणस्वामी चरित्रामृतसागरांतील स्वामींची विरक्तवृत्ति नांवाचे रत्न उघड केले आहे. ते घेऊन गुरूभक्त संतुष्ट होवोत अशी प्रार्थना आहे. इति श्रीमन्नारायणस्वामीचरित्रामृतातील विरक्तप्रदर्शन नामक आठवा अध्याय संपूर्ण झाला.

ॐ **तत्सत्**

★★★

।। श्री ।।

# अध्याय नववा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । स्वामिमहाराज कोल्हापुरांस असतांना आणखी एक अद्‌भुत चरित्र झाले. ते ऐकण्याविषयी सद्‌भक्त श्रोत्यांनी सावधान व्हावे. कारण संतांच्या कथामृताचें प्राशन होणे परम दुर्मिळ आहे. भगवंताच्या किंवा भगवद्‌भक्तांच्या कथेविषयी आवड होणे ही चित्तशुध्दीची व कर्मकांडाच्या समाप्तीची एक खूणच आहे. भागवतांत तावत्कर्माणि कुर्वीत नो निर्विद्येतयावता । मत्कथाश्रवणादौ वा श्रध्दायावन्नजायते ।। असे स्पष्ट सांगितले आहे. कथामृतपान हें अगदी प्रथम भूमिकेपासून अखेरच्या भूमिकेपर्यंत सर्वांना हितकारक व उत्कर्षसंपादक आहे म्हणून आवश्कच आहे, असो.

एकदां नित्याचे भजन संपल्यावर महालक्ष्मी व दत्तगुरू स्वामीमहाराजांना म्हणाले की, पन्हाळगडावर एक मोठी दिव्य गुहा आहे. तेथे शक्तिपुत्र व वसिष्ठ महर्षीचे नातू पराशर मुनी एकान्तवास करून राहिले आहेत. यद्यपि “अश्वत्थामा बलिर्व्यासोहनुमांश्च बिभीषणः । कृपःपरशुरामश्च सप्तैतैचिरजीविनः ।।” याप्रमाणे मार्कंडेयसहित चिरंजीव असणाऱ्या या पाठांत पराशरांची गणना नाही, तथापि इतर न गणलेले योगी जसे चिरंजीव असून आपापल्या इष्ट ठिकाणी वास्तव्य करतात त्याप्रमाणे पराशरमुनीहीं त्या गुहेमध्ये वास्तव्य करीत आहेंत. उद्या त्यांचे दर्शन घेऊन परत यावे.

याप्रमाणे देवद्वयांचे वाक्य ऐकून ‘ॐ तथा’ असें म्हणून स्वामींनी दुसरे दिवशी पन्हाळगडावर जाण्याचे ठरविले. दुसरे दिवशी स्नानादि आन्हिक संक्षेपतः आटोपून कांही शिष्यांना बरोबर घेऊन स्वामी निघाले व कांही मार्ग चालून गेले.

इतक्यांत दिव्यदृष्टीनें, भगवदाज्ञेने, नारायणस्वामी आपल्या दर्शनाकरतां येत आहेत, हे जाणून व त्यांना इतके दूर येण्याचे श्रम देऊ नयेत असे मनांत आणून आपल्या योगबलाने पांढऱ्या शुभ्र धष्टपुष्ट अशा सुंदर बैलांचे रूप पराशर मुनिवर्यांनी धारण केले व अर्ध्या वाटेतच स्वामींना दर्शना देण्याकरतां ते मार्गातच आले.

‘योग्याच्या खुणा योग्यासच माहित या म्हणीप्रमाणे स्वामीमहाराजांनी दुरूनच त्या बैलाकडे पाहिल्याबरोबर ‘हे पराशरमुनी आहेत’ असे जाणून महाराजांनी मनानेच त्यांना वंदन केले व शिष्यांना ते म्हणाले, ‘अहो, हा जो बैल समोरून येत आहे याच्यासारखा बैल तुम्ही कधी पाहिला आहे काय ?’

शिष्य म्हणाले, ‘असा सुंदर व पुष्ट बैल आम्ही पूर्वी कधीच पाहिला नाही. बहुतेक कृष्णातटकांतील मळीत वास्तव्य करणारा हा बैल असावा. याच्याकडे पहात बसावे असेच वाटते. हा इकडे कोठून आला कोण जाणे ? कदाचित् कोणीतरी ग्राहकाने कृष्णातीराहून इकडे आणला असेल. परंतु इकडे तिकडच्याप्रमाणे याची निगा होणार नाही व मळीचीं वैरण वगैरे खुराकही त्याला इकडे मिळणार नाही. जिथली वस्तु तिथेच पाहिजे.’

इत्यादि भाषण शिष्यमंडळी करतात तोंच तो बैल मोठ्या जलदीने स्वामीमहाराजांच्या जवळ येऊन उभा राहिला. महाराजांनीही प्रेमाने त्याच्या अंगावरून हात फिरवून त्याचे पाय वगैरे दाबून मोठ्या भक्तीभावाने त्याला नमस्कार केला. हे पाहून शिष्यांनीही त्याला नमस्कार केला.

।। अध्याय नववा ।।

नंतर स्वामीमहाराज एकाग्र चित्ताने त्याचेकडे प्रेमाने पहात काही वेळ तटस्थ अवस्थेत राहिले. मनोमनी दोघांचे काय संभाषण झाले असेल ते दोघांसच माहित !

याप्रमाणे कांहीं वेळ गेल्यावर तो बैल जिकडून आला होता त्यामार्गाने गेला व पुढे दिसेनासा झाला. स्वामीमहाराजांनीही देवांच्या आज्ञेप्रमाणे मुनींच्या दर्शनास आपण आलों, त्याप्रमाणे त्यांचे दर्शन झाले व श्रीआज्ञेचें पालनही झालें, आता परत कोल्हापुरास जावें असा मनांत विचार करून ते परत फिरले.

शिष्यमंडळींना याबद्दल मोठें आश्र्चर्य वाटले. आपण कशाकरतां पन्हाळ्यास जातो हें अद्यापि स्वामींनी कोणास सांगितले नव्हते. फक्त पन्हाळ्यास जायचें आहे एवढेंच ते बोलले होते. अर्ध्या वाटेतूनच महाराज परत फिरलेले पाहून शिष्य म्हणाले, 'पन्हाळा तर अजून आला नाही, कशाकरता पन्हाळ्यास जायचे होते हेही कांही कळले नाही व अर्ध्या वाटेंतूनच कां फिरायचे याचेही कारण समजत नाही.'

यावर श्री म्हणाले, 'ज्याकरता पन्हाळ्यास जायचें होते ते काम येथेंच झाल्यानें आतां आम्ही परत जाण्याचें ठरविलें आहे.

शिष्य म्हणाले, 'या गूढ वाक्याचाही आम्हांस काहीं बोध होत नाही तरी श्रींनी स्पष्ट करून सांगितल्यास बरें होईल.'

महाराज म्हणाले, 'भगवदाज्ञेनें पन्हाळगडाच्या गुहेमध्ये असलेल्या पराशर मुनी महाराजांचे दर्शन घ्यावे म्हणून आम्ही निघालो. परंतु अत्यंत करूणाशाली मुनिवर्यांनी अधिक श्रम होऊ नयेत म्हणून वृषभरूप धारण करून अर्ध्या वाटेतच दर्शन दिले. आतां हा जो दिव्य रूपाचा बैल तुम्ही पाहिला व त्याला नमस्कार केला ते पराशर मुनीच होत. मग दर्शनादि कार्य झाल्यावर आतां पुढें कशास जावें ? म्हणून परत फिरलो आहो. मुनींच्या दर्शनस्पर्शनानीं आम्ही सर्वजणच धन्य झालो आहो. आता मोठ्या आनंदाने परत कोल्हापुरास जाऊं.'

याप्रमाणे शिष्यांचे समाधान करून शिष्यांसहित महाराज करवीरीं आले. जगदंबेला व दत्तगुरूंना वंदन करून झालेली सर्व हकीकत त्यांच्या चरणी निवेदन करून आपल्या नित्यकार्यास ते उद्युक्त झाले. ज्यांच्यावर भगवंताची व गुरूची कृपा होईल त्यांच्यावर मोठेमोठे योगीसुध्दां अनुग्रह करतात व त्याला आपणाहून भेटण्याकरतां येतात, म्हणून कल्याणेच्छु साधकानें भगवद्भक्ति व गुरूभक्ति करून आपलें कल्याण करून घ्यावें व आपल्या संगतीस असणाऱ्यांचेहि कल्याण करावें, असा बोध या कथेवरून सर्वांस घेता येण्यासारखा आहे.

याप्रमाणें नारायणस्वामी चरित्रामृतसागरांतील पराशर मुनिदर्शन नांवाचे रत्न येथें प्रकट केलें आहे, त्याचे धारण करून गुरूभक्त प्रमुदित होवोत.

येथें नारायणस्वामी चरित्रांतील पराशर योगिदर्शन नांवाचा नववा अध्याय समाप्त झाला.

ॐ **तत्सत्** ।

★★★

।। अध्याय नववा ।।

।। श्री ।।

# अध्याय दहावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । एकदा स्वामीमहाराज भगवती महालक्ष्मी व दत्तगुरू यांच्या आज्ञेवरून शिष्यगणासहित राजापूरच्या गंगेचे स्नान करण्याकरतां कोल्हापुराहून निघाले व मजल दरमजल करीत 'भुईबावडा' नावांच्या राजापूर वाटेवरील एका गांवांत आले.

इतक्यांत राजापूर गंगेचें स्नान करून परत आलेले यात्रेकरू त्यांना भेटले व म्हणाले, 'महाराज, आपण स्नानास गंगेला जात आहा, परंतु गंगा तर नुकतीच गुप्त झाली. आता गेल्यास गंगास्नान घडणार नाही, फुकट श्रम मात्र होतील.'

याप्रमाणें त्यांचे वचन ऐकून जवळची शिष्यमंडळी म्हणाली, 'महाराज, आतां इतूनच परत फिरावें हे बरे उगीच पुढें जाण्याचे कष्ट कशाला ? हे यात्रेकरू कांही खोटे सांगत नाहींत व गंगा पुनः किती कालाने येईल हेही सांगता येत नाही.'

याप्रमाणें शिष्यांचे वचन ऐकून महाराज म्हणाले, 'गंगास्नानाच्या उद्देशाने आम्ही देवांची आज्ञा घेऊन एवढे लांब आलो. आम्हाला दर्शनस्नानादि घडविण्याची गंगेची इच्छा नसेल म्हणून ती गुप्त झाली. तरी पण येथवर आल्यासारखें तिथें जाऊन तिचें स्थान पाहण्यास काय हरकत आहे. शेकडो कोसावरून 'गंगा गंगा' असें म्हणणारेसुध्दां सर्व पातकांपासून मुक्त होतील यांत शंका नाही. म्हणून परत फिरण्यापेक्षा स्थान पाहून, त्या स्थानाला वंदन करून, परत जाणें हेच योग्य आहे, असें म्हणून श्रीस्वामी राजापूरच्या रस्त्याला लागले.

शिष्यांनाही हा उपदेश पटून तेही त्यांच्याबरोबर निघाले. गुरूमहाराजांच्या इच्छेनुरूप वागण्यांतच आपलें कल्याण आहे असे सर्वांनी ठरविले. जातांना वाटेंत एक गांव माध्यान्हकाळी लागले. तिथें स्वामीमहाराजांची शिष्यासहित भिक्षा झाली. तेथून संध्याकाळचे सुमारास ते राजापूर गंगेच्या स्थानाजवळ आले. पाहतात तो गंगेची सर्व कुंडे कोरडी ठणठणीत आहेत व गंगा गुप्त झाल्याने एकही मनुष्य तेथें नाही. संध्यादि कर्मासाठी सुध्दां पाणी नाही मग स्नान करण्यास कोठून मिळणार ?

शिष्य मंडळींनी इकडे तिकडे फिरून संध्येपुरतें कसेंबसे थोडें पाणी आणले. त्यानें संध्यादिक आन्हिक करून, श्रींनी त्या एकान्तस्थळी मोठ्या आनंदाने भजन केले. त्यांत श्रीगंगेचेही भजन आलें असणारच. भजन झाल्यावर तिथेच गंगेच्या कुंडाजवळ वाटेच्या श्रमाने थकल्यामुळें ते गाढ झोपले, शिष्यमंडळींही सर्व झोपली.

स्वामीमहाराजांसारखा ईश्र्वर व गुरूभक्त, ब्रह्मनिष्ठ प्रेमळ महात्मा येथे येऊन स्नान केल्याशिवाय परत जातो हे गंगेला कसें आवडणार ? भक्तवत्सल गंगेनें अत्यंत सुंदर, सर्वालंकार विभूषित व दिव्य असें वृध्द सुवासिनीचें रूप धारण केलें व मध्यरात्रीच्या सुमारास श्रींच्या स्वप्नांत जाऊन त्यांना दर्शन दिले आणि स्वप्नांतच त्यांना हालवून जागें केल्यासारखें दाखवून म्हणाली, 'महाराज गुरूभक्त शिरोमणे, स्नानास उठा.'

स्वप्नांतच स्वामीमहाराज त्या वृध्द स्त्रीला म्हणाले, ‘अहो बाई, तुम्ही स्त्री जाती असून आम्हां संन्याशाच्या अंगाला स्पर्श केला हें कांही बरे नव्हे. तुम्हाला संन्यासधर्म प्रतिपादकशास्त्र माहित नाही काय ? संन्याशानें लाकडाच्या बाहुलीलासुध्दां सहज पायानेहि स्पर्श करूं नये असा निर्बंध आहे. तुम्ही तरी प्रत्यक्ष येऊन धडधडीत हातांने आम्हांला स्पर्श करतां, आतां काय म्हणावें ? तुमच्या आकारावरून तुम्हीं शास्त्रश्रवण केलेल्या स्त्रियांपैकी दिसता पण हें वर्तन मात्र शास्त्रानुरूप नाही.’

स्वामींचे हें वचन ऐकून वृध्दस्त्रीवेषधारी गंगा त्यांना म्हणाली, ‘महाराज ! देवीची व सद्‌गुरूंची आज्ञा घेऊन जिचें दर्शन, स्पर्शन व स्नान करण्याकरता इतके श्रम घेऊन तुम्ही येथे आला तीच मी राजापूरची गंगा. तुम्हांला स्नानाकरतां व दर्शन देण्याकरता आलें आहे. तुमचें भजन ऐकून मी प्रसन्न झाले आहे, संन्यासी मुलाला आईने स्पर्श करण्यास हरकत नाही. इतर स्त्रियांचा स्पर्शच त्यांना निषिध्द आहे. संन्याशांनी इतराला म्हणजे पूर्वाश्रमांतील वडील व वयोवृध्दांना वंदन करण्यास निषेध असला तरी मातेला वंदन करावें असें शास्त्र आहे तसेच हें समजावे.’

याप्रमाणें भाषण करून गंगादेवी गुप्त झाली. स्वामीमहाराज जागे झाले व त्या अद्‌भूत स्वप्नांचे त्यांना राहून राहून आश्र्चर्य वाटले. स्वप्निक गंगादर्शनानें आनंदही झाला व स्वप्नार्थाची प्रचिती पाहण्याकरता त्यांनी शिष्यमंडळींनाही जागृत केले.

शिष्य उठून जो पाहातात तो तेथील गंगेची चौदाही कुंडे गंगाप्रवाहानें भरून खळखळ वाहूं लागलेली सर्वांनी पाहिली. श्रींना व सर्व शिष्यांनाही त्यावेळी मोठा आनंद झाला.

प्रात:काळी गंगावंदन करून सर्वांनी गुरूमहाराजांसहित तेथे स्नान व आन्हिक वगैरे आटोपले. दुपारी श्रींची भिक्षा सर्व शिष्यांसहित तेथेच झाली. कांहीं वेळ विश्रांती घेऊन गंगेला वंदनस करून, महाराज गंगेचा निरोप घेऊन निघाले. तेथून एक कोसावर सायंकाळी त्यांनी मुक्काम केला. संध्यादिक आन्हिक करून आता भजनास बसणार इतक्यांत ‘राजापूरची गंगा गेली’ अशी वार्ता त्यांना कळली. सर्वांना त्या गोष्टीची आश्र्चर्य वाटले व ‘केवळ भगवत्कृपेनेच गंगेने आमचे मनोरथ पूर्ण केले’ असें सर्वजण म्हणूं लागले.

गुरूभक्तांनीहि आपल्या आरतींत “आज्ञा घेऊनि सहज तीर्थाटन करिती । मार्गी उदक नसता गंगा आली ख्याती । स्नान करूनी निघता गुप्त भागीरथी ।।” असें जे म्हटले आहे ते याच प्रसंगाचे द्योतक असावे. असो.

भजन वगैरे मोठ्या आनंदाने होऊन श्रींनी रात्रभर तेथेच मुक्काम केला. दुसरे दिवशी प्रात:काळी स्नानादि आन्हिके आटोपून श्री कोल्हापुरास परत आले, श्रीमहालक्ष्मी व सद्‌गुरू दत्तमहाराज यांना वंदन करून घडलेली सर्व हकीकत त्यांनी निवेदन केली व मठांत आले.

याप्रमाणें कोल्हापुरांत भजनानंद व भक्तीचा सुकाळ करून ‘आतां येथील कार्य झाले, जगदंबेची आज्ञा घेऊन श्रीगुरूचरणाजवळ जावें,’ असे श्रींनी ठरविलें व महालक्ष्मीमातेस वंदन करून आपला अभिप्राय त्यांचे चरणी निवेदन केला.

जगदंबेनेही मोठ्या संतोषानें मस्तकावर वरदहस्त ठेवून नृसिंहवाडीस जाण्यास त्यांना आज्ञा दिली; ती शिरसामान्य करून स्वामीमहाराज पुन: श्रीनरसोबाचेवाडीस श्रीचरण-सान्निध्याचा लाभ घेण्याकरतां आले व आपल्या कुटींत राहूं लागले.

## ।। अध्याय दहावा ।।

याप्रमाणे नारायणस्वामीमहाराजांच्या चरित्रामृत सागरांतील राजापुरस्थ गंगादर्शनस्नाननामक रत्न येथें प्रकट केलें आहे. त्याचा स्वीकार करून गुरूभक्त संतुष्ट होवोत अशी प्रार्थना आहे.

येथें राजापूर गंगादर्शन नामक दहावा अध्याय संपूर्ण झाला.

ॐ **तत्सत् ।**

★★★

।। श्री ।।

# अध्याय अकरावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । कोल्हापुराहून परत येऊन नृसिंहवाडीत आपल्या मठांत स्वामीमहाराज सदा अन्तर्मुखवृत्तीनें श्रीगुरूध्यानतत्पर व तदानन्दनिमग्न अशा अवस्थेंत राहूं लागले. बहुतेक त्यांच्या मठाचें दार बंदच असे. बाहेरून लोकांनी वंदन केलें म्हणजे अंतर्ज्ञानानें जाणून 'नारायण' असा आशीर्वाद ते देत असत.

तो शब्द ऐकून लोक सानंदाश्र्चर्याने थक्क होऊन त्यांच्या अद्‌भूत महिम्याचें परस्परांत वर्णन करीत असत व 'आमच्या परमभाग्यानें महाराजांचें येथें वास्तव्य झालें' असे मानीत. लोकांकडून होणारा सन्मान व प्रतिष्ठा हे तपक्षय करणारे व अधोगतीला पोचविणारे आहेत म्हणून ते मलाप्रमाणें अशुध्द व त्याज्य आहेत असा स्वामीमहाराजांचा निश्र्चय झाला होता. सद्‌गुरूंची खरी कृपा झाली म्हणजे अशीच वृत्ति होते. मानप्रतिष्ठेचा त्यांना मनापासूनच तिटकारा व दुर्गंध येऊ लागतो. स्वामीमहाराजांच्या बाबतीत असेंच झालें होते.

त्यांचा हा निश्र्चय कितपत दृढ आहे हें पहावें असी सद्‌गुरू महाराजांना इच्छा झाली व त्यांनी त्यासाठी एक प्रसंग घडवून आणला तो असा -

त्यावेळी परगांवचा एक दशग्रंथी वैदिक ब्राह्मण आपल्या पूर्वार्जित पातकानें गलत्कुष्ट असा महारोगी होऊन सर्व उपाय करून थकल्यावर नरसोबाच्या वाडीत 'दत्तमहाराजांच्या कृपेनें यांतून बरे झाल्यास ठीकच आहे, नाहीतर तेथेच आपला अंतकाळ व्हावा' या इच्छेनें सर्वपरित्याग करून वाडीस आला व वनांतच एका झाडाखाली एक झोपडी बाधून, श्रींची इतर सेवा कांहीं करता येण्यासारखी नसल्यानें, भगवच्चिंतननामस्मरण वगैरे करीत राहिला.

अनन्यभावानें सद्‌गुरूंना शरण गेल्यावर ते त्याची उपेक्षा कधीच करीत नाहीत. त्या ब्राह्मणाची एकनिष्ठ सेवा पाहून स्वामींच्या अमानित्वादिकांचा दृढनिश्र्चय ओळखण्यास ही संधि बरी आहे असें जाणून..........

एके वेळी पहाटेच्या सुमारास श्रीदत्तमहाराज त्या ब्राह्मणाच्या स्वप्नांत आले व त्याला म्हणाले, 'अरे विप्रा, श्रीनारायणस्वामीमहाराज रोज पहाटे कृष्णपंचगंगा स्नानास जातात. ते तेथें प्रवाहांत स्नान करूं लागले म्हणजे त्यांच्या पाठीमागच्या बाजूस तूं स्नान कर. जेणेंकरून त्यांच्या अंगावरचे तीर्थ तुझ्या अंगावर येईल व त्यायोगें तूं तात्काळ या महारोगापासून मुक्त होशील,' याप्रमाणे सांगून दत्तमहाराज अदृश्य झाले.

ब्राह्मणही स्वप्नांतून जागा झाला. त्या स्वप्नांची वारंवार आठवण करून व ती स्वप्नांत पाहिलेली दत्तमहाराजांची संन्यासवेषधारी मूर्ति आठवून महाराजांचा आपल्यावर अनुग्रह झाला असें मानून त्याला परमानंद झाला. सकाळी उठल्यावर नारायणस्वामीमहाराज कोणते वगैरे सर्व चौकशी त्यानें तेथील लोकांजवळ केली

लोक त्याला म्हणाले, 'अहो नारायणस्वामीमहाराज म्हणजे एक ब्रह्मनिष्ठ, षट्शास्त्रनिष्णात भगवंताला अत्यंत प्रिय असे महासिध्द पुरूष आहेत. ते बहुधा एकांतात असल्यानें तुम्ही कदाचित् पाहिले नसतील. तरीपण पहाटे सर्वांच्या आधी जे संगमावर स्नानास जातात तेच नारायणस्वामी असें तुम्ही समजा. कारण इतक्या लवकर दुसरे कोणीच संगमस्नानाला जाणारे येथें नाहीत.'

याप्रमाणें त्यांचे वर्णन ऐकून तो ब्राह्मण आपली झोपडी सोडून रात्रीच संगमाच्या वाटेवर, वाटेहून जरा दूर, असा बसला. अत्यंत आर्त झाला असल्यामुळें त्याला झोप तरी कोठून येणार ? 'केव्हा स्वामींचे दर्शन होईल व त्यांच्या पाठीमागे केव्हा मी स्नान करून रोगमुक्त होईन' असें त्याला होऊन गेले होते. इकडे स्वामीमहाराज नित्यनियमाप्रमाणे अगदी पहाटेच उठून, भगवद्चिंतन, प्रातःस्मरण, शौचमुखमार्जनादि कार्य आटोपून, मुखानें हळूहळू भगवद्भजन करीत संगमावरती स्नानाला निघाले. ते पाहून तो ब्राह्मणहि 'हेच नारायणयती' असें जाणून थोड्या अंतरावरूनच त्यांच्या पाठीमागे हळूहळू संगमावर आला व स्वामींच्यापासून थोड्या अंतरावर त्यांच्या अंगावरचे पाणी आपल्या अंगावर येईल अशा बेतानें उभा राहिला. 'आमच्या स्नानाच्यावेळी कोणीच असत नाही व हा आजच कोण मनुष्य स्नानाच्यावेळी येथें उपस्थित झाला ? हें काय असावें बरें ?' असा विचार महाराजांनी केला व चित्त किंचित एकाग्र करून पाहिले तो सद्गुरू महाराजांनी ही क्लुप्ति व लीला आहे असें त्यांच्या ध्यानांत आले. ते त्या ब्राह्मणाला म्हणाले,'अरे, तूं यावेळी इथे प्रवाहांत का उभा राहिला आहेस ?' ब्राह्मण म्हणाला, 'महाराज ! मी स्नानाकरता येथे उभा आहे.' 'तर मग लवकर स्नान कर,' असे म्हणून महाराज प्रवाहांतून वर आले. त्याबरोबर तो ब्राह्मण म्हणाला, 'महाराज, आपल्याबरोबर आपल्या पश्चाद्भागीं स्नान करण्याचा माझा मानस आहे. तरी श्रींनी तो पूर्ण करावा.' महाराज म्हणाले, 'माझ्या पाठीमागे राहून स्नान कशाकरतां ?' तो म्हणाला, 'महाराज, दत्तमहाराजांनी स्वप्नांत येऊन माझ्या व्याधींचा प्रशमनाकरतां हा उपाय मला सांगितला आहे.' महाराज म्हणाले 'तर मग माझ्याबरोबर तूं चल व मी सांगतो तसें कर म्हणजे तुझी व्याधी दूर होईल.' कोणत्या कां उपायानें होईना माझी व्याधी दूर झाली म्हणजे झाले,' असें मानणारा ब्राह्मण महाराजांबरोबर जाण्यास तयार झाला. त्यानंतर स्वामीमहाराज त्याला बरोबर घेऊन दत्तमहाराजांच्या पदकमलासमोर कृष्णेच्या घाटावर उभे राहिले व ब्राह्मणास म्हणाले, 'अरे विप्रा, येथें स्नान कर व तुझी वस्त्रे दूर प्रवाहांत फेकून देऊन ही दुसरी वस्त्रे धारण कर.' ब्राह्मणानें श्रींच्या आज्ञेप्रमाणे स्नान केले. पूर्वीची वस्त्रे प्रवाहांत टाकून दिली व दुसरी वस्त्रे नेसून तो श्रीसन्निध आला. महाराज म्हणाले, 'तुझी व्याधी गेली की नाही तें नीट पहा. हें ऐकून ब्राह्मण अंगाकडे पहातो तो सर्वांग अगदी उत्तम झालें असें त्याला दिसले, 'काय महाराजांचे हे सामर्थ्य ? काय युक्ती केली महाराजांनी त्यांचे त्यांनाच माहीत ! एका क्षणांत मी सर्व पीडारहित व स्वस्थ झालों. ही सर्व स्वामीमहाराजांचीच कृपा होय.' असें म्हणून अनन्यभावानें व सद्गदित अंतःकरणानें त्याने, श्रीमहाराजांना साष्टांग नामस्कार केला.

महाराज म्हणाले, 'ब्राह्मणा, आतां सूर्योदय होण्याचे पूर्वीच तूं वाडीतून एक अक्षरही कोणाशाही न बोलता बाहेर निघून जा. नाहीतर पुनः तुझें शरीर पूर्ववत् होईल.'

हें ऐकून व महाराजांचे सामर्थ्य जाणून तो तात्काळ नरसोबाच्या वाडीतून बाहेर पडला व आपले गांवी गेला.

तो गेला असे पाहून स्वामीमहाराज स्नान न करताच दण्डास परशुमुद्रा बांधून 'येथून आतां बाहेर जावें' असे मनांत आणून श्रीगुरूमहाराजांचा निरोप घेण्याकरतां मंडपात आले व वंदन करूं लागले. मंदिरद्वार बंदच होते.

परंतु स्वामींचे वंदन जाणून सर्वज्ञ प्रभू म्हणाले, ‘अहो स्वामी दण्डास परशुमुद्रा बांधून, हे वंदन भलत्याच वेळेस दिसते. कोठें परगांवी प्रयाणाची ही तयारी दिसते ?’

हें ऐकून नारायणस्वामी म्हणाले, ‘मी येथे राहू नये अशी श्रीचरणांची इच्छा दिसते. म्हणून आतां कुठेतरी देशोधडीस लागावें असे वाटू लागले आहे. आतां हे शेवटचेच वंदन करण्याकरतां येथें आलों आहे.’

श्री म्हणाले, ‘तुम्हांस झालें तरी काय ? इतका उद्वेग कशामुळें झाला ?’

स्वामी म्हणाले, ‘मला काहीं सांगायचे नाही व वादही करायचा नाही. वाद घालणें हें पूर्वाश्रमांत काशीतच गंगेचें उदक घेऊन गुरूंच्या सन्निध टाकून दिले आहे.’ असे बोलून जाण्याच्या निश्र्चयानें नारायणस्वामींनी वंदन करण्यास आरंभ केला.

हे रागावले असे जाणून दयाघन भक्तवत्सल प्रभू श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज दार उघडून प्रत्यक्ष बाहेर आले व आपल्या हातानें स्वामींचा दंड आपल्याजवळ घेऊन आई रागावलेल्या मुलाची समजूत घालते त्याप्रमाणे सर्व जगज्जननी नृसिंहसरस्वतीमातेनें नारायणस्वामींना अलिंगन देऊन त्यांची समजूत काढली व म्हणाले, ‘आम्ही उगीच हें तुमच्याशी कौतुक केले. त्याबद्दल इतके रागावण्याचे काहीं कारण नाही. तुमच्यासारखे प्रेमळ भक्त येथून गेल्यावर आम्हांस चैन कसे पडेल ? आमचे हे शरीरसुध्दां तुमच्याहून आम्हाला प्रिय नाही.’

याप्रमाणे माऊलींचे वचन ऐकून, नारायणस्वामी म्हणाले, ‘महाराज, कोणतीहि सांसारिक उपाधी होऊं नये, म्हणून संन्यास घेऊन आपल्या चरणाजवळ मी स्वस्थ राहिलो. असे असतां आपल्या अनुज्ञेनेच ही सन्मान प्रतिष्ठादि घातक पीडा जर होऊं लागली, तर असले येथील तापदायक वास्तव्य कशास हवे ? त्यापेक्षा कुठेतरी निर्जन गिरिकंदरांत निरूपाधिक होऊन राहणेच बरे.’

हे ऐकून सद्गुरूमहाराज म्हणाले, ‘मग या उपाधी सहन कोणी करायच्या ? तुम्ही यांत भागीदार नको का व्हायला ?’

स्वामी म्हणाले, ‘भक्तरक्षण करणें हेच ज्यांचे ब्रीद आहे, त्या समर्थचरणांनीच या उपाधी सहन केल्या पाहिजेत. माझ्यासारख्या गबाळांचे हें काम नव्हे. त्रिविध ताप तप्त जीवांचे दुःख पाहून कळवळ्याने श्रींनी अवतार धारण केला व अधर्म आणि दुष्टांचा नाश करून सध्दर्म आणि साधू यांचे पालन करणे, भक्तांचे नानाप्रकारचे आघात दूर करून त्यांचे कल्याण करणें हें सर्व श्रीचरणांचेच ब्रीद आहे, ते त्यांनीच करावे. माझ्यासारखे मंद प्रज्ञदुर्मळ ते करूं गेल्यास त्यांतच अडकून अधोगतीला पोचतील. म्हणूनच श्रीचरणांच्या सन्निध श्रीचरणरजानें पवित्र झालेल्या प्रवाहांत त्या ब्राह्मणाला स्नान घालून निरोगी व शुध्द करून त्याला येथून हाकून लावले आहे.

सद्गुरू म्हणाले, ‘तुमची तशी इच्छा नसेल तर, आतां इतःपर कांहीं तुम्हांला अशी पीडा होणार नाही. आतां वेळ झाली; तरी तुम्ही स्नानास जा,’ अशी आज्ञा देऊन महाराज अन्तर्धान पावले.

नारायणस्वामींना तर भक्तवत्सल प्रभूचे प्रेम व कृपा पाहून फारच आनंद झाला. त्यांच्या डोळ्यांवाटे प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या, भक्तांचे सर्व कोड पुरविणारी अशी गुरूमाउली जगांत दुसरीकडे कोठेही मिळायची नाही. धन्य भाग्य असे मनांत म्हणून परमप्रेमानें वंदन करून, लोक स्नानाला येण्याच्या आधीच स्वामीमहाराज संगमावर स्नानास गेले.

## ।। अध्याय अकरावा ।।

धन्य आहे त्या भक्तवत्सल गुरूमाउलीची व त्यांच्या अनन्य प्रेमळ भक्तांची ! ईश्र्वराची एकान्तिक भक्ति करणारे म्हणूनच अत्यंत निःस्पृह असणारे, पुरूषधौरेय महात्मे केवळ ईशभक्तीशिवाय प्रतिष्ठा वगैरे तुच्छ विषयाकडे ढुंकूनसुध्दा पहात नाहीत.

‘प्रतिष्ठाहि विष्ठासमागचि तुच्छा’ असे येथे महाराजांनी आपल्या एका स्तोत्रांत म्हटले आहे. ते किती सार्थ आहे हे नारायणस्वामींच्या या चरित्रावरून सहज लक्षांत येईल. विष्ठेइतपत प्रतिष्ठेला तुच्छ मानणाऱ्या महात्म्यांची धन्य आहे. आपल्या अंगावरून गेलेल्या पाण्यानें कुष्टी ब्राह्मणाचे गलत्कुष्ट गेले, अशी ख्याति त्यांना नको होती. म्हणूनच श्रीचरणांजवळ स्नान घालून श्रीचरणतीर्थाचे सामर्थ्य त्यांनी प्रकट केले. ज्यांना परमदुर्लभ मुक्तीचीसुध्दां अपेक्षा नाही त्यांना क्षुद्र अशी प्रतिष्ठा कोठून आवडणार ? असो. धन्य आहे त्या नारायणस्वामीमहाराजांची की, ज्यांच्या भजनानें लुब्ध झालेले गुरूमहाराज एखाद्या कर्तबगार मुलाच्या प्रेमानें लुब्ध झालेल्या वयोवृध्द म्हाताऱ्याप्रमाणें त्यांच्या आधीन झाले व त्यांच्याशिवाय त्यांना चैन पडेनासे झाले.

‘दयाघन भक्ती आकळिला’ म्हणतात ते हेंच. अशांच्या हातून जे चमत्कार घडतात ते सर्व भगवंताचेच आहेत अशी यांची त्रिसत्य खात्री असते व या अद्‌भुततेचा बोजा ते आपल्या शिरावर कधींहि घेत नाहीत. ‘कर्ता करविता ईश्र्वर आहे,’ अशी त्यांची पक्की समजूत असते, नुसती भाषा नव्हे. असो याप्रमाणे श्रीमन्नारायणस्वामी चरित्रामृत सागरांतील ब्राह्मणमहारोगहरण नांवाचे रत्न येथे प्रगट केलें आहे, ते घेऊन गुरूभक्त आनंदित होवोत.

येथे द्विज गलत्कुष्ट परिहार नांवाचा अकरावा अध्याय संपूर्ण झाला.

ॐ **तत्सत्**

★★★

।। श्री ।।

# अध्याय बारावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । स्वामीमहाराज जो जो प्रतिष्ठा न होण्याविषयी जपत असत, तो तो सद्‌गुरूमहाराज, भक्ति, कीर्ति विवर्धन हें बिरूद धारण करणारे असल्याने त्यांची प्रतिष्ठा वाढेल, अशाबद्दल प्रयत्न करीत असत. कोणत्या सद्‌गुरूंना आपल्या एकानिष्ठ भक्ताची प्रतिष्ठा वाढूं नये असें वाटेल बरें ? मुलाचें ऐश्र्वर्य आईबापांनी पहायचे नाही, तर तें कोणी पहायचें ? नारायणस्वामीमहाराजांच्या मातपितृस्थानी असणाऱ्या सद्‌गुरूमहाराजांनी एक कौतुक केले.

बेळगांव शहराच्या जवळच वनश्रीनें नटलेला एक डोंगर आहे. आंबे, फणस वगैरे अनेक प्रकारची झाडे, थंड व गोड पाण्याचे अनेक झरे, नानाप्रकारच्या वनस्पती, लता इत्यादिकांनी निरंतर शोभायमान, अशा या डोंगरावर 'वैद्यनाथ' नावांचे एक स्वयंभू शंकरलिंग आहे.

ज्याच्या दर्शनानेंच भक्तांचें पापताप लयाला जाऊन त्याला समाधिअभ्यासाची इच्छा व्हावी, असें परमपवित्र रमणीय व एकान्त असे हे शंकराचे स्थान आहे. त्याठिकाणी प्रपंचापासून विरक्त झालेला, शास्त्ररहस्य जाणून शान्त, दान्त, सुशील व एकान्तप्रिय असा कोणी एक ब्राह्मण वैद्यनाथाची सेवा करून आपल्या आयुष्याच्या शिल्लक राहिलेल्या दिवसांचे सार्थक करीत त्याठिकाणी राहिला होता.

शंकरलिंगाची सेवा घडावी व तेथून कुठेही दुसरीकडे जाऊ नये अशा त्या ब्राह्मणाची धारणा होती.

अपमृत्यु वगैरे न येता, ईश्र्वरसेवा करीत, संपूर्ण आयुष्य आनंदांत जाणें हें एक मोठ्या भाग्याचेच काम आहे.

त्या ब्राह्मणाचें सर्व प्रारब्ध जरी चांगले असलें, तरी एक प्रारब्धाचा भाग असा होता की, त्याला सर्पदंश होऊन अपमृत्यु व्हावा. त्या ब्राह्मणाला या दैवगतीची काहीं कल्पना नव्हती.

भगवत्कृपेनें किंवा संतांच्या अनुग्रहानें अपमृत्यु किंवा महामृत्यु सुध्दां टाळतां येतो, असें असल्यानें सर्वज्ञ दत्तमहाराजांनी त्यांच्या सेवेवर प्रसन्न होऊन, त्याचा अपमृत्यु, नारायणस्वामींच्या हातून टाळण्याचा विचार केला.

भजनानन्दनिमग्न असणारा शिवभक्त ब्राह्मण साप चावून मेला, हा अपवाद घालविण्यासाठी व आपल्या भक्ताची कीर्ति वाढविण्यासाठी एक दिवस नारायणस्वामींना वैद्यनाथमहादेवांचें दर्शन घेऊन यावे, ते स्थान परमपवित्र, रम्य व एकान्त असें आहे असे दत्तप्रभूंनी सांगितले.

गुरूमहाराजांची आज्ञा म्हणजे वेदाज्ञेपेक्षाही श्रेष्ठ आहे असे समजून गुरूमहाराजांना वंदन करून, मजल दर मजल पायी प्रवास करीत श्रीस्वामीमहाराज वैद्यनाथलिंगाजवळ आले.

तें रम्य व एकान्तस्थान पाहून त्यांना मोठा आनंद झाला. शंकरलिंगाला दण्डवन्दन करून व तेथील झऱ्यावर स्नान वगैरे करून सर्व प्रवासाचा थकवा गेल्याने, स्वामीमहाराज प्रसन्नचित्त झाले व तेथेच एका रम्य जागी आन्हिकासाठी त्यांनी आसन मांडले.

आतां आसनारूढ होऊन आन्हिक आरंभ करणार तोच तो शिवोपासक ब्राह्मण धावत व ओरडत आपल्याकडे येत आहे व त्याच्या पाठीमागे दंश करण्याकरतां एक अत्यंत भयंकर विषारी कृष्ण सर्प लागला आहे असे स्वामींना दिसले.

इतक्यांत तो ब्राह्मण 'महाराज मला वांचा, मला वांचवा, असे म्हणत आला. तो भीतिग्रस्त झाला असल्यानें आणि पळण्याच्या श्रमानें थकल्यामुळें महाराजांच्या पुढें जमिनीवर धाडकन् पडला. तोंच त्या काळसापाने येऊन त्याच्या उजव्या पायाला जोरानें चावा घेतला नि अतित्वरेनें तो तेथून गेला. लगेच ब्राह्मणाला विषाच्या लहरी येऊन तो तेथल्या तेथे गतप्राण झाला.

अकस्मात् झालेली अद्‌भूत घटना पाहून, सद्‌गुरूंनी वाडीत वैद्यनाथाच्या दर्शनास जाण्याविषयी जी आज्ञा केली, त्यांचे रहस्य स्वामींच्या लक्षांत आले व महाराजांच्या युक्तीचें हासूं आले. जवळपास आपणाकडे कोणी पहात नाही, याबद्दल खात्री करून घेऊन गुरूचरणांचे स्मरण करून व आस्तिक मंत्राचा उच्चार करून त्या शैव ब्राह्मणाला स्वामींनी जिवंत केले. मेलेला ब्राह्मण तात्काळ झोपेंतून उठल्याप्रमाणें उठून बसला.

'स्वामीमहाराजांनीच आपणास वाचविले' असें जाणून, तो त्यांना साष्टांग नमस्कार घालून, महाराजांची स्तुती करूं लागला.

श्रींनी त्यानंतर त्याचे सांत्वन करून आपले आन्हिक संपविले व त्या ब्राह्मणाकडून भिक्षा घेऊन, ते पुनः परत वाडीस जाण्यास निघाले.

तो ब्राह्मणहि श्रींच्याबरोबर वाडीस येण्याकरता अत्यंत गयावया करूं लागला. त्याची केविलवाणी अवस्था पाहून श्रींचे हृदय द्रवलें व त्या ब्राह्मणाला आपल्याबरोबर घेऊन ते निघाले. परत येत असतांना, दुसरे दिवशी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास वाटेंत एक नदी लागली. तेथे आन्हिक वगैरे आटोपावें, असें मनांत आणून जवळच असलेल्या एका देवळांत त्यांनी मुक्काम ठेवला.

इतक्यांत त्या नदीजवळच असलेल्या कालकुंद्री नांवाच्या गावातून बैलावर माकण घालून पाणी नेण्याकरता एक ब्राह्मण आला. तोंच मंदिरात बसलेली महाराजांची भव्य व दिव्य मूर्ति त्याच्या दृष्टीस पडली. त्याचे परम भाग्यच उदयाला आलें असल्यानें मंदिरात जाऊन श्रीचरणांना भक्तीभावानें त्यानें साष्टांग नमस्कार केला व हात जोडून नम्रभावानें त्यांचेजवळ तो उभा राहिला.

महाराजांनी 'नारायण' म्हणून त्याला आशीर्वाद दिला व 'कोण, काय करतोस, कुठे राहतोस ?' वगैरे त्याची चौकशी केली.

तो म्हणाला, 'महाराज, मी एक दरिद्री ब्राह्मण आहे. काहीं विद्यावगैरे नसल्यानें व माझे आईबाप-आप्त वगैरे कोणी नसल्यानें, येथे एका सावकाराच्या घरांत पाणी घालून, उदरनिर्वाह करीत आहे,' असें म्हणून व या गरिबावर आपली कृपा असावी, अशी प्रार्थना करून, माकणी घेतली. तें पाहून महाराज म्हणाले, 'अरे ब्राह्मणा, तुझ्या मालकाच्या घरांत शक्य असल्यास या ब्राह्मणाची भोजनाची व्यवस्था कर. हा क्षुधित आहे.'

हें ऐकून, 'बरे आहे,' असें म्हणून तो जलवाहक ब्राह्मण त्या शैव ब्राह्मणाला घेऊन जाण्यास तयार झाला.

परंतु त्या शैवास गुरूमहाराजांना सोडून कसें जाववेल ? तो शैवब्राह्मण म्हणाला, 'महाराज, आपल्या भिक्षेची व्यवस्था काय ?' तें ऐकून महाराज म्हणाले, 'त्याबद्दल चौकशी करूं नकोस. तूं जाऊन भोजन करून ये.'

तोंच गुरूमहाराजांनी पुनः जाण्यास त्याला आज्ञा केली, निरूपायानें ब्राह्मण त्या जलवाहकाबरोबर त्याच्या मालकाच्या घरी गेला.

तोपर्यंत स्वामीमहाराजांनी स्नान वगैरे केले व आन्हिक करण्याकरतां देवळाजवळच एका झाडाखाली त्यांनी आसन मांडले.

जलवाहकांनें त्या शैवास आपल्या मालकाच्या घरी बसविले. माकण काढून बैलास गोठ्यांत बांधले. 'मला थोंडे काहीं काम आहे. मी आतां येतो' असें म्हणून मालकाची परवानगी घेतली व त्याला काय वाटले कोण जाणे ! तो पुनः नदीतीरावर महाराजांचेजवळ आला.

श्रींनी तो पुन्हा आला असें पाहून, त्याला विचारले, 'अरे त्या ब्राह्मणाची व्यवस्था झाली ना ? तूं पुनः इकडे कशाला आलास ? जलवाहक म्हणाल, 'आपल्या भिक्षेची व्यवस्था काय हें विचारण्याकरतां मी आलो आहे.'

महाराज म्हणाले, 'तुला ना घर ना दार. दुसऱ्याच्या घरांत काम करून तूं निर्वाह करतोंस, तर तूं माझ्या भिक्षेची चौकशी करून काय करणार ?'

तो जलवाहक म्हणाला, 'महाराज ! माझ्या मालकाच्या घरांत त्या ब्राह्मणाप्रमाणें मी आपलीहि व्यवस्था करीन. तरी कृपा करून आपण माझ्याबरोबर चलावें. माझ्या मालकाच्या घरी आपल्या भिक्षेची व्यवस्था मी करतो. दुर्दैवाने मला घरदार नसल्यानें माझ्या घरी आपली व्यवस्था होण्यासारखी नसली तरी माझ्या मालकाच्या घरी आपल्या भिक्षेची व्यवस्था होण्यास काहीं हरकत नाही. मालक काहीं म्हणणार नाही.'

स्वामीमहाराजांचे हें वचन ऐकून व आपल्या दुर्दैवानें अशा दिव्य सत्पुरूषास आपणास भिक्षा देता येत नाही असा विचार मनांत येऊन, ब्राह्मणाच्या डोळ्याला पाणी आले.

जलवाहकाने हात जोडले व नम्रभावानें तो महाराजांना म्हणाला, 'हे दयासिंधो महाराजा, आपली भिक्षा झाल्याशिवाय, माझ्या मनाला काहीं बरे वाटत नाही. येथून आपण उपवासी जावें हें मला कसेसेंच वाटते. तरी याबाबत काही दुसरी तोड असल्यास कृपा करून महाराजांनी सांगावी.'

महाराज म्हणाले, 'दुसरा उपाय आहे. तुझ्या स्वतःच्या पैशांतून शिधासामग्री आणून, शुचिर्भूत होऊन, या देवळांत तूं स्वयंपाक कर व त्या माझ्याबरोबरच्या ब्राह्मणाला येथें पाठव. म्हणजे त्याच्यासह तुझ्या घरांत आम्ही भिक्षा करूं.

याप्रमाणें दयाघन स्वामीमहाराजांचें वचन ऐकून त्या ब्राह्मणाचा आनंद गगनांत मावेना. 'मी आज धन्य झालों,' असें त्याला वाटले. लागलीच तो मालकाच्या घराकडे आला व 'मला आज काहीं जरूरीचे काम आहे,' असें त्यांना सांगून त्या ब्राह्मणासह देवालयांत आला. बाजारांतून आपल्या पैशांतून सर्व साग्रशिधा आणून, स्नान करून, शुचिर्भूत होऊन, त्याने स्वयंपाक सिध्द केला व त्या शैव ब्राह्मणाला श्रीगुरूमहाराजांकडे निरोप देण्याकरता पाठविलें.

त्या शैव ब्राह्मणानें येऊन पाकसिध्दि झाल्याचें सांगितलें.

स्वामीमहाराज, त्या शैव ब्राह्मणासहित, देवालयांतील पाकस्थानाजवळ आले. त्या जलवाहक ब्राह्मणाकडून वैश्वदेव करविला व मोठ्या प्रेमानें शैवासहित तेथें त्यांनी भिक्षा केली. नंतर त्या जलवाहकास भोजन करण्यास सांगून त्याचे भोजन झाल्यावर समाधान पावलेले महाराज त्या जलवाहक ब्राह्मणाला कल्याणकारक आशीर्वाद देऊन म्हणाले, 'अरे, विप्रा आता तुझें सर्व दैन्य लयाला गेलें. तूं अखंड वंशपरंपरा सुखी हो. तुझी आतां येथून भरभराट होईल. तुला ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर, प्रतिवर्षी नेमानें नरसोबाच्या वाडीस जाऊन श्रीपादुकांवर मोठ्या समारंभाने महारुद्राभिषेक करून ब्राह्मण संतर्पण यतिभिक्षा वगैरे करीत जा. दत्त महाराजांचे सतत स्मरण ठेव. रोज हजार गुरूचरित्र पठण करीत जा. त्यामुळें तुझे ऐहिक व पारलौकिकही कल्याण होईल.' असें म्हणून एका जागेकडे बोट दाखवून या ठिकाणीं द्रव्य साठा आहे तो काढून घे व जसे तुला सांगितले तसें दान, धर्म व सेवा करीत जा. आता येथून कोणत्याही प्रकारची चिंता व दुसऱ्याची नोकरीहि सोडून दे. तूं आता श्रीमान् झालास, जलवाहक किंवा चाकर राहिला नाहीस.

याप्रमाणें प्रसन्न मनांनें त्याला आशीर्वाद देऊन, वैद्यनाथस्थ शैव विप्रासह नरसोबाच्या वाडीस महाराज आले. श्रीचरणांना वंदन करून भजनानन्दमग्न होऊन आपल्या मठांत ते राहूं लागले.

जलवाहक ब्राह्मणहि स्वामीमहाराजांना भिक्षा देण्याच्या पुण्यप्रभावानें अकस्मात् मोठ्या संपत्तीनें युक्त झाला. सद्‌गुरूकृपा झाल्यावर, सर्व संपत्ति हात जोडून सेवा करण्यास तयार असतात असें शास्त्रवचन त्या ब्राह्मणाच्या बाबतींत अगदी खरे झाले.

श्रीमंती आल्यांने तात्काळ त्याचा विवाह झाला व उत्तम स्वभावाची व सौंदर्यशाली अशी स्त्री त्याला मिळाली. सुंदर पुत्री व पुत्र अशी संततीहि झाली. महाराजांनी सांगितल्याप्रमाणें घरी व नरसोबाच्या वाडीत त्याची श्रीसेवाहि सुरूं झाली.

याप्रमाणें ऐहलौकिकपारत्रिक सुख त्याला लाभलें. महाराजांच्या कृपेनें विपत्तीपासून मुक्त होऊन, परम सुखी झालेला हा ब्राह्मण हल्ली प्रख्यात असलेल्या कालकुंद्रीकरांचा मूळ पुरूष होय. अद्यापिसुध्दां हे कालकुंद्रीकर वाडीस प्रति वर्षी येऊन, स्वामीमहाराजांनी घालून दिलेल्या नियमांचे भक्तिभावानें अनुष्ठान करतात व संपत्ति व संतति इत्यादिकांनी समृध्द आहेत. महारूद्र, ब्राह्मणभोजन, यतिभिक्षा, गुरूचरित्रपाठ वगैरे यांचे नेम चालू असल्यांने ते सुखी आहेत व असेंच चालूं ठेवतील तर निरंतर सुखी राहतील. म्हणून गुरूभक्तीसारखे उभयत्र कल्याण करणारें सुलभ साधन या जगांत दुसरें नाही. गुरूभक्ताला या जगांत दुर्लभ असें काहींच नाही. हें त्या गोष्टीवरून लक्षांत घेण्यासारखें आहे.

याप्रमाणें नारायणस्वामीचरित्रामृतांतील शैवब्राह्मण मृत्युपरिहार व कालकुंद्रीकरपूर्वज दारिद्र्य शमन नांवाचे रत्न येथें प्रकट केलें आहे, त्याचा स्वीकार करून गुरूभक्त आनंदित होवोत.

येथें वैद्यनाथ ब्राह्मण, अपमृत्यु निवारण व काळकुंद्रीकर दैन्यनिवारण नांवाचा बारावा अध्याय समाप्त झाला.

ॐ **तत्सत्** ।

।। अध्याय बारावा ।।

।। श्री ।।

# अध्याय तेरावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । श्रीनारायणस्वामीमहाराज नरसोबाच्या वाडींत रहात असताना, माघ महिन्यांत महाशिवरात्रीचा महोत्सव प्राप्त झाला. त्या दिवशी तेथे यात्रा बरीच जमते. विशेषतः त्यावेळी मराठे मंडळी भक्तिभावानें बरीच जमतात. ठिकठिकाणी भजनें चालतात. मोठा आनंद सर्वजण लुटत असतात.

अंबाब्राह्मणींने कुरूगड्डीस श्रीपादवल्लभांच्या आज्ञेनें प्रदोषकाळी शंकराची व श्रीपादश्रीवल्लभांची पूजा जन्मभर केली व दुसऱ्या जन्मांतही कारंजनगरी जन्म घेऊन आपल्या शिवव्रती माधव नांवाच्या पतीसह त्याच अंबेने शंकराची उपासना केली. म्हणूनच श्रीशंकरस्वरूपी श्रीनृसिंहसरस्वती या रूपानें कारंजास अंबेच्या उदरी अवतीर्ण झाले.

गुरूचरिंत्रांत दृष्टान्तादाखल गोकर्ण-महाबळेश्र्वर, महांकाळेश्र्वर, मल्लिकार्जुन, शबर, सीमंतिनी वगैरे शंकर भक्तांच्याच कथा अधिक वर्णिल्या आहेत. यावरून शिवरात्री दिवशी नरसोबाच्यावाडीस यात्रा अधिक भरत असावी. श्रीदत्त त्रैमूर्ति असल्यानें व गुरूस्वरूपी असल्याने 'मूळ पीठ शंकरू । तदनंतर विष्णुगुरू ।' या गुरूचरित्रोक्तीप्रमाणें शिव प्राधान्य मानण्यास हरकत नाही. गुरूभक्तानेसुध्दा सकाळी श्रींचे द्वार उघडण्यावेळी 'प्रभो सरकार कैलासपते गिरिजाशंकर कर्पूरगौर महाराज' अशा बिरूदावलीचाच क्रम घालून दिला आहे व वाडीस रूद्राध्यायाचें प्राधान्य आहे. यासर्व प्राणावरून शंकरस्वरूप गुरू रूपाचेंच या अवतारांत प्राधान्य आहे. म्हणून शिवरात्रीस अधिक यात्रा येत असावी. कसेहि असो.

स्वामीमहाराज व शिष्यमंडळी संगमावर नित्याप्रमाणें स्नान करून आली व मठांतच श्रींच्यासह सर्वजण आपल्या आन्हिकास लागले. महाराजांचे पट्टशिष्य कृष्णानंदसरस्वती (हल्ली काशीकरस्वामी या नांवानें नारायणस्वामींच्या देवळानंतर ज्यांची गोपाळस्वामींच्या जवळ समाधी आहे ते) व इतरही शिष्यमंडळी तेथें विराजमान होतीच. त्यांच्यामध्ये सहज अशी गोष्ट निघाली की, आज ब्रह्मनाळ क्षेत्रांत इथल्यापेक्षाही मोठी यात्रा भरते. रघुनाथ व आनंदमूर्ति यांच्या दोन्ही समाधींचे तेथे आंदोलन होतें असें म्हणतात. त्यांतील एक शिष्य म्हणाले, 'ब्रह्मनाळक्षेत्र येथून किती दूर आहे बरें ?' दुसरे शिष्य म्हणाले, 'चार पांच कोसाच्या आंतच तें आहे' हे ऐकून पहिले शिष्य श्रीकृष्णानंदस्वामींच्या जवळ जाऊन म्हणाले, 'महाराज, आमची एक प्रार्थना आहे. आज गुरूमहाराजांच्यासह आम्ही सर्वांनी ब्रह्मनाथक्षेत्रास जाऊन आंदोलनउत्सव पहावा, असे मनांत आणलें आहे. परंतु तें कार्य आपण केल्याशिवाय होणार नाही. महाराज, आपल्या विनंतीला नकार देणार नाहीत.'

याप्रमाणें विचार चालला असता गुरूमहाराजांची दृष्टी त्यांच्याकडे गेली व ते कृष्णानंदांना म्हणाले, 'स्वामी, काय विचार चालला आहे ?'

कृष्णानंद म्हणाले, 'महाराज, श्रीचरणांच्यासह सर्वांनी आज ब्रह्मनाळ क्षेत्रांतील उत्सवास जावें असें यांचे म्हणणे आहे व मलाही त्याचप्रमाणे वाटत आहे. तरी श्रींनी कृपाकरून सर्वांचे मनोरथ पूर्ण करावे अशी चरणी प्रार्थना आहे. यावर श्रींची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें ठरवीत आहों.'

महाराज म्हणाले, ‘पाचामुखी परमेश्र्वर अशी म्हण आहे. तुम्हा सर्वांची इच्छा असल्यास माझीहि काहीं ना नाही. सर्वांच्या बुध्दींत प्रेरणा करणारे अंतर्यामी सद्‌गुरू महाराज आहेत.’

याप्रमाणें गुरुमहाराजांचें भाषण ऐकून सर्वांनाच फार आनंद झाला. सर्वांनी आपले आन्हिक आटोपते घेतले. श्रींनीहि आन्हिकाचा संक्षेप केला. परशुमुद्रा दण्डास बांधली व कमंडलु घेऊन मंडपांत महाराजांची आज्ञा घेण्याकरतां ते आले. सर्व शिष्यांसह श्रींना वंदन करून त्यांची आज्ञा घेऊन ते निघाले. वाटेंत शिरोळ गावी असलेल्या सद्‌गुरू भोजन पात्राचें दर्शन घेऊन वंदन केले व मिरजेंच्या रस्त्यावरून ते पुढें चालले. स्वामी अर्जुनवाड गावाजवळ आले असतील इतक्यांत एक तेज:पुंज यवन जवान समोरून येतांना श्रींनी व शिष्यांनी पाहिला. त्यानें शुभ्र वस्त्रें परिधान केली होती. डाव्या हातांत चिमटा व उजव्या हातांत एक कसले तरी गाठोडे – ज्यांतून लाललाल रक्तासारखे थेंब गळतात असें घेतलें आहे. ‘अल्लाखुदा’ अशा मंत्राचा मुखानें जप चालला आहे; भव्य दाढी व शांत मुद्रा असा तो यवन होता.

शिष्यमंडळींनी दुरूनच त्याला पाहून ‘हा यवन आहे व याच्या हातांत हे मांसाचे गाठोडें आहे’ असें पाहून याच्याबरोबर संभाषण करणेंही आम्हास पापदायक आहे असें मानून ते सर्व दूर उभे राहिले.

ते पाहून त्या यवनाला फार बरें वाटले. औषधांवांचून खोकला गेला असे मनांत समजून तो श्रींच्याजवळ आला. उभयतांचे मनोमन वंदन, सत्कारादि होऊन परतत्त्वाविषयी उभयतांची काहीं वेळ चर्चा झाली व त्या आनंदभरांतच ते दोघे शिष्यमंडळी उभी होती त्या ठिकाणी आले.

यवनाबरोबर गुरूमहाराज आपल्याकडे येतात याचें आश्र्चर्य वाटून हे काय आहे ‘अब्रह्मण्यम्’ अशा मुद्रेनें सर्वजण त्यांचेकडे पाहूं लागले.

तो यवन श्रींना म्हणाला ‘आपल्या सर्वांच्या फराळाकरतां हें आणले आहे. आज शिवरात्रीचा उपवास असेल; तरी याचा स्वीकार व्हावा.’ म्हणून श्रींच्यापुढें ते गाठोडे त्याने धरले.

ते पाहून महाराज शिष्य मंडळींना म्हणाले, ‘या साधूनें भक्तिभावानें आम्हांस हे पाथेय दिलें आहे; तरी ते कोणीतरी घ्या.’ हे ऐकून ‘आज शिवरात्रीचा उपवास; त्यांत हे मांस आणि तेही यवनाने आणलेलें तेव्हां ते कसें घ्यावें ?’ म्हणून कोणीही ते घेण्यास धजेना.

ते पाहून महाराज म्हणाले, ‘अहो कोणीतरी घ्या; त्यांना आपल्या ठिकाणावर जाण्यास विलंब होत आहे. कोणाचीही अवज्ञा करुं नये.’ याप्रमाणें गुरूमहाराजांचा अत्यंत आग्रह जाणून एका शिष्यानें आपल्या पदरांत त्या यवनानें दिलेले गाठोडें जीव घट्ट करून बांधून घेतले.

त्या यवनानेहि महाराजांना नमस्कार केला व महाराजांच्या दर्शनानें आपण धन्य झालों अशा मुद्रेनें तो आलेल्या वाटेंने पुन्हा आपल्या ठिकाणी गेला.

त्यानंतर थोड्याच वेळांत श्रींसह सर्व मंडळी मिरजेच्या घाटावर आली. श्रींसह सर्वांनी कृष्णेचें स्नान केलें व माध्यान्हकालाचे आन्हिकही संक्षेपत: उरकले. महाराज शिष्यांना म्हणाले, ‘आता माध्यान्हकाल झाला, अद्यापी पायी प्रवास करावयाचा आहे; तेव्हा उपहाराचें साधन काहीं कोणी बरोबर घेतलें आहे की नाही ? इथून मिरज तर एक कोसभर राहिले. तेव्हा तिकडेही जातां येणार नाही.’

## ।। अध्याय तेरावा ।।

हें ऐकून कृष्णानंद म्हणाले, ‘आजारी व रात्रीचें उपोषण आहे म्हणून काहीं उपहाराचे साधन कोणी आणलें नाही व ब्रह्मनाळास जाणे तर आवश्यक आहे. तरी आतां कसेहीकरून तिकडे गेलेच पाहिजे. सर्व जरी क्षुधित असले तरी त्याबद्दल विचार करून काय उपयोग ?’

यावर महाराज हंसून म्हणाले, ‘अहो, आम्ही विसरलोंच. त्या यवनानी दिलेले पाथेय आपल्याजवळ आहेच. त्याचाच उपयोग उपहाराकरता केला म्हणजे झालें.’

हें महाराजांचे वाक्य ऐकल्याबरोबर मात्र सर्वांची मुद्रा विलक्षण झाली व ते सर्व परस्परांकडे पहात कांही न बोलतां स्तब्ध राहिले.

महाराज म्हणाले, उगीच वेळ कां लावतां ? अद्यापी ब्रह्मनाळ दूर आहे व उपहार तर झाला पाहिजे. तरी तें गांठोडें कृष्णेंत बुडवून पवित्र करून आणा. म्हणजे त्यावरच आजचा माध्यान्ह काल भागेल.’

हें ऐकून कोणीहि तें काम करण्यास धजेना. तेव्हा भक्तिपरायण व गुरूवचननिष्ठ कृष्णानंदयतींनी ते गाठोडें स्वतःच घेतलें व कृष्णा नदीत बुडवून महाराजांच्यापुढें ठेवले. महाराजांनी तें उघडण्याची आज्ञा दिल्यावर, तें उघडून जों पहातात तों त्यांत पिकलेले आंबे, केळी वगैरे अनेक फळफळावळें व पेढे, बर्फी इत्यादि सर्वांना पुरून उरतील एवढे पदार्थ दिसले. सर्वांना ते पाहून मोठें आश्र्चर्य व कौतुक वाटले व महाराजांच्या सामर्थ्याची व वाक्याची महती त्यांच्या अनुभवास आली. सर्वांना ते पदार्थ वाटून झाल्यावर त्यांनी मोठ्या आनंदाने तेथें फराळ आटोपला व महाराजांसहित सर्व शिष्य तृप्त होऊन त्यांच्याबरोबर ब्रह्मनाळास जाण्याकरतां निघाले. जातांना वाटेत कांही प्रसंगाने सहज कृष्णानंदांनी महाराजांस विचारले, ‘प्रभो, हा पाथेय देणारा यवन साधु कोण ? यांचे नांव काय ? आम्हांस हें मांसाचे पाथेय देण्याचें कारण काय ? तेथे क्षणभर उभयतांचा संवाद काय झाला ? इत्यादि वृत्तान्त ऐकण्याची आमची इच्छा आहे. कृपा करून ती पूर्ण व्हावी अशी विनंती आहे.’

महाराज म्हणाले, ‘अहो, कबीरदासाप्रमाणें तो यवन महासिध्द व ब्रह्मनिष्ठ पुरूष आहे. मिरासाहेब असें त्या पुरुषाचें नांव आहे व मिरजेस त्याचा दर्गा आहे. हिंदु व मुसलमान त्याचे भक्त आहेत. आपल्या दिव्य दृष्टीनें आम्ही आलेले जाणून आमच्या स्वागताकरता व तो अतिथिप्रिय असल्यानें आमच्या अतिथ्याकरता आम्हास नदीच्या पलिकडेच सामोरा येऊन आमचें अतिथ्य करून हें गाठोडें त्यानें दिले. ब्रह्मचर्चा आमची व त्याची एक क्षणभर होऊन दोघांनाही समाधान झालें. भगवत्कृपा झाली म्हणजे ज्ञानोत्पत्तीला जातपात आड येऊं शकत नाही हें या उदाहरणावरून लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या जातीच्या आहाराप्रमाणें आम्हास त्यांनी उपहार दिला. भगवती कृष्णामातेनें तो आहार आमच्या खाण्यास योग्य असा करून दिला. भगवती कृष्णा कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ आहे हेही लक्षांत घेण्यासारखे आहे. फक्त आपण तिला अनन्यशरण असले पाहिजे. ‘कृष्णाविष्णुतनुः साक्षाद्वेण्यादेवो महेश्र्वरः’ ही व्यासवाणी मिथ्या कशी होईल ?’ याप्रमाणें सांगून भगवद्भजन करीत सर्व मंडळींसह सूर्यास्ताच्या सुमारास रघूनाथ व आनंदमूर्तीच्या निवासाने पवित्र झालेल्या व जागृत अशा ब्रह्मनाळ क्षेत्रांत महाराज आले. शिष्यांसहित कोणी मोठे महात्मे तेथे आले आहेत असे समजल्यावर तेथील क्षेत्रवासी लोक श्रींच्या दर्शनास आले व त्यांनी त्यांना नमस्कार केला आणि मोठ्या प्रेमानें त्यांच्या राहण्याची वगैरे व्यवस्था केली.

सायंकालचे संध्यावंदनादि आन्हिक सर्वांचे झाले. दूध वगैरे देऊन क्षेत्रस्थांनी त्यांच्या उपहाराची व्यवस्था केली.

## ।। अध्याय तेरावा ।।

महाराजांचें नित्याप्रमाणें त्या ठिकाणी भजन झाले. ते ऐकण्याकरतां गांवातील थोर मंडळी जमली. भजनांनी सर्वांना मोठा आनंद झाला. भजन आटोपल्यावर मंडळींनी महाराजांना विचारले की, महाराज आज आपलें येणें कोठून झालें ? महाराज म्हणाले, 'आज सकाळी नरसोबाचे वाडीहून आम्ही निघालो. शिवरात्रीचा उत्सव येथें मोठा होतो असें ऐकले. या मंडळींचींहि इच्छा होती व सहज सत्पुरूषांचें व त्यांच्या पवित्र स्थानाचेही दर्शन घ्यावें म्हणून आम्ही येथें आलों,' याप्रमाणे श्रींचें वाक्य ऐकून मंडळी म्हणाली, 'महाराज, आपण आज दोन प्रहरी जर येथें आला असतां तर समाधीच्या आंदोलनाचा चमत्कारही आपणां सर्वांना पाहण्यास मिळाला असता.' महाराज म्हणाले, 'केव्हा आंदोलन होते, ती वेळ नक्की माहित नसल्यानें आम्हांस तो चमत्कार काही दिसला नाही. असो. आंदोलन पाहून तरी आम्हांस काय करायचें ? संतांच्या पवित्र स्थानाचें दर्शन भगवत्कृपेने झाले, त्यावरच आम्ही संतुष्ट आहोत. याप्रमाणे त्या मंडळींना सांगून घरी जाण्यास श्रींनी निरोप दिला. सर्व मंडळी आपापल्या घरी गेली. श्रीगुरूमहाराज शिष्यांना म्हणाले, 'आज शिवरात्री आहे तरी प्रातःकालपर्यंत सर्वांनी जागरण करावे असे शास्त्र आहे. ते शक्य नसेल तर निदान मध्यरात्रीपर्यंत तरी ते करावे. जसें जमेल तसें करा.' अशी आज्ञा शिष्यास देऊन महाराज स्वतः प्रातःकालपर्यंत एकाग्रचित्तानें भगवद्ध्यान करीत तेथें बसले. शिष्यांनीहि भगवन्नामस्मरणादिकांनी ती रात्र जागूनच काढली.

दुसरे दिवशी प्रातर्विधि वगैरे आटोपून श्रींनी शिष्यांसहित कृष्णाप्रवाहांत स्नान करून संध्या वगैरे आपले आन्हिक आटोपलें व दोन्ही समाधींच्या मध्यभागी आपले आसन घालून भगवद्ध्यान करीत ब्रह्मानंदांत निमग्न होऊन काहीं काळ महाराज तेथे बसले. तों तेथे एक मोठें आश्र्चर्य घडून आलेलें मंडळींनी पाहिले. तें म्हणजे त्या दोन्ही सत्पुरूषांच्या समाधी एकसारख्या डोलू लागल्या. स्नानाला येणारे क्षेत्रस्थ सर्व लोक तें आश्र्चर्य पाहून हें स्वामीमहाराजांचेच कौतुक आहे असे जाणून परस्परांत त्यांची प्रशंसा करूं लागले. ते म्हणाले, 'रामनवमी व शिवरात्री या दोनच दिवशी एकवार वर्षातून समाधीचें डोल आजपर्यंत आम्ही पहात आलो. परंतु आज समाधीचें सारखे आंदोलन चाललें आहे ! हें स्वामीमहाराजांचेच सामर्थ्य आहे ! हे महाराज म्हणजे प्रत्यक्ष भगवानच आहेत यांत काहीं शंका नाही !' याप्रमाणें म्हणजे भाषण ऐकून गुरूभक्तिपरायण श्रीकृष्णानंदसरस्वती त्या लोकांना म्हणाले, 'जनहो, गुरूमहाराजांना दुष्कर असें काहीच नाही. पदोपदी गुरूमहाराजांचे अद्‌भुत चमत्कार आमच्या पहाण्यांत येतात, आमचे गुरूमहाराज हे एक आश्र्चर्यसागर आहेत ! यांनी मेलेल्या वैद्यनाथस्थशैव ब्राह्मणाला जिवंत केले, दरिद्री असलेल्या काळकुंद्रीकरांच्या पूर्वजाला कुबेराप्रमाणें धनाढ्य केलें. आतां येतायेतांच मिरजेच्या घाटावर यवनानी दिलेल्या मांसाचे फळें व मेवा या स्वरूपांत रूपांतर केलें. केवळ हस्तस्पर्शेकरून ढाण्या वाघाची कंटकपीडा नष्ट करून त्याला सुखी केलें, वाडींतील महारोग्रस्त वैदिक ब्राह्मणाला केवळ संकल्पपूर्वक स्नान घालून निरोगी केलें. पराशरमुनि दर्शन देण्याकरता मोठ्या वृषभाचें रूप घेऊन वाटेतच यांच्याकडे आले. प्रत्यक्ष नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी नरसोबाच्या वाडींतील कृष्णा प्रवाहात आंत नेऊन यांना संन्यास दिला. राजापूरची गंगा गुप्त झाली असतां यांच्याकरतां पुनः प्रगट झाली. यांचें दिव्य भजन ऐकण्याकरता करवीर पुराधीश्र्वरी महालक्ष्मीनें मुद्दाम बोलावून यांना आपल्याजवळ ठेवून घेतले. चिदंबरदीक्षितांनी देवळपुरांत तीन महिने मोठ्या आदरसत्कारानें यांना आपल्या जवळ ठेवून घेऊन यांच्याशी मोठ्या अद्वैत वेदान्ताची चर्चा केली व धन्यता मानली. श्रीमद्दत्तगुरूमहाराज एक क्षणभरसुध्दां यांचें सान्निध्य सोडू इच्छित नाहीत. याहून अधिक वर्णन श्रींचे आणखी काय करणार ?'
याप्रमाणें कृष्णानन्दांचें वचन ऐकून 'हे महाराज म्हणजे दत्त भगवान् आहेत' असा सर्वांचाच दृढनिश्र्चय झाला. माध्यान्हकालपर्यंत समाधिस्थ राहून तावत्कालपर्यंत दोन्ही समाधींचें आंदोलन करून महाराज समाधीतून व्युत्थित झाले व आंदोलनहि बंद झाले.

त्यानंतर सर्व मंडळींनी जयजयकार, नमस्कार वगैरे करून महाराजांचा मोठा सत्कार केला. महाराजांनी सर्वांसह कृष्णाप्रवाहांत स्नान केले. त्यादिवशी तेथें मंडळींनी समाराधनाच केली. तेथे भिक्षा घेऊन सर्वांना आशीर्वाद व उपदेशामृतपान करवून शिष्यांसहित महाराज पुन्हा परत श्रीनरसोबाच्या वाडीस आले व श्रीचरणांना अभिवंदन करून आपल्या मठांत राहिले.

याप्रमाणें नारायणस्वामीचरित्रामृत सागरांतील ब्रह्मनाळस्थवृंदावनदोलन नामक रत्न येथें प्रकट केलें आहे तें घेऊन गुरूभक्त प्रमुदित होवोत अशी प्रार्थना आहे. येथें ब्रह्मनाळस्थवृंदावन दोलन नांवाचा तेरावा अध्याय समाप्त झाला.

★ ★ ★

।। अध्याय तेरावा ।।

।। श्री ।।

# अध्याय चौदावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । कोल्हापूर इलाख्यांतील शिरोळ पेट्यांत हरि भगवंत फडणीस नांवाचा सरकारी कारकून जमाबंदी खात्याकडे होता. कोल्हापूर सरकारकडून त्याला त्याच्या कुटुंबाचा निर्वाह होईल एवढी जमीन कारकुनीच्या नोकरीदाखल मिळाली होती व त्या जमिनीवर त्याच्या कुटुंबाचा निर्वाह चांगल्या तऱ्हेने होत होता. परंतु लाभ झाला म्हणजे अधिक लोभ निर्माण होतो असा नियम आहे. या नियमाला हरि भगवंत-नांवानें जरी हरि भगवंत होता तरी कृतीनें तसा नसल्यानें तो - अपवाद कसा होईल ? एकदां काहीं कामात त्यांनें लाच खाऊन सरकारी कामांत बरेच नुकसान आणलें. हें प्रकरण उघडकीस येऊन कारभाऱ्यांनी त्याला कामावरून दूर करून ( बडतर्फ ) त्याची जमीन सरकारजमा ( जप्त ) केली. त्यामुळें निराधार होऊन त्यानें सरकारस्वारीची भेट घेऊन पुष्कळ प्रार्थना केली. परंतु त्याचा अपराध क्षमा करण्याजोगा नसल्यानें सरकारनें तिकडें दुर्लक्ष केलें.

सर्व प्रयत्न करून थकल्यावर 'निर्वाणीचा एक पांडुरंग' या न्यायानें तो वाडीला येऊन राहिला.

नारायणस्वामी महाराजांची कीर्ति व सामर्थ्य वगैरे ऐकून रोज जाता येता त्यांचे दर्शन वंदन वगैरे करून इतर शिष्यांप्रमाणें त्यानें त्यांचे शिष्यत्व पत्करून तो त्यांच्याजवळ राहिला.

स्वामीमहाराज सर्वज्ञ असल्यानें त्यांनी त्याला 'तूं कोठला ? कोण ? येथे कां राहिलास ?' वगैरे काहींच विचारले नाही.

असा बराच काळ गेला. एके दिवशी कृष्णानंदस्वामींनी महाराजांना एकान्तांत विचारलें, 'महाराज, हा गृहस्थ बरेंच दिवस दर्शन, नमस्कार वगैरे करीत आपल्या सान्निध्यात राहिला आहे; परंतु श्रींनी त्याची एकदाहि चुकून चौकशी केली नाही. कृपासागर ब्रीद बाळगणाऱ्या गुरूमहाराजांची एवढी त्याच्यावर अवकृपा कां हे काहीं लक्षांत येत नाही.'

तें ऐकून महाराज म्हणाले, 'अहो सरकारांनी याला याच्या कुटुंबाचा उत्तम निर्वाह होईल एवढी जमीन याच्या नोकरीचा मोबदला म्हणून दिली असतां त्यावर संतुष्ट न राहतां यानें लांच खाण्याचे अत्यंत नीच कृत्य करून सरकारचें नुकसान केले. असा हा मनुष्य अधम आहे ! म्हणून याच्याशी संभाषणसुध्दां करावें असें आम्हास वाटत नाही. अशी माणसें राष्ट्रविघातक असतात. राजांनी याची जमीन काढून घेऊन नोकरीवरून कमी केलें आहे. हा याला योग्य दण्ड मिळाला आहे.'

तें ऐकून कृष्णानंद म्हणाले, 'होऊं नये ती गोष्ट याच्या हातून झाली, हें खरें आहे. मूर्खपणानें यानें अपराध केला आहे. याची आतां फार हलाखीची स्थिती आहे. तरी श्रींनी याचे अपराध पोटांत घालून त्याबद्दल याला क्षमा करावी; निराधार होऊन तो श्रींजवळ शरण आला आहे.

महाराज म्हणाले, 'राजाचा अपराध यानें केला आहे. त्यांनीच याच्यावर कृपा केल्यास याचें कल्याण होणार आहे.'

।। अध्याय चौदावा ।।

यात्रमाणें महाराजांचें वचन ऐकून कृष्णानंद त्यावेळी काहीं बोलले नाहीत. हरि भगवंतांचे त्यांनी सांत्वन केले व म्हणाले की तुझे कार्य होईल. चिंता करूं नकोस. तूं महाराजांची एकनिष्ठपणे सेवा करीत जा. असें त्याला सांगून एक सेवा त्याच्याकडे नेमून दिली.

याप्रमाणें काही दिवस लोटल्यावर छत्रपति सरकारस्वारी लवाजम्यासहीत प्रसंगानें नरसोबाचे वाडीस आली. नारायणस्वामीमहाराज वाडीस रहातात हें त्यांना माहितच होते. रथांतून उतरल्याबरोबर प्रथम महाराजांचें दर्शन घेऊन मग श्रीदत्तदर्शनास जावें असें ठरवून ते महाराजांच्या मठाजवळ आले व पहातात तों मठाचे द्वार बंद आहे असें त्यांना दिसलें.

सरकारस्वारीला महाराजांचें दर्शन घ्यायचे आहे असा त्यांचा रोख पाहून त्यांची सेवक मंडळी मठाचे द्वार उघडण्यास महाराजांस सांगावें अशा तयारीत असलेली राजेसाहेबांनी पाहिली व ते म्हणाले, 'कोणीहि दार उघडण्यासाठी खटपट करूं नये. आपल्या इच्छेनें महाराज जेव्हां दार उघडतील त्यावेळी आम्ही येऊन श्रीदर्शन घेऊं. त्यांना प्रतिबंध होईल असें वर्तन कोणीहि करूं नये.' याप्रमाणें त्यांना आज्ञा देऊन आपण स्नान करण्याकरतां ते श्रीकृष्णामाईच्या तीरावर गेले. स्नान वगैरे आटोपून श्रीदत्तमहाराजांचे दर्शन, प्रदक्षिणा व पुजाऱ्यांनी दिलेला श्रीफलादि प्रसाद घेऊन मठाचे दार उघडले असल्यास दर्शन घ्यावें, नसल्यास दार उघडेपर्यंत तेथेंच बसावे, अशा मनोदयानें ते वरती आले व पहातात तों श्रींच्या मठांचे द्वार उघडलेलें त्यांच्या दृष्टीस पडले.

राजेसाहेब खालीं स्नानास गेले असतील-नसतील तोच महाराजांचे आन्हिक संपल्यामुळे त्यांनी द्वार उघडलें व पहातात तो हरि भगवंत कारकून द्वारांत हात जोडून उभा असलेला श्रींनी पाहिला. त्याची अवस्था पाहून श्रींचे चित्त द्रवले. ते म्हणाले, 'अरे, आतां सरकार येथें दर्शनास येतील. तुला त्यांची नोकरी करण्याची अपेक्षा असेल तर, त्यांना तूं नमस्कार कर. म्हणजे तुला ती मिळेल व येथेंच राहून श्रीसेवेंत काळ घालवायचा असेल तर आमच्या इतर शिष्यांप्रमाणें सरकारांचा नमस्कार तूं घे. तुला जे इष्ट असेल त्याप्रमाणें कर.'

हरि भगवंताला राजाकडून नमस्कार घेऊन परम कल्याण होण्याचें भाग्य कोठून लाभणार ? त्याकरतां तो येथें आलाच नव्हता. ताम्हणांत खारीक कापूर घेऊन विकत बसणाऱ्या माणसास स्टेशनरी मालाच्या दुकानाची इच्छा कशी होणार ? माणसांचें दुर्दैव त्याला तशी इच्छाच होऊं देत नाही. यालाच प्रारब्धाचें प्राबल्य असें शास्त्रकार म्हणतात. असो.

कारकुनानें राजेसाहेबांना नमस्कार करून गेलेली नोकरी व जमीन मिळवावी असें मनांत ठरविलें व सरकार आल्याबरोबर त्यांना नमस्कार करायचा अशा तयारीत तो राहिला. इतक्यांत सरकारस्वारी श्रींच्या दर्शनार्थ मठांत आली व श्रींना व त्यांच्या शिष्य मंडळींना त्यांनी नमस्कार केला. हरिभाऊ फडणीसांनी राजकृपा व्हावी म्हणून त्यांना नमस्कार केला. राजेसाहेब गुरूमहाराजांना म्हणाले, 'महाराज आपल्यापैकी लोकांनी मला नमस्कार करूं नये असा दंडक असता, हे आपले शिष्य मला नमस्कार करतात हें योग्य नाही. यांत माझेंच अकल्याण आहे. हे वर्तन मला विपरीत वाटतें.'

तें ऐकून महाराज म्हणाले, 'या गृहस्थाचे तुम्हीच मालक आहा. हरि भगवंत फडणीस नांवाचे हे गृहस्थ तुमचे नोकर आहेत. पूर्वी यांनी तुमच्या दरबारांत लांच घेऊन गुन्हा केला आहे. त्याबद्दल क्षमा मागण्याकरता हा आपणांस नमस्कार करीत आहे. कृतकर्माबद्दल याला बराच पश्चाताप झाला आहे. आतां याची हकीकत तुमच्या लक्षांत आली असेलच व याला पदरांत घेऊन शक्य असल्यास पूर्वाधिकारावर याची नेमणूक करावी.'

हें गुरूमहाराजांचें वचन ऐकून राजाच्या लक्षांत सर्व गोष्ट आली व 'महाराजांनी ज्यांचा अंगीकार केला त्याला सोडण्याचें त्रैलोक्यांतही कोणाला सामर्थ्य नाहीं. याला आतांच मी कामावर रूजू करून घेतो.' असें म्हणून लगेच राजेसाहेबांनी कारभाऱ्यांना बोलावून 'याची जमीन याला परत देऊन पुनः आपल्या कामावर याला रूजू करून घ्यावें' असा त्यांना हुकुम दिला. त्यांनीहि त्याप्रमाणें त्या कारकुनाला कामावर रूजु करून घेतलें.

नंतर राजेसाहेब म्हणाले, 'महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें याला कामावर घेतलें आहे. श्रीचरणास विदित व्हावें व संतोष व्हावा.' हें वाक्य ऐकून महाराज म्हणाले, राजन्, 'हा मनुष्य तुमचा, जमीन तुमची, घेणारे व देणारे तुम्हीच, आम्हा निःसंगसंन्याशांचा याच्याही काय संबंध ? तुमच्याच माणसावर तुम्ही दया केली आहे. अशीच सर्व प्रजेवर दया ठेवा म्हणजे इह व परत्र तुमचे कल्याणच होईल.'

नंतर सरकारांना आशीर्वाद देऊन त्यांना कोल्हापुरास जाण्यास श्रींनी निरोप दिला. राजे गेल्यावर हरि भगवंताला महाराज म्हणाले, 'आतां येथून पुढें खरेपणानें वाग. काहीं लाचलुचपत घेण्याच्या भानगडींत पडूं नको. त्याने काय परिणाम होतो हें तुझ्या अनुभवाला आलेच आहे. दुर्लभ मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, तरी स्वधर्माप्रमाणें वागून ईश्र्वराची व संतजनांची सेवा यथाशक्ति करीत जा व आपला उद्योग चोख व प्रामाणिकपणें करून नरदेह मिळाल्याचें सार्थक कर.'

याप्रमाणें त्याला सांगून त्यालाहि गांवी जाण्यास श्रींनी निरोप दिला.

याप्रमाणें ब्रह्मानंद निमग्नचित्त होऊन भक्तिमार्गाचा प्रसार करीत व शरणागतांना पावन करीत भूवैकुंठरूप असलेल्या नरसोबावाडींत महाराज राहिले.

याप्रमाणें नारायणस्वामीचरित्रामृतसागरांतील हरि भगवंतानें केलेल्या अपराधाचें शमननामक रत्न येथें प्रकट केलें आहे. गुरूभक्तांनी त्याचा स्वीकार करून आनंदित व्हावें. येथें हरि भगवंत अपराधशमन रूप चौदावा अध्याय समाप्त झाला.

ॐ **तत्सत् ।**

★★★

।। श्री ।।

# अध्याय पंधरावा

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । श्री नरसोबाचे वाडींत श्रीनारायणस्वामीमहाराज याप्रमाणें श्रीगुरूमहाराजांचे व श्रीकृष्णामातेचे सान्निध्यांत ब्रह्मानंदांत निमग्न होऊन भक्तजनांचा उध्दार, रोग्यांचा रोग परिहार, मृताला जीवदान, दारिद्र्याला श्रीप्रदान, मूर्खाला विज्ञानसमर्पण, पातक्यांचे अघनाशन, आर्त मानवाचा पीडापरिहार इत्यादि अलौकिक चमत्कार करीत व आबालगोपालांना भजनानंदांत निमग्न करीत मोठ्या आनंदानें जीवनमुक्त होऊन राहिले. ज्याचा ज्याप्रमाणें अधिकार असेल त्या अनुसारानें "अधिकार तैसा करू उपदेश" या संतोक्तिप्रमाणें ते उपदेश करीत असत. गृहस्थाश्रमी गुरूभक्तासारख्यांना भक्तितत्वाचा उपदेश त्यांनी केला. आपल्या संचारानें सर्व जगाला पवित्र केलें. सर्व देवांची स्तुतिपर व ब्रह्मानंदाला प्रकाशित करणारी भजनावली सहजस्फूर्तीने त्यांनी केली. ती पुढें दिली आहे. अत्यंत ललितपदांनीं युक्त अशीं ही त्यांच्या नित्याची भजनें आहेत. त्यांच्या श्रवणानें महालक्ष्मी व दत्तमहाराज यांनीहि माना डोलावल्या.

मनाला व वाणीला सुध्दां अगम्य अशी गुप्त व प्रकट अशी अनेक अद्‌भूत चरित्रें त्यांनी केली. अशा सर्व कार्यात बराच काळ लोटल्यावर त्यांनी एके वेळीं आपल्या मनांत असा विचार केला कीं, 'आतां भूलोकांतील आपलें कर्तव्य समाप्त झालें आतां हें मर्त्य शरीर टाकून, दिव्यदेह धारण करून, ब्रह्मलोकांत ब्रह्मदेव व तल्लोकनिवासी भगवद्‌भक्तांना भजनानंद देण्याकरता पुष्पक विमानांत आरूढ होऊन ब्रह्मलोकास जावें व याठिकाणीहि गुप्तरूप धारण करून भक्तांच्या उध्दाराकरता रहावें. कारण गुरूमहाराजांचें येथें अखंड वास्तव्य आहे. तरी आम्हासहि येथें राहिलेच पाहिजे. फक्त प्रगटरूपानें न राहता गुप्तरूपानें रहाणें एवढाच काय तो विशेष.'

याप्रमाणें विचार करून शालिवाहन शके १७२७ या वर्षी क्रोधन नामसंवत्सरांत चैत्रवद्य अमावास्येस सोमवारी आठ घटका सूर्य आला असतां जणूं मर्त्य शरीरावर क्रुध्दच झालों आहो असें दाखवीत नारायणस्वामीमहाराज दत्तात्रेयश्रीपादश्रीवल्लभ नृसिंहसरस्सवती श्रीचरणांच्या सच्चिदानंद एकमेवाद्वितीय स्वयंप्रकाशअखंड अशा स्वरूपांत लोकदृष्ट्या लीन झाले.

नंतर भक्तजनांना आलेल्या अनुभवावरून ते गुप्त रूपानें आहेतच असा अगदी ठाम निश्र्चयच आहे. ईश्र्वररूप झालेल्या भक्ताला ईश्र्वरी सामर्थ्य सहजच प्राप्त होतें हें श्रीस्वामीमहाराजांच्या समाधीनंतर झालेल्या लोकोत्तर चरित्रावरून लक्षांत येण्यासारखें आहे. अभक्तांच्या दृष्टीनें ते दिसत नसले तरी भक्तजनांना त्यांचें दर्शन अद्यापीहि होतच आहे. या गोष्टीला अनेक भक्तच साक्षीदार आहेत.

नृसिंहवाडींत अद्यापीही श्रीनारायणस्वामीमहाराज जागृत आहेत व भक्तांच्या इष्टकामना ते पूर्ण करतात असा त्यांचा अनुभव आहे.

नारायणस्वामींना ब्रह्मलोकांत नेण्याकरतां पुष्पक विमान किंकिणीचा शब्द करीत आलेले गोपाळस्वामीमहाराजांनी पाहिले. या गोपाळस्वामीमहाराजांची जिवंत समाधी नरसोबाच्या वाडीत प्रसिध्द आहे. हे मोठे अधिकारी असे श्रीदत्तमहाराजांचे भक्त होते

व अद्यापी आहेत. श्रीनारायणस्वामींच्या प्रयाणकाळीं हे कृष्णाप्रवाहांत स्नान करीत होते. विमान आलेलें पाहिल्याबरोबर स्नानाचा परित्याग करून हे स्वामींच्या मठांत आले व श्रीनारायणस्वामींच्या चरणकमलीं मस्तक ठेवून त्यांनी त्यांना वंदन केलें व नंतर स्वामीमहाराज पुष्पकारूढ झाले असा इतिहास आहे.

'सांगावे कवण्या ठाया जावे ।' हें पद पालखीच्या शेवटी म्हणतात. तें याच गोपाळस्वामींनीं केले आहे. यांनीं देवाचा या पदानें धावा केल्यावर श्रीदत्तमहाराजांनीं यांना दर्शन देऊन यांच्या कपाळीं स्वतः भस्म लावून 'भिऊं नको' असें सांगून देवाची इनाम गांवें यांच्याकडून सोडवून आणली असाहि इतिहास आहे. तो या पदांत आहे व हे पद त्या दिवसापासून पालखीच्या शेवटी म्हणण्याचा प्रघात आहे. त्याशिवाय श्रींच्या पालखीची समाप्ति होत नाही.

गोपाळस्वामींच्या समाधीचें स्थान अद्यापी कडकडीत व जागृत आहे. असो.

याप्रमाणें स्वामीमहाराज पुष्पकारूढ झाल्यावर त्या सालच्या भाद्रपद महिन्यांतील पंचमी तिथीला कोल्हापूरच्या मठांत राहणाऱ्या बाबा पेठकर नांवाच्या आपल्या शिष्याच्या स्वप्नांत महाराज प्रकट झाले व म्हणाले कीं मी काशींतून आणलेलें व माझ्या रोजच्या पुजेंत असलेले विश्र्वेश्र्वराचें बाणलिंग तुझ्याजवळ मी पूर्वी ठेवलें आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा कोल्हापूरच्या मठांत माझ्या आसनाजवळ कर व त्या देवाचें नांव 'लीला विश्र्वंभर असें ठेव. तुझें कल्याण होईल,' याप्रमाणें सांगून स्वामी गुप्त झाले.

पेटकरानें श्रींच्या आज्ञेप्रमाणें ते लिंग त्यांच्या आसनाजवळ स्थापन केलेलें अद्यापपर्यंत होतें. हल्लींच्या सरकारी कारकिर्दीत मठाचा भाग पाडून तेथें दुकानास जागा दिली व हे सर्व देव तेथेंच एका लहानशा जागेंत आणून ठेवले आहेत. सर्व देवांबरोबर याहि देवांची अशी परिस्थिति झाली आहे हे काहीं चांगलें नाहीं. 'परंतु कालाय तस्मै नमः' असेंच म्हणावें लागतें.

हे बाबा पेटकर पुढें संन्यासाश्रम स्वीकारून 'अच्युतस्वामी' या नावानें ओळखिले जात होते. श्रीस्वामीमहाराजांच्या शिष्यांत कृष्णानंदसरस्वती हे परमगुरूभक्त, कर्तबगार व व्यवहारचतुर असे शिष्य होते. यांनाच काशीकरस्वामी असें म्हणतात. वाडीस नारायणस्वामींच्या देवळाजवळ यांची समाधी आहे व त्यावर पादुका स्थापिल्या आहेत. गोपाळस्वामींच्या समाधीनंतर कृष्णानंदांची समाधी झाली असावी. कारण पुजारी गोपाळस्वामींची पूजा झाल्यावर काशीकरस्वामींची पूजा पूर्वापार करीत आलेले आहेत. अर्थात समाधीक्रमानेंच पूजेचा क्रम आहे.

कृष्णानंदांनी आपले गुरू नारायणस्वामी यांचा उत्सव अखंड चालावा म्हणून ठिकठिकाणी संचार करून त्यांच्या पश्र्चात् जमिनीचें उत्पन्न करून ठेवलें आहे.

दुसरे गुरूभक्त म्हणून प्रसिध्द असणारे ढोबळे या टोपण नांवाचे पुजारीच श्रीनारायणस्वामींचे शिष्य झाले. यांचें काव्य मराठी असून मोठे मनोहर आहे. हल्ली देवाकडे काकडआरतीपासून तो शेजारतीपर्यंत यांच्याच काव्याचा प्राधान्येकरून उपयोग होतो. शेकडो आरत्या व पदें यांनीं केलेलीं आहेत. प्रत्यक्ष दत्तमहाराजांची स्वारी दुपारच्या वेळेस यांच्या घरीं बसण्याकरतां येत असे. त्यावेळीं त्यांच्या घरांत धूप घातल्यासारखा वास येत असे व यांनी आपल्या सुनेला श्रींना बसण्याकरतां पाट घालण्यास सांगितलेले वृत्त ती सून वृध्दपणीं लोकांना सांगत असे. यांच्याशी प्रत्यक्ष दत्तमहाराज नृसिंहसरस्वतींचे संभाषण दर्शनादि होत असे. घरासमोरील अंगण लोटून काकड आरतीला देवाकडे जाण्यास यांना थोडा वेळ होत असे, हे पाहून एका सेवेकऱ्याला श्रींनी दृष्टांत देऊन 'गुरूभक्तांचें अंगण लोटीत जा म्हणजे तुझी कामना पूर्ण होईल' असें सांगितल्याचे परंपरेने ऐकिवात आहे. नारायणस्वामींच्या आरत्याहि यांनीं केलेल्या आहेत. त्या पुढे दिल्या आहेत आणि पदातही नारायणस्वामींचा उल्लेख "यतिनारायण, भक्त पाहुनी," "पूर्ण ब्रह्म हा प्रभुनारायण" असा यांनीं केला आहे. या सर्व प्रमाणांवरून हे दुसरे तत्समानकालीन नारायणस्वामींचे प्रसिध्द शिष्य होत.

## ।। अध्याय पंधरावा ।।

हल्लीं स्वामीमहाराजांच्या उत्सवास कर्नाटकांतील रट्टीहळीचे त्यांचे वंशज येऊन आराधना वगैरे करून जातात. परंतु ते मुलीचे वंशज कीं विश्र्वंभरशास्त्री नांवाच्या त्यांच्या मुलाचे वंशज हे काहीं प्रामाणिकपणे कळले नाही. त्यांच्याकडे स्वामींच्या जमिनीचे उत्पन्न आहे एवढी गोष्ट खरी.

नारायणस्वामीमहाराज रोज गुरूमहाराजांची मानसपूजा करीत असत. त्यांत सर्व उपचार मनानें निर्माण करून समर्पण करण्याची पध्दती आहे.

एकदां हिऱ्याची अंगठी करून देवाच्या हातांत घालण्याची विस्मृतीनें राहिली. पूजा आटोपून पहातात तो आसनावर ती अंगठी आढळली. मग ती घेऊन श्रींनी देवाला समर्पण केली. अशी यांची पूजा प्रत्यक्षरूप होती, असे वृध्दांच्या तोंडून परंपरेनें ऐकलें आहे.

स्वामीमहाराजांचें गुप्तप्रकट सर्व चरित्र यथार्थ कळणें कितीतरी कठीण आहे. त्यांनीच कृपा करून सांगितल्यास तें कळणार आहे. यथाकथंचित् परंपरेनें कळलेले व अगदी अल्प असे चरित्र येथें यथामती लिहिलें आहे. त्यांत मनुष्यबुध्दी अनुसार प्रमादच अधिक होणें संभवनीय आहे. त्याबद्दल श्रीस्वामीमहाराज क्षमा करतीलच असा भरंवसा आहे.

श्रीनारायणस्वामीमहाराज श्रीनृसिंहसरस्वती दत्तमहाराजांना अत्यंत प्रिय होते म्हणूनच नारायणस्वामींच्या देवळांतच उत्सव मूर्तीरूपानें महाराजांचे सतत वास्तव्य आहे. नाहीतर निराळे एखादें मंदिर करून त्यांत उत्सवमूर्ती ठेवावी अशी प्रेरणा पुजाऱ्यांना झाली असती. परंतु भक्तांच्या जवळच त्यांना राहण्याचें असल्यानें तशी प्रेरणा त्यांना दिली नाही. शिवाय नारायणस्वामींच्या उत्सवात १० दिवसपर्यंत कीर्तन होईपर्यत उत्सवमूर्ती सिंहासनावर बसून व कीर्तन होईपर्यंत जागरण करून आपल्या भक्तांचा उत्सव साजरा करते. हें अत्यंत प्रेमाशिवाय कसे घडणार ? यावरून नारायणस्वामींसारखे भगवत्प्रिय भक्त होणें म्हणजे जन्माचें साफल्य आहे असें सिध्द होते.

याप्रमाणें नारायणस्वामींच्या चरित्रामृतसागरांतील पंधरा रत्नें पंधरा अध्यायांत वर्णन केली आहेत.

उत्सवांत पुराण सांगण्यास उपयोग व्हावा म्हणून संस्कृत श्र्लोकांत ही रत्ने प्रकट केलीं. परंतु प्राकृत लोकांसही त्याचा उपयोग व्हावा म्हणून मराठी भाषेंतही ती प्रकट केलीं आहेत. वास्तविक पाहतां श्रीस्वामीमहाराजांचें दिव्य अद्भुत चरित्र कोठे व माझ्यासारखा अव्युत्पन्न व जडमति त्यांचे चरित्र लिहिण्याची इच्छा करणारा साधारण मानव कोठे ? अर्थात हे काहीं सांगत नाहीं. तरीपण श्रींच्या चरित्रांत इतर जसे चमत्कार आहेत तसा अत्यंत मूर्ख चरित्रलेखक असाही एक चमत्कार मानण्यास काय हरकत आहे ? त्यामुळें त्यांच्या चरित्रांत आणखी एका चमत्काराची भर पडल्यासारखेच होणार आहे.

हल्लीं पुण्यात गुळवणीमहाराज म्हणून प्रसिध्द असलेले गुरूभक्त श्रीयुत वामनरावजी गुळवणी यांचे वडील बंधू शंकरशास्त्री गुळवणी कौलवकर यांनी नारायणस्वामीमहाराजांचे शिष्य नागेश भटजी गुळवणी नांवाचे जे आपले पणजोबा यांच्याकडून परंपरेनें आलेली स्वामीमहाराजांची हकीकत टिप्पणरूपानें मराठींत लिहून ठेवली होती. ती त्यांनी माझ्याजवळ दिली व पुराण सांगण्यास योग्य असे संस्कृतांत याचें रूपांतर करा अशी आज्ञा दिली. ती नारायणस्वामीमहाराजांचीच आज्ञा असे समजून काहीं सेवा आपलेकडून घडावी या बुध्दीनें यथामती चरित्र लिहिलें आहे.

शंकरशास्त्रांनीं ही टिप्पणें लिहिलीं नसती तर स्पष्ट रीतीनें श्रींचें चरित्र वाचकांना कळलेंच नसतें. त्यांच्याच योगाने थोडे कां होईना हे चरित्र स्पष्ट कळले आहे, हे त्यांचें लोकांवर फार उपकार आहेत. प्रातःस्मरणीय दत्तस्वरूपश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती श्रीचरण नारायण स्वामींच्या उत्सवास पूर्वीश्रमी वाडीस येत असत. त्यांनी बारा श्र्लोकांत श्रींचे संस्कृत चरित्र लिहिले आहे. त्याचेच हे विवरण आहे असे म्हणण्यास काहीं हरकत नाही.

## ।। अध्याय पंधरावा ।।

शके १८५३ सालीं संस्कृतांत याचें रूपांतर केलें होते. परंतु त्यांत चिदंबर दीक्षितांची दुसरीहि काहीं हकीकत नव्हती व प्राकृत लोकांकरतां मराठी भाषांतरहि नव्हतें. यांत तो भाग अधिक घालून व मराठी भाषांतर करून यथामती चरित्र तयार झालें आहें १८८३ शकांत हा योग आला आहे. याच्या वाचनाने गुरूभक्त संतुष्ट होवोत व श्रीमद्दत्तात्रेयश्रीपादश्रीवल्लभ श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वरूप श्रीमन्नारायणस्वामीमहाराज यांचे चरणीं हे समर्पण केले आहे. त्यायोगे ते श्रीस्वामीमहाराज संतुष्ट होवोत बालकाचे बोबडे बोल कसेही असले तरी ते मातेला प्रियच असतात, त्याप्रमाणे हे त्यांना प्रिय होवोत अशी प्रार्थना आहे.

याप्रमाणे नारायणस्वामीचरित्रामृतांतील श्रीस्वामीसमाधिवर्णनरूप पंधरावा अध्याया समाप्त झाला.

ॐ **तत्सत्** ।

सकल सौभाग्यालंकृत सरस्वतीकुक्षिसंभूत व दत्तभक्त दत्तात्रेयसुत व जेरे पुजारिकुलसंभूत नारायणतनुज आत्मारामशास्त्री जेरे पूजारिप्रणीत नारायणस्वामीचरितं संपूर्णम् ।।

ॐ **तत्सत्** ।

★★★

# आरती - संग्रह

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरूभ्यो नमः । श्रीनारायणस्वामीशिष्य गुरूभक्तकृत नारायणस्वामी - आरत्या.

**आरती १**

कलियुगीं नरदेह धरूनी अवतार । दंडकमंडलुविलसित कौपीन सुंदर । सर्वांगी रूद्राक्षमाला शोभे त्रिपुंड्र । सिंहासनारूढ होऊनि तारी मुनिवर । जयदेव जयदेव नारायणमूर्ती । निगमागम वदती अपार तव कीर्ती ।। जयदेव जयदेव ।। १ ।। काशीप्रयाग कृष्णास्नान त्रिकाळी । करिसी योगीराया वदती ऋषि सकळी । श्रीक्षेत्री भिक्षाटन करिसी वनमाळी । संकटि स्मरता भक्ता पावसि तात्काळीं ।। जय. ।। २ ।। त्रिभुवनि शोधुनि सुस्थळ कृष्णातटिं वससी । कल्पवृक्षभेटी झाली श्रीगुरूसी । तें सुख न वर्णवे सुरवर सनकासी । नारद तुंबर श्रमले वदता कीर्तीसी । ।। जय. ।। ३ ।। आज्ञा घेउनि सहज तीर्थाटन करिसी । मार्गी उदक नसता गंगा आली ख्याती । स्नान करूनी निघता गुप्त भागिरथी । वैद्यनाथी विप्र सर्पविष हरती । जय. ।। ४ ।। अनंत ख्याती केली व कळें महिमान । मधु इंदु आमावास्या पुष्पकि बैसून । आज्ञा घेउनि दास जाती वैकुंठ भुवन । तारि तारि गुरूभक्त आला तुज शरण ।। जय. ।।५ ।।

**आरती २**

उत्पातादि ताप हरूनीया वेगी । शमदमशांती दिधली निजकीर्तनरंगी । स्वानंदे सद्भक्त डोलती जगी । अपार महिमा म्हणुनी वदताती जगीं ।। जय. ।। जयदेव जयदेव जय जय विश्र्वेशा । नारायणस्वामी तारक जगदीशा ।। जय. ।। १ ।। हरिहर ब्रह्ममूर्ती अवतार तूं पूर्ण । प्रगटुनि कलियुगि स्वये विश्र्व कारण । माळा मुद्रा शोभे यतिरूप सगुण । धरूनि तारिसी वेगी जडमूढ संपूर्ण ।। जय. ।। २ ।। निर्गुण निराकार स्वरूपसुंदर । मणिमय मुकुट झळके शशि प्रभाकर । कर्णी कुंडले तळपति किरीटी मनोहर । नेत्रनासिक सुरस सुहास्य निजवक्त्र ।। जय. ।। ३ ।। दंडकमंडलू धारण भस्मोध्दुलीत । रूद्राक्षमाळा गळा पुष्पहारयुक्त । काषायांबरवसन कटि विराजित । जंघा जानु दिव्य चरण आरक्त ।। जय. ।। ४ ।। ऐसें विश्र्वरूप ह्रदयी ध्याऊनी । मानसपूजा करिती जे जन प्रतिदिनी । अक्षय सन्मुख तिष्ठति स्वये गुरूमुनी । जाणुनी विनवी जना गुरूभक्त नमुनी ।। जय. ।। ५ ।।

**आरती ३**

काषायांबर करूनी भस्मलेपन । महिवर तीर्थे सकळहि पर्याटन करून । गुप्तरूपी रक्षसी भक्ता धरूनी । स्मरणे मात्रे तारी नकळे मूढ जन ।। जयदेव जयदेव जय जय गुरूमूर्ति ।। नारायणस्वामी तारक निजकीर्ते ।। जय. ।। १ ।। कृष्णा पश्र्चिमभागी राहुनिया गुप्त । आज्ञा कृष्णानंद पादुका स्थापित । केशर चंदन सुगंध चरणी लेपित । त्रिकाळ अर्चन करिती रूद्राक्षासहित ।। जय. ।। २ ।। उत्साह मधुमासी आनंद होत । यात्रे येती भक्त पावसी त्वरीत । पूजनमात्रे प्रसन्न मनोरथ पुरवीत । गुरूभक्ती स्वामी पावे त्वरीत ।। जय. ।। ३ ।।

**आरती ४**

व्याघ्रांबर कुशासन घालुनि आसन । भस्म चर्चुनि अंगी नेत्र लावून । षड्‌भुज मूर्ति ध्यानी अर्चुनी सुमन । त्रिकाल ध्यान करिती अचल मन सदन ।। जयदेव जयदेव जय जय यतिराया । नारायण स्वामी हरसी भगमाया ।। जय. ।। १ ।। जगी स्वये प्रगटुनि लीला वाढविली । जाता ब्रह्मनाळी वृंदावन डुललीं । सुरवर स्वर्गीहूनी सुमने वर्षिली । जयजयकार करूनी अनुदिनी त्रिकाळी ।। जय. ।। २ ।। अगम्यमहिमा गुरूची वदवेना वाणी । फणिवर तोही श्रमला थकला निर्वाणी । मायामोहसिंधुत बुडतो याक्षणीं । जाणुनि गुरूभक्त शरण तव चरणीं ।। जय. ।।३।।

**आरती ५**

कृष्णा गंगा संगमि वससी महाराजा । नाना लीला दाउनि करिसी निजमौजा । ब्रह्ममूर्ती तूची चित्स्वरूपी ओजा । धारण यतिवेष दीनाचे काजा । जयदेव जयदेव नारायण योगी । माया विपिनी गहना परमामृत भोगी ।। जय. ।।१ ।। दुंदुभि गर्जत येती सुरवर दर्शना । वंदना करूनी जाती स्वये निजसदना । विश्र्वजना तूची पाळिसी मनमोहना । अगाध लीला केली विश्र्वंभर गहना ।। जय. ।। २ ।। निशिदिनी लीला वदती रत जे तव नामी । तिष्ठसि तयाजवळी नाचसि तूं प्रेमी । वदे गुरूभक्त निश्र्चयनिगमी । शरण आलो कृपा अवलोकी स्वामी ।। जय. ।।३ ।।

**आरती ६**

स्मरता मुखी नाम ब्रह्म तिष्ठेचि । हृदयी सत्वर प्रगटे तम हा निरसेचि । ध्याता मानसि तिष्ठे स्वये ब्रह्मचि । सोहं शब्द खुंटे महिमा नामाचि ।। जयदेव जयदेव नारायण गुरो । स्वनाम महिमा श्रेष्ठ क्षितिवर कल्पतरो ।। जय. ।। १ ।। नामे शिव विष कंठी झाला शीतळ । ध्रुवबाळा पद नामे प्राप्त हो अढळ । वन्ही शांत स्मरता प्रल्हाद बाळ । नरहरि अंकी आरूढे नामाचे फळ ।। जय. ।। २ ।। सिंधुत नामे तरले अक्षय पर्वत । उध्दरिली अहिल्या नामे विख्यात । वाला अजामीळ गणिकादि पतित । अनंत पापी तरले तरपी आनंत ।। जय. ।। ३ ।। नामे लब्ध्वा मुक्ती चारी पुरूषार्थ । स्मरणे सद्‌गुरूभक्ती पावे परमार्थ । अष्टसिध्दि नव निधि नामे वरदार्थ । ऐसे निगमहि शास्त्रे वर्णिती समर्थ ।। जय . ।। ४ ।। नामी प्रताप जाणूनि गर्जति सद्‌भक्त । देखुनि षड्रिपु वैरी कालही अशक्त । नाममंत्र जपुनि गुरूपदिं व्हा मुक्त । अखिला प्रार्थुनि स्मरे नाम गुरूभक्त ।।५ ।।

**आरती ७**

कलिमाजी श्रेष्ठ वदती पुराणी । फणिवर मस्तक डुलवी अद्‌भुत लवकरणी । महिवर मृगवर सर्वहि लीन तव चरणी । पहाता गुरूचे चरण लोटांगण धरणी । जयदेव जयदेव नारायण मुनी । स्तवनी येउनि वाणी तव यश मम वदनी ।। जय. ।।१।। शांती दांती सर्व ब्रह्म मानुनी । ध्याउनि मानसमुद्रा करिती निज भजनी । कामादिक षड्वैरी धरणी त्रोटोनी । सत्संग देउनिया लावी गुरूभजनी ।। जय. ।।२।। सप्तविंशतिशके सत्राशे वर्षी । विमानि बैसुनि गेले वैकुंठी हर्षी । देखुनि गुरूभक्त स्तवितो तुज तोषी । वंशोवशी अर्चन घेउनिया रक्षी ।। जय. ।।३ ।।

**आरती ८**

चिन्मय मूर्ती सगुण लीला अपार । धरूनीया नरदेह हरसी भूभार । सुष्ट रक्षुनि करिसी दुष्टसंहार । सत्य तूची हरिहर जाहला निर्धार । जयदेव जयदेव नारायणस्वामी । पंचप्राणे आरति करितो तुजला मी ।। जय. ।।१ ।। सौम्य रूप धरूनी संगमी वससी । त्वत्पदर्शन देउनि भ्रांती निरसीसी । सज्जन मुनिजन पाळिसी वैकुंठवासी । क्षीराब्धीनिवासी अनंत गुणराशी ।। जय. ।। २ ।। भक्ती देखुनि राक्षिसि दासालागून । देही विनटुनि स्वामी देउनिया ज्ञान । वदनी वदवुनि हरसी महाविघ्न । क्षणैकमात्रे छेदिसि मायाबंधन ।। जय. ।। ३ ।। दीनासी सारथि तूं कृपासिंधु दाता । त्राता तू या मेदिनि वेद वर्णिता । भक्तवत्सल कृपाळू तारक गुरुनाथा । कीर्ती ऐकुनि चरणी ठेवियला माथा ।। जय. ।। ४ ।। स्वानंदे सन्मुख करिती आनंद । सुरवर सकलहि पाहति हर्षुनि विनोद । स्तवनी श्रवणीं मननी हरसी भवबंध । गुरूभक्त चरणी लीन परमानंद ।। जय. ।। ५ ।।

**नारायणस्वामीशिष्यकृष्णानंदारती १**

कृष्णापश्चिमभागी राहुनि आपण । गुरूस्वामींच्या करूनी पादुका स्थापन । रूदाक्षासहित करिती अर्चन । ऐसी गुरूची सेवा अपार करून ।। जयदेव जयदेव जय श्रीगुरू राजन् । कृष्णानंद स्वामिन् गुरूचरण प्रेमन् ।। जय. ।। १ ।। बहुत दिवस सेवा करूनी । नारायण गुरूला देह अर्पूनी । गुरू हेची तत्व सत्य मानुनी । आनंतर आज्ञा गुरूची घेऊनी ।। जय. ।। २ ।। सत्राशे फाल्गुन एकूण पन्नासी । सप्तमि वद्यपक्षी शनिवार दिवशी । प्रात:काळी गेला टाकुनि देहासी । तेव्हां जाउनि बसले ब्रह्मपदासि ।। जय. ।। ३ ।। गुरूस्तुती करता बसले सन्निध्द । अत्रिसुताने तेथे दिधला आनंद । त्यास्तव सत्पुरूषाते जाहला आनंद । म्हणुनि सर्वहि म्हणती भक्तीचा कंद ।। जय. ।। ४ ।। नरसिंहसरस्वतींनी आज्ञा करोनी । भक्ताकरवी कृष्णामूर्ती स्थापुनी । सर्वहि जाउनि तेथें पूजन करूनी । दासचि चरणी म्हणतो ठेवा नेवोनि ।। जय. ।। ५ ।।

**आरती २**

श्रीमन्नारायण चरणी अनन्य शरण । होऊनिया गुरूभक्ती केली निर्वाण । गुरूरेव तत्त्व सत्य मानून । गुरूरूपी होउनिया गुरूपदी लीन ।। जयदेव जयदेव जय जय गुरूरूपा । कृष्णानंदस्वामी सच्चित्सुखरूपा ।। जय. ।। १ ।। गुरूसेवेविषयी अखंड ध्यास । म्हणुनिया करिसी गुरूपदी वास । गुरूस्तुतीस्तव वास नैराश्य । आज्ञा ऐसी म्हणवुनि स्थापिसी दास ।। जय. ।। २ ।। त्वत्सम नाही कोठेही अन्य । ऐसें स्तविती स्वामी गुरूलागी मान्य । ऐसी भक्ती गुरूसी करूनी अनन्य । भक्तालागी बोध करिसी चिध्दन ।। जय. ।। ३ ।।


**आरती ३**

जन्मुनि विप्रकुळी सत्संग धरूनी । भूवरि समग्र तीर्थे करूनी सुविधानी । कृष्णागंगासंगमि राहुनी त्रिस्थानि । संपादिला आश्रम गुरूवरदे करूनी ।। जयदेव जयदेव जय कृष्णानंदा । गुरूवरदा स्वानंदा सच्चित्सुखकंदा ।। जय. ।। १ ।। श्रीचरणी विश्र्वास धरूनीया चित्ती । केली सेवा सुमने न दुजे करू शकती । निश्र्चय पाहुनि गुरूवर तोषुनि त्रिभूज्योति । वामे सुस्थळ दिधले अक्षय वरप्रीती ।। जय. ।। २ ।। देखुनि सुरमुनि सर्वहि महिमा अद्भूत । म्हणती सद्गुरूलीला न कळे श्रुतिअंत । सर्वहि स्तविती ध्याती श्रीपदि निश्र्चिती । वाहुनि शरण रिघत गुरूपदि गुरूभक्त ।। जय. ।। ३ ।।

**स्तोत्र**

वेदान्तवेद्यो वरयोगिरूपं । जगत्प्रकाशं सुरलोकपूज्यं । इष्टार्थसिध्दिं करूणाकरेशं । श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ।।१ ।। योगीशरूपं परमात्मवेषं । सदानुरांग सहकार्यरूपं । वरप्रसादं विबुधैकसेव्यं । श्रीपाद. ।। २ ।। काषायवस्त्रं करदंडधारिणं । कमंडलुं पद्करेण शंखं । चक्रं गदाभूषित भूषणाढयं ।। श्रीपाद. ।। ३ ।। भूलोकसारं भुवनैकनाथं । नाथादिनाथं नरलोकनाथं । कृष्णावतारं करूणाकटाक्षं । श्रीपाद. ।। ४ ।। लोकाभिराम गुणभूषणाढयं । तेजोमुनिश्रेष्ठमुनिर्वरेण्यं । समस्तदु:खानि भयानि शान्तिः । श्रीपाद. ।।५ ।। कृष्णासुतीरे वसति प्रसिध्दं । श्रीपा श्रीवल्लभ योगिमूर्ति । सर्वेजनाश्रिचंतित कल्पवृक्षं ।। श्रीपाद. ।।६ ।। मंत्राब्धिराजं यतिराज्यपूज्यं । त्रैलोक्यनाथं जनसेव्यनाथं । आनंदचित्तं अखिलात्मतेजं ।। श्रीपाद. ।। ७।। मंत्रानुगम्यं महनिर्मितेजं महत्प्रकाशं महशान्तिमूर्ति । त्र्यैलोक्यचितं अखिलात्मतेजं ।। श्रीपाद. ।। ८ ।। श्रीपादाष्टकमिदं पुण्यं प्रातरूत्थाय यः पठेत् कोटिन्मकृतं पापं स्मरेणन विनश्यति ।। ९ ।।

★★★



। श्रीगुरूः शरणम् ।

# श्रीमत् प. प. श्रीनारायणस्वामीकृत भजनावलि

# अनुक्रम


| | |
|---|---|
| १) | मंगलाचरणम् |
| २) | आदौपंचदशदैवतस्मरणम् |
| ३) | शंभोमहादेव भजनम् |
| ४) | गंगाभजनम् |
| ५) | संतभजनम् |
| ६) | श्रीदत्तभजनम् |
| ७) | विष्णुभजनम् |
| ८) | दत्तभजनम् |
| ९) | श्रीरामभजनद्वयम् |
| १०) | विठ्ठलभजनम् |
| ११) | सांबभजनम् |
| १२) | अन्नपूर्णाभजनम् |
| १३) | श्रीनारायणभजनम् |
| १४) | श्रीदत्तभजनम् |


## श्रीमत् प. प. श्रीनारायणस्वामीकृत
## भजनावलि

टीप : ज्याठिकाणी ३ असा अंक घातला आहे त्याठिकाणी ३ वेळां म्हणावे.

### १ मंगलाचरणम्

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यै नमः । गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरः । गुरूः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।

## २ पंचदशदैवतस्मरणम्

ॐ नमो ब्रह्मादिभ्यो ब्रह्मविद्यासंप्रदायकर्तृभ्यो नमो महद्भ्यो नमो गुरूभ्यः सर्वोपल्पवरहितः प्रज्ञानघनः प्रत्यगर्थो ब्रह्मैवाहममिस्म ॐ तत्सत् ।

ॐ काषायवस्त्रं करदंडधारिणं कमण्डलुं पद्मकरेण शंखम् । चक्रं गदा भूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये । उदुंबरः कल्पवृक्षः संगमः कामधेनवः । चिंतामणिगुरोः पादौ दुर्लभौ भुवनत्रये ।

कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनन्दनः । द्वापरे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः ।

शिवहर शंकर गौरीशा शिवशांतदयापर विश्वेशा ३ श्रीगजानन ३ श्रीषडानन ३ श्रीनंदिनेनमः ३ श्रीजगदंब उदयोस्तु श्रीभगवति ३ श्रीपांडुरंग ३ श्रीमहाकाली ३ श्रीमहालक्ष्मी ३ श्रीमहासरस्वती ३ श्रीएकवीरा ३ श्रीपद्मावती ३ श्रीकात्यायनी ३ श्रीरंकभैरव ३ श्रीमहर्नलेश्वर ३ श्रीसर्वेश्वर ३ श्रीगणपते ३

## ३ शंभो महादेव भजनम्

शंभो महादेव शंभो महादेव शंभो महादेव शंभो ।

१ सांबप्रभो शं.
२ गौरौप्रभो शं.
३ गंगाप्रभो शं.
४ सोमप्रभो शं.
५ कृतिप्रभो शं.
६ नागप्रभो शं.
७ भूतिप्रभो शं.
८ भूतप्रभो शं.
९ वेदप्रभो शं.
१० देवप्रभो शं.
११ विद्याप्रभो शं.
१२ लोकप्रभो शं.
१३ प्रथमप्रभो शं.
१४ चंडप्रभो शं.
१५ नंदिप्रभो शं.
१६ भृंगिप्रभो शं.
१७ रिटिप्रभो शं.
१८ भ्रांतिप्रभो शं.
१९ स्वामिप्रभो शं.
२० गणप्रभो शं.
२१ ब्रह्मप्रभो शं.
२२ विष्णुप्रभो शं.
२६ प्रेमप्रभो शं.
२७ त्यागप्रभो शं.
२८ योगप्रभो शं.
२९ बोधप्रभो शं.
३० मुक्तिप्रभो शं.
३१ गंगाधरा शं.
३२ गौरीवर शं.
३३ सत्याधरा शं.
३४ शशिशेखरा शं.
३५ कृतीश्र्वरा शं.
३६ नागेश्र्वरा शं.
३७ श्रृतीश्र्वरा शं.
३८ भूतेश्र्वरा शं.
३९ वेदेश्र्वरा शं.
४० देवेश्र्वरा शं.
४१ विश्र्वेश्र्वरा शं.
४२ लोकेश्र्वरा शं.
४३ सर्वेश्र्वरा शं.
४४ मृत्युंजया.
४५ मायाजया.
४६ करूणामया.
४७ दत्ताभया.

२३ रूद्रप्रभो शं.
२४ सर्वप्रभो शं.
२५ भक्तिप्रभो शं.
५१ सौख्याद्वया
५३ सांबप्रभो शं. म.

४८ ध्व.
४९ सत्याद्वया शं.
५० बोधद्विया शं.
५२ स्वात्माद्वया शं.
शं. म. शं. म.

शिवहर शंकर गौरीशा शिवशांतदयावर विश्र्वेशा हरिनारायण ३

**४ गंगा भजनम्**

गंगा गंगा गंगा हरिगुरूगंगे शिवगुरू गंगे जयजयगंगे पतितपावनि १

२ जय गंगे भवभयहा.
३ " स्वकल्लोलिनी
४ " विघ्नविनाशिनी
५ " भ्रांतिनाशिनी
६ " संशयनाशिनी
७ " भेदविनाशिनी
८ " त्रिगुणविनाशिनी
९ " मायानाशिनी
१० " भक्तिदायिनी
११ " प्रेमदायिनी
१२ " विरक्तीपायिनी
१३ " ज्ञानदायिनी
१४ " बोधकारिणी
१५ " चित्कल्लोलिनी
१६ " अखंडरूपधारिणी
१७ " परमानंदरूपिणी
१८ " ब्रह्मरूपिणी
१९ " विष्णुरूपिणी
२० " रूद्ररूपिणी
२१ " शिवरूपिणी
२२ " श्रीगुरूरूपिणी
४४ ज. गं. ब्रह्मद्रवे

२३ ज. गं. जगदाकारिणी
२४ " अनाकारिणी
२५ " सरित्वेषधारिणी
२६ " त्रिपथगामिनी
२७ " शिवमौलिचारिणी
२८ " शिवविलासिनी
२९ " परशिवमोहिनी
३० " ब्रह्मांडभेदिनी
३१ " भगवत्पदिनी
३२ " ब्रह्मांडधारिणी
३३ " दुरितहारिणी
३४ " ज्योतिर्मयी
३५ " लीलाविग्रहधारिणी
३६ " प्रसन्नमुखि
३७ " चंद्रधारिणी
३८ " कुंतधारिणी
३९ " पद्मधारिणी
४० " अभयकरिणी
४१ " सद्वरदायिनी
४२ " मकरवाहिनी
४३ " दयार्द्रहृदये
४४ ज. गं. पतितपावनि

## ५ संतभजनम्

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, एकनाथ नामदेव तुकाराम ।
आवडिनी ही नामे गाती, ते नर पावती मंगलधाम ।।
दास जनार्दन प्रल्हाद हैंहय, अलर्क यदुवर भक्त बरे ।
आवडिनी ही नामे गाती, ते नर होती दास खरे ।।
सनक सनंदन सुलभा गार्गि, सनातन श्रीसनत्कुमार ।
वामदेवशुकरैवतकात्री, मैत्रेयी अनुसूयासार ।।
नारद व्यास प्रबलार्हण, हे भक्त हरिचे आवडते ।
आवडिनी ही नामे गाती, ते नर होती आवडते ।।
नारद कुमुद जय विजय, हे भक्त हरीचे आवडते ।
आवडिनी ही नामे गाती, ते नर होती आवडते ।।
नारद कुमुद विष्वक्सेन, हे भक्त हरीचे आवडते ।
आवडिनी ही नामे गाती, ते नर होती आवडते ।।

हरि दत्तात्रय गुरू दत्तात्रय, हरिगुरूगंगे शिवगुरुगंगे, शिवान्नापूर्णे जयान्नपूर्णे, जयविश्वेश काशीनाथ जय विघ्नेश मंगलमूर्ते.

## ६ श्रीदत्तभजनम्

दत्तगुरू शिव अवधूता दत्तदयालो शिव. दत्तगुरो दत्तगुरो दत्तात्रेयगुरो

| | |
|---|---|
| १ सिध्दनाथ महानाथ ब्रह्मरूप सद्‌गुरो | दत्त. ३ |
| २ आदिनाथ दीनानाथ ब्रह्मरूप सद्‌गुरो | दत्त. ३ |
| ३ दिगंबर जटाधर ब्रह्मरूप स. | दत्त. ३ |
| ४ अनुसूयागर्भरत्न ब्रह्मरूप स. | दत्त. ३ |
| ५ महायोगी महासिध्द ब्रह्मरूप स. | दत्त. ३ |
| ६ अनुसूयासूत ब्रह्मरूप स. | ७ बोधानंदश्रींगुरो. दत्त. |
| ८ कृपासिंधू श्री दत्त. | २८ क्रोधनाश श्री दत्त. |
| ९ दीनबंधू श्री दत्त. | २९ लोभनाश श्री दत्त. |
| १० श्रीप्रभो श्री दत्त. | ३० मोहनाश श्री दत्त. |
| ११ श्रीविभो श्री दत्त. | ३१ मदहारी श्री दत्त. |
| १२ गुरूणां श्रीगुरो दत्त. | ३२ मत्सरारी श्री दत्त. |
| १३ ब्रह्मविद्या श्री दत्त. | ३३ विघ्नांतक श्री दत्त. |
| १४ कार्तवीर्य श्री दत्त. | ३४ भेदांतक श्री दत्त. |
| १५ यदूलर्क श्री दत्त. | ३५ गुणांतक श्री दत्त. |
| १६ देवदेव श्री दत्त. | ३६ अजांतक श्री दत्त. |
| १७ आदिदेव श्री दत्त. | ३७ भक्तिद श्री दत्त. |
| १८ महादेव श्री दत्त. | ३८ प्रेमद श्री दत्त. |
| १९ सिध्ददेव श्री दत्त. | ३९ विरक्तिद श्री. |

२० महासिध्द श्री. दत्त.
२१ योगिदेव श्री. दत्त.
२२ महायोगी श्री. दत्त.
२३ मुनिवंद्य श्री. दत्त.
२४ महामुनिवंद्य श्री. दत्त.
२५ ऋषिवंद्य श्री. दत्त.
२६ महर्षे श्री. दत्त.
२७ कामनाश श्री. दत्त.
४० ज्ञानद श्री. दत्त.
४१ बोधद श्री. दत्त.
४२ मुक्तिद श्री. दत्त.
४३ निरंजन श्री. दत्त.
४४ निरंजन श्री. दत्त.
४५ स्वप्रकाश श्री. दत्त.
४६ स्वात्मरूप श्री. दत्त.
४७ दत्तगुरो दत्तगुरो.

गुरूपरब्रह्मगुरूदेव देवगुरूपरब्रह्मसत् गुरूदेवदेव श्रीगुरूदेवा सद्‌गुरूदेवा करूणामूर्ते हरिगुरूदेवा दत्तदिगंबरदत्तदयालो दत्तदिगंबरदत्तदयालो.

### ७ अथ विष्णूभजनम्

१ जयजय लक्ष्मीविलास
२ जय. वैकुंठपीठास्पदचरणा
३ जयजय शंखचक्रधर
४ जयजय पद्मदेबिभ्राणा
५ जयजय पीतांबरधर
६ जयजय सकलभक्तसमर्पितवनमालाधारणा
७ जयजयाऽ नादिनिधनंजया
८ जयजया नारायणा

### ८ श्रीदत्त भजनम्

९ जयजयाऽत्रिमहर्षितपोमुदितांतःकरणा
१० जयजय परमप्रसन्ना
११ जयजयाऽत्रितनयभावमपन्ना
१२ जयजयालीलोत्धृतानप्रसन्ना
१३ जयजयाऽनवरतमेधमानाऽनसूयानंदवल्लीकंदा
१४ जयजय परमानंद गोविंदा
१५ जयजय सह्याचलनिवासा
१६ जयजयऽनसूयानंदवर्धना
१७ जयजय भक्तिप्रेमसुखसंवर्धना
१८ जयजय महाज्ञानप्रदा
१९ जयजय महाभयनिवारणा
२० जयजय गंगादिसकलतीर्थपावनचरणा
२१ जयजय शरणाऽगत संत्राणपरायणा
२२ जयजय उपनिषद्‌परमपुरूषा
२४ जयजय लीलाऽवधूतवेषा
२५ जयजय निजचरणसरोज संभावना
२६ जयजय निरसिताऽखिलकलिदोषा
२७ जयजय सुप्रेमसमुच्चरिता
२८ जयजय निजनामकुरंबसंभूषा
२९ जयजय सकलवासनावनप्रलयाऽनला
३० जयजय निजजनहृदयसरसिरूहमराला
३१ जयजय महालकाला
३२ जयजयात्रि गुणविनाशन करवाला
३३ जयजया ऽ नुसूयाबाला
३४ जयजया ऽ विद्याध्वांतशतचंडमार्तंडा
३५ जयजया ऽ विद्याध्वांतशतचंडमार्तंडा
३६ जयजय स्वेच्छाकल्पिता ऽ नेकब्रह्मांडा
३७ जयजय सकलभक्तजनमनःकरंडा
३८ जयजय तनकसनंदन सनत्‌कुमारप्रमुखमहामुनिवरपरिवृता
३९ जयजय सकलजगदुत्पत्तिस्थितिलयकारणमहामायाऽनावृता
४० जयजयऽघटितघटनापटो नमस्ते नमस्ते चिरंभूयात् हरये नमो, गुरवे नमो, हरये नमो, गुरवे नमः

**९ श्रीदत्त भजनम्**

जयजय रामा मेघःश्यामा । सीतारामा निजसुखधामा । हरेरामा मेघःश्यामा, सीतारामा निजसुखधामा ।।

१ कौसल्यासुत मेघ. सी. नि. ह. मे. सी
२ दशरथतनया ”
३ रत्नकुंडला ”
४ लोलकुंडला ”
५ सुंदरश्रुतियुग ”
६ कुटिलकुंतला ”
७ रत्नकिरीटा ”
८ सुंदरमाला ”
९ पद्मनिभेक्षण ”
१० ऋजुतरनासिक ”
११ भास्वकत्तपोल ”
१२ अरूणरदच्छद ”
१३ विद्युद्रदना ”
१४ चारूचुबुका ”
१५ चंद्रवदना ”
१६ कृपावीक्षणा ”

१७ स्मेरमुखांबुज मेघ. सी. नि. ह. मे. सी.
१८ निर्जितकामा ”
१९ चटुलभाषणा ”
२० सीतामोहन ”
२१ कंबकुंठा ”
२२ कौस्तुभभूषणा ”
२३ रत्नालंकृत ”
२४ मुक्ताभूषित ”
२५ स्वर्णालंकृत ”
२६ मुक्ताभालिन ”
२७ नवरत्नांचित ”
२८ नवरत्नांचित ”
२९ चारूदरा ”
३० पद्मनाभा ”
३१ सुंदरपाणे ”
३२ दीर्घबाहो ”

३३ रत्नांगुलियक मेघ. सी. नि. ह. मे.सी.
३४ रत्नंकंकणा ”
३५ रत्नांऽगदधर ”
३६ केयूरांचित ”
३७ रत्नमेखला ”
३८ तडिदंबरधर ”
३९ क्वणवनूपुरा ”
४० कोमलाचरणा ”
४१ सुंदरगते ”
४२ दिव्योपवीत ”
४३ दिव्योपवीत ”
४४ मुक्तोत्तंसा ”
४५ श्रीतुलसीमालिन ”
४६ श्रीपद्ममलिन ”
४७ श्रीतुलसीमालिन ”
४८ धनुर्बाणधर ”
४९ अक्षयतूणा ”
५० सुँदरवरा ”
५१ सीतावामा ”

५९ कृतठंकारा मेघ. सी. नि. ह. मे. सी.
६० कृतक्रेकारा ”
६१ राक्षसांतका ”
६२ योजितबाणा ”
६३ विकटभृकुटे ”
६४ रावणमर्दन ”
६५ बंधविमोचन ”
६६ देवदुंदुभे ”
६७ सुरवरसंवृत ”
६८ सुरवरसंवृत ”
६९ असुरस्थापक ”
७० पुष्यकरूढा ”
७१ अयोध्याभिमुख ”
७२ भरतवंदिता ”
७३ शरयुवासा ”
७४ साकेताधिपते ”
७५ शत्रुध्या ऽ र्चित ”
७६ लोकवंदिता ”
७७ पट्टाभिषिक्त ”

५२ लक्ष्मणदक्षिणा ”
५३ पुरोहनूमन् ”
५४ कपिकुलवंद्या ”
५५ गंभीरध्वनि ”
५६ रणगंभीरा ”
५७ वीरगंभीरा ”
५८ करकोददा ”
८५ पूर्णरामा मेघ. सी. नि.
ह. मे. सी.
८६ अद्वयरामा ”
८७ नित्यानिरंजन ”
८८ अखंडैकरस ”
७८ सुरविराजित ”
७९ लोकमंगला ”
८० धर्मस्थापक ”
८१ प्रकाशमूर्ते ”
८२ लीलाविग्रह ”
८३ अखंडरामा ”
८४ नित्यरामा ”
८९ निरवधिरामा मेघ. सी. नि.
ह. मे. सी.
९० जयजयरामा ”
९१ अधर्मशिक्षक ”

**श्रीहनुमान् हनुमान् हनुमान्**

श्रीराम राम राम राम राम
श्रीदत्त गोविंदा रामहरे गोपाळा रामहरे
रामकरी मज रामहरे, रामकरी मज रामहरे

१ सोडवि मजला रामह. राम. क. म. रा.
२ येथुनि काढी मजला राम.
३ चरणी ठेवी मजला राम.
४ आपुले मज करी राम.
५ मीपण नेई राम.
६ धनुर्बाणधरसीतावल्लभ करी धरी मज राम.
७ सोडू नको मजला राम.
८ विघ्न निवारी राम.
९ भेद निवारी राम.
१० भ्रांति निवारी राम.
१२ भजन चालवि राम.
१३ योग वाढवि राम.
१४ निस्पृह मज करी राम.
१५ निरह मज करी राम.
१६ निर्मम मज करी राम.
१७ सेवकवर्गामाजि दयाधन स्वीकारी मजला राम.
१८ सकलहि दृश्यतिविवर्जुनि मजला निजपदि
नांदवि रा.
१९ सत्त्वर नांदवि रामहरे.
२० अखंड नांदवि रामहरे.
२१ रामकरी मज रामहरे रामकरी मज रामहरे

**१० अथ विठ्ठल भजनम्**

१ जयविठ्ठल श्रीरूक्मिणीशा
२ जयपांडुरंगहरी यादवेशा
३ जयविठ्ठल श्रीमत् भीमातटसंचारा
४ जयविठ्ठल श्रीमतच त्रिभंगीलीलावतारा
५ जयविठ्ठल श्रीमत् वृंदावन विहारा
६ जयविठ्ठल श्रीमत् हरिद्वारकेशा
७ जयविठ्ठल श्रीमत् मुरलीवादनचतुरा
८ जयविठ्ठल श्रीमत् स्वप्रभाव
पटलव्याप्ताऽखिलचराऽचरा जयदत्तागुरूगोविंदा
दत्तात्रेया परमानंदा

९ जयविठ्ठल श्रीमत् गोलोकधामसंचारा
१० जयविठ्ठल श्रीमत् राधारूक्मिणीवरा
११ जयविठ्ठल श्रीमत् नित्यनिरंजन निर्विकारा
१२ जयविठ्ठल ब्रह्मसनातन साकारा
१३ जयविठ्ठल श्रीमत् पूर्णब्रह्मवतारा.

## ११ अथ सांबभजन

सांब सदाशिव सांबहरे शिवसांब सदाशिव सांबहरे

१ विभोहर शिव.सां.शि.सां.
२ गुरोमृड शिव.
३ देवदेव शिव.
४ आदिदेव शिव.
५ महादेव शिव.
६ मृत्युंजय शिव.
७ व्योमकेश शिव.
८ कालकाल शिव.
९ त्रिपुरांतक शिव.
१० मूलविग्रहा शिव.
११ त्रिमूर्तिरूपा शिव.
१२ प्रणवातीता शिव.
१३ प्रकृतिविवर्जि शिव.
१४ नित्यानंदा शिव.
१५ निर्वधिरूपा शिव.
१६ लीलाविग्रह शिव.
१७ कैलासाधिप शिव.
१८ गौरीवल्लभ शिव.
१९ प्रथमनिषेवित
२० चंद्रशेखरा शिव.
२१ जटाजूटधरा शिव.
२२ गंगाधरा शिव.
२३ त्रिपुंड्रमाला शिव.
२४ सुंदरभृगुटी शिव.
२५ पावकलोचन.
२६ रविशशिनयना. .
२७ सोमनासिका.
२८ सोमकपोला
२९ नागकुंडला शिव.
३० सुंदरोष्ठ शिव.
३१ विद्युद्रदना शिव.
३२ चारूचुबुका शिव.
३३ कालकोटिनिभ.
३४ चंद्रकौरनिभ.
३५ भानुकोटीनिभ.
३६ तेजोराशे शिव.
३७ लावण्याब्धे शिव.
३८ कारूण्याब्धे शिव.
३९ कृपावलोकन.
४० मंदास्मितमुख.
४१ मधुरभाषणा.
४२ गौरीमोहन शिव.
४३ अघटितघटकां
४४ कालकूटहरसां
४५ नीलकंठ शिव.
४६ भूतिभूषणा.
४७ शुभ्रविग्रहा.
४८ पंचवक्त्र शिव.
४९ दशभुज सां.
५० पंचदशाक्षा.
५१ सुंदरपाणे शि.
५२ नागविनिर्मितकराऽगुलीयक
५३ नागलयकर शिव.
५४ नागांदधर सुबाहुदशका सां
५५ केयूरांचित शिव.
५६ नारायुधधर शिव.
५७ शेषभूषणा शिव.
५८ नागहारधर.
५९ बिल्वहारधर.
६० कपालमालिन शि.
६१ विश्र्वोदरा शि.
६२ पद्मनाभा शि.
६३ गौरीभूषणा.
६४ गौरीरूपा.
६५ रत्नकिंकिणीजलकटेहरे शि.
६६ तडिदंबरधर.
६७ नागविभूषितपादांबुजयुग.
६८ अरूणपादतल.
६९ सुंदरपार्ष्णे.
७० ज्योतिर्नखा.
७१ सुंदरचरणा.
७२ सुंदरगते शि.
७३ कुमारजनका.
७४ गजमुखताता.
७५ चंडसेविता.
७६ नंदिसेविता.
७७ भृंगिपूजिता.
७८ ऋटिशपूजिता.
७९ सुरवर संवृत.
८० देवसार्वभौमा शि.
८१ तेजोराशे शिव.
८२ ब्रह्मसातन शि.
८३ त्रयीवेद्य शिव.
८४ गौरीपूजित.
८५ विधिहरिपूजित.
८६ लोकगुरो शि.
८७ तत्त्वगुरो शि.
८८ तत्त्वरूपा शि.
८९ विद्याधिप शिव.
९० मुदितांतरा शि.
९१ प्रदोषनघटना शि.
९२ सुरवरसंवृत शि.
९३ देवसुंदर शि.
९४ नटवरसुंदर शि.
९५ नृत्यच्चरणा शि.
९६ डमरूपाणि शि.
९७ डमरूवादना.
९८ सुंदरतांडव शि.
९९ तांडवपंडित शि.सदा.
१०० निजसुखमूर्ते शि.
१०१ गौरीमोहन शि.
१०२ विष्णुमोहन शि.
१०३ विश्र्वमोहन शि.
१०४ मौहविनाशक.
१०५ ढक्कावादना शि.
१०६ नाधबोधदना शि.
१०७ शुध्दबुध्द शि.
१०८ नित्यमुक्त शि.
१०९ निरालंब शि.
११० निष्प्रपंच शि.
१११ भेदाविवर्जिता
११२ नित्यनिरंजन शि.
११३ अखंडैकरस शि.
११४ निर्वधिरूपा शि.
११५ परमानंदा शि.
११६ ज्ञप्तिमात्र शि.
११७ विभोहर शि.
११८ सांबसदाशिव शि.

## १२ अथ अन्नपूर्णाभजनम्

जय अन्नपूर्णे शिवान्नपूर्णे शिवान्नपूर्णे तारकचरणे करूणापर्णे जयान्नपूर्णे शिवान्नपूर्णे. करूणापूर्णे शि.

१ दिव्याभरणे ज.
२ हैमवसने जया.
३ विद्युद्वसने जया.
४ चंद्रभूषणे जया.
५ कोटितरणे ज.
६ वेदवरेण्ये ज.
७ देवरेण्ये जय.
८ मौलितनये जय.
९ कृपावीक्षणे जय.
१० सस्मितव जय.
११ मधुरभाषणे ज.
१२ भक्तोध्दरणे ज.
१३ भक्तशरणे
१४ मायाहरण्ये ज.
१५ भेदहरणे ज.
१६ भक्तिवर्धने ज.
१७ प्रेमवर्धने ज.
१८ विरक्तिवर्धने.
१९ बोधभरणे ज.
२० अघटितकरणे.
२१ हृतजनिमरणे.
२२ ब्रह्मवरेण्ये.
२३ विष्णुवरेण्ये.
२४ रूद्रवरेण्ये.
२५ शंभुभूषणे जयान्नपूर्णे
२६ सर्ववरेण्ये जयान्न.
२७ सर्वशरण्ये जयान्नपूर्णे.
२८ शिवान्नपूर्णे तारकच.जया.

## १३ अथ नारायणभजनप्रारंभः

हरिनारायाण १ गुरूतारायण ३
गुरूनारायण ३ हरिनारायण ३
शुकनारायण २ सत्यवतीसुत शु. ३

१ लक्ष्मीनारायण जननारायण
२ वैकुंठाधिप ह. ना.
३ लक्ष्मीवल्लभ ह.
४ क्षीराब्धिशयना.
५ लक्ष्मीसेवित.
६ शेषशयना ह.
७ प्रकाशमूर्ते ह.
८ नीरशयना ह.
९ निरजननाभा
१० अजांडजनका.
११ अजांडधारका.
१२ अजांडपोषका.
१३ मूलविग्रहा.
१४ त्रैमूर्तिरूपा.
१५ प्रणवातीता.
१६ प्रकृतिविवर्जित.
१७ नित्यानंदा.
१८ लिलाविग्रह.
१९ वैकुंठाधिप.
२० लक्ष्मीसमेत.
२१ दिव्यविग्रहा.
२२ दिव्यालंकृत.
२३ तेजोराशे ह.
२४ ब्रह्मसनातन.

२५ नंदसेवित.
२६ सुनंदसेवित.
२७ प्रबलसेवित.
२८ अर्हणसेवित.
२९ सुरवृरसंत ह.
३० देववरेण्या हरिनारायण गुरू.
३१ सुररत्नकुंडला "
३२ सुंदरश्रुतियुग "
३३ कुटिलकुंतला "
३४ सुररत्नकिरिटा "
३५ विशालभाल "
३६ मृगमदतिलका "
३७ विकटभृकुटीह "
३८ पुष्करनयना "
३९ ऋजुतुरनासिक "
४० प्रकाशकपोल "
४१ अरूणरदच्छद "
४२ विद्युत्त्रदना "
४३ चारूचुबुका "
४४ कामकोटिनिभ "
४५ चंद्रकोटिनिभ "
४६ भानुकोटिनिभ "
४७ तेजोराशे "
४८ लावण्याब्धे "
४९ कारूण्याब्धे "
५० कृपाविलोकन "
५१ स्मेरमुखांबुज "
५२ मंजुलभाषणा हरि. गुरू.
५३लक्ष्मीमोहन "
५४ शंभुमोहन "
५५ कंबुकंठा "
५६ कौस्तुभभूषणा "
५७ रत्नालंकृत "
५८ मुक्ताभूषित "
५९ स्वर्णालंकृत "
६० मुक्तामालिन "
६१ द्रव्यविवर्जित "
६२ नवरत्नांकित "
६३ विश्वोदरा "
६४ पद्मनाभा "

६५ श्रीवत्सांकित "
६६ भृगुपदलांछित "
६७ सुंदरपाणे "
६८ दीर्घबाहो "
६९ रत्नांगुलीयक "
७० रत्नवलयकर "
७१ रत्नांगदधर सुबाहु दशका
केयूरांचित हरि. नारा.
७२ शंखचक्रधर हरि. गुरू.
७३ गदापद्मधर "
७४ रक्तकिंकिणीजालसुदामन
तडित्कोटिनिभ पितांबरधर
गु. ह.
७५ सुमुखरनूपुराजित हरि. गुरू.
७६ अरूणरदच्छद हरि. गुरू.
७७ उद्यत्दिनकर "
७८ सुंदरपार्ष्णे "
७९ नखमणिनिर्जित "
८० चंद्रमंडला "
८१ सुंदरचरणा "
८२ सुंदरगते "
८३ दिव्योपवीत "
८४ दिव्योपवीत "
८५ मुक्तोत्तंसा "
८६ श्रीवनमालिन "
८७ हैमकजावलिमालागला"
८८ श्रीतुलसीमालिन "
८९ निगमनिगता "
९० वेदराशे "
९१ ब्रह्मसनातन "
९२ लक्ष्मीपूजित "
९३ विधिहरिपूजित "
९४ मुक्तातपत्र "
९५ चामरविवर्जित "
९६ कूर्चविवर्जित "
९७ व्यजनविवर्जित "
९८ देववरेण्या हरि. नारा."
९९ प्रसन्नमूर्ते "
१०० कीर्तनोत्सुका "
१०१ लक्ष्मीसमेत "

१०२ गरूडावाहना "
१०३ शीघ्रगमना हरि. गुरू.
१०४ कीर्तननटना "
१०५ शामलसुंदरा "
१०६ भ्रमितगदाधर "
१०७ विघ्नविनाशन "
१०८ भ्रांतिविनाशन
१०९ संशयविनाशन "
११० भेदाविखंडन "
१११ त्रिगुणविनाशन "
११२ मायानाशन "
११३ पूर्णभक्तिदा "
११४ पूर्णप्रेमदा "
११५ पूर्णविरक्तिदा "
११६ विज्ञानप्रदा "
११७ अघटितघटका "
११८ जगदाधारा "
११९ जगत्कारणा "
१२० जगत्पालका "
१२१ जगत्व्यापका "
१२२ ओतप्रोता "
१२३ निरवधिरूपा "
१२४ परमानंदा "
१२५ लीलाविग्रह "
१२६ पावनवामन "
१२७ पावनचरिता "
१२८ पावनकथन "
१२९ भक्तपावना "
१३० पावनमंगला हरि. गुरू.
१३१ पावनपावन "
१३२ मंगलचरणा "
१३३ मंगलगते "
१३४ मंगलपाणे "
१३५ मंगलवक्त्रा "
१३६ मंगलेक्षणा "
१३७ मंगलवचना "
१३८ भक्तमंगला "
१३९ मंगलमंगला "
१४० ब्रह्ममंगला हरि. गुरू.
१४१ भक्तपुरोगा "

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४२ भक्तानुगा | ” | १४३ भक्तसहचरा | ” | १४४ भक्तरक्षणा | ” |
| १४५ भक्तवत्सला | ” | १४६ भवभयहरणा | ” | १४७ उदारवरा | ” |
| १४८ निजपददायक | ” | १४९ ब्रह्मसनातन | ” | | |

**१४ अथ दत्तभजनम्**

| | | | |
|---|---|---|---|
| १ हरिदत्तात्रेय गुरूदत्तात्रेय | | १२ लोभविनाशन हरि गुरू. | |
| २ अनुसूयासूत हरि. गुरू. | | १३ मोहविनाशन | ” |
| ३ मूलविग्रहा | ” | १४ मदविनाशन | ” |
| ४ त्रैमूर्तिरूपा | ” | १५ मत्सरनाशन | ” |
| ५ प्रणवातीता | ” | १६ दंभविनाशन | ” |
| ६ प्रकृतिविवर्जित | ” | १७ दर्पविनाशन | ” |
| ७ नित्यानंदा | ” | १८ ममताऽहंता | ” |
| ८ निरवधिरूपा | ” | १९ क्रोधविनाशन | ” |
| ९ लीलाविग्रह | ” | २० परूषभावना | ” |
| १०क्रोधविनाशन | ” | २१ तमोविनाशन | ” |

दशावतारस्मरणपूर्वक अवतारस्मरणम्

| | | | |
|---|---|---|---|
| २२ मच्छावतारा हरि. गुरू. | | २५ नरहरिरूपा हरि. गुरू. | |
| २३ कच्छावतारा | ” | २६ वामनरूपा | ” |
| २४ क्रोडावतारा | ” | २७ भार्गवरामा | ” |
| २८ दशरथनंदन हरि. गुरू. | | ३४ एकानेका हरि. गुरू. | |
| २९ हलधररूपा | ” | ३५ जगदाकारा | ” |
| ३० कंसनिकृंतन | ” | ३६ निराकारा | ” |
| ३१ बुध्दावतारा | ” | ३७ नित्यनिरंजन | ” |
| ३२ हयवरवदना | ” | ३८ शुध्दानंदाहरि | ” |
| ३३ नानावतारा | ” | ३९ ब्रह्मानंद | ” |

अच्युतानंत नारायण जगन्नाथ जगन्नाथ गोविंद वासुदेव जनार्दन ।

**श्रीगुरूदेवदत्त**

त्रिगुणात्मकत्रैमूर्ति दत्त हा जाणा । त्रिभुवनी आधार त्रैलोक्यराणा ।। नेति नेति शब्दा नये अनुमान । सुरवर मुनिजन योगी समाधि निजध्यान ।। जयदेव जयदेव जयसद्गुरू दत्ता । आरती ओवाळिता हरसि भवचिंता ।। १ ।। सबाह्याभ्यंतरी तू एक दत्त । अभाग्यासि कैची न कळे ही मात । पराही परतली कैचा हा हेत । जन्ममरणाचा पुरलासे अंत ।। जय. ।। २ ।। दत्त दत्त ऐसे लागलें ध्यान । हरपलें मन जाहलें उन्मन ।। मी तूं पणासी जाहली ओसण । एकाजनार्दनी श्रीदत्तध्यान ।। जयदेव. ।। ३ ।।

वासना वसन फाडी, भेद जानवे तोडी । मुंडोनी कर्मकेशा, भेद निःशेष सांडी ।। तो परमहंस आम्ही, आजि देखिला माये । आरति करूनि भावे । शिरी वंदिले पाय ।।

तो परमहंस आम्ही, करुनि वृत्ति रक्षा, गिळी सर्व अपेक्षा, मंत्र ना यंत्र नेणे, शुध्द अवधूतदीक्षा तो परमहंस ।। १ ।।

व्रतें तपें तीर्थे जया पायी मिरविली । संतमुनिवृंदे या सुखासि लाधली । ऐसिया पाया लागी आरती आरती करु । कायावाचामनें चरण दृढ धरू ।। २ ।।

सर्वदा सर्व साक्ष नेणे बंध ना मोक्ष तो परमहंस आम्ही प्रणवतात आम्हां तो केशवस्वामी तो परमहंस ।। ३ ।।

सुरासुर नमोनी उभे कर जोडोनि प्रल्हाद नारद अखंड जयाचे ध्यानी ऐसिया पाया लागी आरती आरती ।। ४ ।।

एकाएकी विनटला जनार्दनपायी, आरती ओवाळिता विधिवाद तो नाही । ऐसिया पायालागी आरती आरती ।। ५ ।।

आरती आरती ओवाळू जाता, आरतीने हरणदत्त केले तत्वता । खुंटली आरती आता ओवाळू कैसे, निज भजनातळी ओवाळितसे । ऐसिया पायालागी आरती आरती ।। आरतिचे आरत पुरविले श्रीदत्त । एका जनार्दनी सहज ओवाळितसे ऐसिया पायालागी आरती आरती ।।

**आरती नारायणस्वामींची**

( टीप :- भक्तांनी भजन झाल्यावर म्हणावयाची आरती )

कलियुगी नरदेह धरूनि अवतार । दंडकमंडलू विलसित कौपीनसुंदर । सर्वांगी रूद्राक्षभरण शोभे त्रिपुंड्र । सिंहासनी रूढ होऊनी तारी मुनिवर । जयदेव जयदेव नारायणमूर्ति । निगमाऽगमा वदति अपार तव कीर्ति ।। १ ।।

काशी प्रयाग कृष्णा स्नान त्रिकाळी । करसी योगिराया वदति ऋषि सकळी ।। श्रीक्षेत्री करसि वनमाळी । संकटि स्मरता भजतां पावसि तात्काळी ।। जयदेव. ।। २ ।।

त्रिभुवन शोधुनि सुस्थळ कृष्णातटि वससि । कल्पवृक्ष भेटी जाहली श्रीगुरूसि ।। ते सुख न वर्णवे सुरवर सनकासी । नारद तुंबर श्रमले वदता कीर्तीसी ।। जयदेव. ।। ३ ।।

आज्ञा घेऊनि सहज तीर्थाटन करिसि । मार्गी उदक नसता गंगा आली ख्याती ।। स्नान करुनी निगतां गुप्त भगिर्थी । वैजनाथी विप्र सर्पविष हरसि ।। जयदेव. ।। ४ ।।

अनेक ख्याती केली न कळे महिमान । मधु इंदु अमावास्या पुष्पकि बैसुन । आज्ञा घेऊन दासा गमति वैकुंठभुवन, तारि तारि गुरुभक्त आला तव शरण ।। जयदेव. ।। ५ ।।

वेदशास्त्रवसुभूशाके माघस्याऽसितपक्षके । खावाद्यां तिथौ श्रीमत् नारायणयतेरिदम् । भजनं गुरूवर्यस्य लिखितं शंकरेण हि । पावनं जगतां वंद्यं श्रीदत्तात्रेयसूनुना । अनेने श्रीगुरूः श्रेष्ठो नरसिंहसरस्वती । प्रीयता सद्‌गुरूः श्रीमान् भक्तकामप्रदो हरि : ।। जयदेव. ।। ६ ।।

**श्रीगुरू: शरणम्**

भक्तकामकल्पतरूः श्रीमत् श्रीनृसिंहसरस्वती । नृसिंहवाटिकाक्षेत्रेऽहर्निशं वसति प्रभुः । वसुशास्त्रवसुभूशाके शालिवाहनभूपतेः । शाके कृतस्तु संन्यासः शंकरेण यथाविधिः ।

**श्रीगुरू: शरणं**

( आ. वा. १३ शके १८६९ )

असूनि मी निराकारी भक्तकाजी देहा धरी । तीर्थ हिंडलो मी सारी भक्तरक्षणार्थ रे ।। १ ।। कुरूगड्डीची विप्रजाया । निघाली ती जीव द्याया । सुतासह माझे पाया । शरण ती आली रे ।। २ ।। येऊनिया काकूळती सद्गत ती महासती । तुजसम पुत्राप्रती । पावेन मी ऐसे करी ।। ३ ।। भुलोनिया तत्प्रेमाला । व्रत शनिप्रदोषाला । सांगोनिया त्या सतीला । झालो गुप्त तेथ मी ।।। ४ ।। कारंजी ती विप्रनारी । वाजसनी विप्रघरी । अंबा नामे जन्मा घरी । तदुदरी प्रणवोच्चारी । नरहरी झालो मी रे ।। ५ ।।

**नम: सर्वेभ्य:**

विघ्नेशं गणपतिं नत्वा श्रीगुरोश्च पदांबुजम् भगवती पांडुरंगं च मातापित्रोः पदद्वयम् ।